सप्टेंबर २०२५
वीरनिर्वाणसंवत् २५५१
वर्ष ७६वे, पुष्प २रे
भाद्रपद-आश्विन शके १९४७
UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)
www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
स्थापना :१५ ऑगस्ट १९५०

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07
बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य - २५ रु.

उत्तम सत्य
उत्तम संयम
उत्तम शौच
उत्तम तप
उत्तम आर्जव
उत्तम त्याग
उत्तम मार्दव
उत्तम आकिंचन्य
उत्तम क्षमा
उत्तम ब्रह्मचर्य

# क्षमावाणी पर्व

## चित्तशुद्धी, वात्सल्यवृद्धी व विश्वमैत्री दिवस



क्षमा धर्म है । क्षमा कर्म है । क्षमा ही कर्तव्य है ।
क्षमा दान है । क्षमा समाधान है । क्षमा ही हर दर्द का उपचार है।
क्षमा स्वरूप है । क्षमा ही परमात्मा का प्रतिरूप है ।
क्षमा अनमोल है । क्षमा ही मोक्ष का द्वार है ।



# क्षमावली : चित्तशुद्धी व वात्सल्यवृद्धी

**विकसनशील जीवनाला 'चित्तशुद्धी' व 'वात्सल्यवृद्धी' या दोन गोष्टींची अत्यंत जरूरी आहे. चिद्धशुद्धी जीवनाला आध्यात्मिक बल देते तर वात्सल्य भावना पारस्परिक प्रेम नी सहकार वाढवून व्यावहारिक जीवन यशस्वी व सुखावह करते. चित्तशुद्धीशिवाय आध्यात्मिक जीवन विकसित होत नाही तर वात्सल्यवृद्धीविना दैनंदिन जीववनात रस येत नाही.** म्हणून मानवी जीवनाच्या या दोन परस्पर पूरक शक्तीच होत. या शक्तींचा विकास चातुर्मासातील व त्यातही मध्यभागी येणाऱ्या दशलक्षण पर्वातील ज्ञान तथा धर्माराधनेतून विशेषत्वाने घडून येण्यास मदत होत असल्याने या पर्वास 'पर्वराज' किंवा 'महापर्व' मानण्यात येते.

या पर्वराजाचा शुभारंभ उत्तम क्षमाधर्माने होऊन समाप्तीही क्षमावलीने साजरी केली जाते. 'क्षमा' हे पृथ्वीचेही एक नाव आहे. क्षमता नी समतेचे ते एक सर्वोत्कृष्ट प्रतीक होय. या प्रतीकाचा आदर्श समोर ठेवून मानव जितका अधिक क्षमाशील, उदार अंत:करणाचा नी समबुद्धीचा धारक होईल तितका तो अधिक मोठा व सुखी बनेल यात शंका नाही. मोठी माणसे केवळ त्यांच्या वय, उंची अगर संपत्तीने मोठी मानली जात नाहीत. त्यांचे मन जितके मोठे, क्षमाशील नी पवित्र असेल त्यावर त्याची उच्चता, श्रेष्ठता, मोजली जाते आणि तशीच ती मोजली जावी; अन्यथा त्या मोठेपणाला अर्थ उरणार नाही. क्षमेबरोबर मार्दव भाव (विनय), ऋजुता (सरल प्रवृत्ती), निर्लोभवृत्ती, सत्यप्रियता, संयम, सहिष्णुता, सेवाबुद्धी, औदार्य, विश्वकुटुंबक भावना, सत्शील जीवन या व अशा अनेक सद्गुणांचा परिपोष मानवी जीवनाच्या विकासाला अत्यावश्यक आहे. पर्वराजाच्या निमित्ताने या गुणांच्या वृद्धीची प्रेरणा आपणास मिळून त्या दिशेने वाटचाल करण्याची भावना बळावते, तर काहीजण ती करूही लागतात. मानवी जीवनाची सफलता त्यातच आहे.

या व अशा अनंत सद्गुणांचा परमोच्चबिंदू परम वीतरागी महामुनीश्वर 'अर्हत्' परमश्रेष्ठींच्या ठिकाणी पहावयास मिळतो. त्यांची परम प्रशांत मुद्रा पाहून मन-वच-काय, तिथेच प्राणी देखील परस्परातील जन्मजात वैरभाव विसरून मैत्रीने व गुण्यागोविंदाने एकत्र नांदू लागतात.

क्षमता नी समतेचे सर्वश्रेष्ठ निधान आणि मोह व कालुष्य (विकार) यापासून सर्वथा दूर अशा योगिश्रेष्ठांच्या सान्निध्यात आपसातील जन्मजात वैरभाव विसरून हरिणी सिंहशावकाला, गाय वाघाच्या बच्च्याला पुत्रभावाने जवळ करते, मांजर हंसाच्या बालकावर व मयूर सर्पावर प्रेमाचा वर्षाव करतात. केवढा हा क्षमेचा – अहिंसेचा प्रभाव ! जगाला चकित करणारे केवढे हे विश्वमैत्रीचे अपूर्व दृश्य ! क्षमावलीच्या निमित्ताने या महान गुणातील अशा गूढ पण तेजस्वी शक्तीचे आकलन आपण करू शकलो पाहिजे ! आपल्या मानसिक नी नैतिक दौर्बल्यामुळे या गुणांचा फार मोठा विकास जीवनात न करता आला तरी बुद्धीने त्या शक्तीचे किमान अवमूल्यन न होऊ देण्याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. ज्याचा आपल्या मूलभूत शक्तीवर – गुणावर विश्वासच नाही तो त्या दिशेने वाटचाल नी प्रगती कशी करू शकेल ?

आज जगाला परस्परातील प्रेम नी सहकाराची पूर्वीपेक्षाही अधिक आवश्यकता आहे. संपूर्ण मानवजात क्षणार्धात बेचिराख करू शकणाऱ्या प्रचंड संहारक शक्तीच्या शस्त्रास्त्र- निर्मितीची आज राष्ट्राराष्ट्रात स्पर्धा सुरू आहे. तोंडाने शांतीचा पाठ म्हणत अशांतीचा विरोध वा विद्वेष वाढेल अशी कृती करण्यात प्रमुख राष्ट्रे गुंग आहेत. उद्या कोणत्या भीषण भवितव्याला तोंड द्यावे लागेल याची मोठमोठ्यांनाही कल्पना येत नाही. अशा स्थितीत मानवाला अहिंसेचा व क्षमेचा वस्तुपाठच आशेचा किरण दाखवू शकेल व त्याच्या सम्भ्रान्त मनाला काहिसा दिलासा मिळेल. यादृष्टीने या पवित्र मैत्रीदिनाचे महत्त्व लक्षात घेऊन आपण आपल्या अंत:करणातील क्रोधादी विकारांची जळमटे दूर करून उदार मनाने परस्परात प्रेम व सहकाराची भावना वाढवू या; कोणत्याही कारणांनी भंगलेली हृदये पुन: पूर्ववत् जोडू या. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या स्थायी स्वास्थ्यासाठी हेच उत्कृष्ट रसायन होय. म्हणून क्षमावली हा पर्व खऱ्या अर्थाने विश्वमैत्री दिवसच आहे.

क्षमा हे पृथ्वीचेही एक नाव आहे. पृथ्वीची क्षमता सर्वांत मोठी, म्हणूनच ती सर्व प्राणिमात्रांचे आश्रयस्थान व आश्वासस्थान बनली आहे. मनुष्य जितका अधिक क्षमाशील व उदारवृत्तीचा राहील तितका तो मोठा व इतरांचा विश्वासभाजन बनेल. **मोठी माणसे केवळ वयाने वा संपत्तीने अधिक म्हणून श्रेष्ठ असे नसून ती मनाने मोठी नी गुणाने अधिक म्हणून श्रेष्ठ ठरतात.** ज्यांच्या ठिकाणी क्षमा, विनयबुद्धी (मार्दवता), ऋजुता (सरलता), नि:स्वार्थवृत्ती, सत्यप्रियता, संयम, सहिष्णुता, उदारता, सेवा व परोपकार बुद्धी, प्रेम व वात्सल्य भाव, जीवनातील शुचिता या गोष्टी विशेषत्वाने दिसतात, तीच माणसे इतरांना श्रेष्ठ नी वंदनीय होतात.

क्षमा ही आत्म्याची महान शक्ती आहे. तिच्या आविष्काराने स्वत:ला शांती लाभतेच, त्याबरोबर दुसऱ्यासही जीवन मिळते. आपल्यांतील धीर नी वीर वृत्ती जागृत होण्याला तीच खरी स्फूर्तिदायी प्रेरणा आहे. क्रोध किंवा दुष्टता हा विकारी भाव असून तो आपल्या आंतरिक निर्बलतेचा सूचक आहे तर क्षमा हा सहज भाव असून तो वास्तविक सबलतेचा व वीरतेचा सूचक आहे. पण हे उथळ नी अविवेकी मनास कळत नसल्याने ते मन विपरीत कल्पना करून घेते. **क्रोधाने तात्पुरता कार्यभाग झाल्यासारखा वाटला तरी तो परिणामी हितकर व शांतिदायक होत नाही हा अनुभव अनेकांना आहे.** म्हणून दैनंदिन जीवनात त्याचा अवलंब घेण्यापेक्षा स्थायी हिताचा आणि इहपरलोकी सुखाचा मूलाधार अशी क्षमा अंगिकारणे चांगले.

आम्ही या पवित्र क्षमावलीनिमित्त आमच्या अनेक त्रुटी, उणीवा व दोषाबद्दल लेखक, ग्राहक व वाचकवर्गाचे सन्मतिपरिवारातर्फे क्षमाप्रार्थी आहोत.

**– मा. भी. (ब्र. माणिकचंदजी भीसीकर गुरुजी) (सन्मति : संपादकीय, ऑगस्ट १९६९)**

सत्प्रेरणा-शुभाशीर्वाद



प.पू. गुरुदेव १०८ श्री
समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन-४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक-संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## सप्टेंबर २०२५

❍ वर्ष: ७६ वे ❍ पुष्प २रे

❑ वार्षिक वर्गणी :२५०/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/-

❍ संपादक मंडळ ❍

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

**बँक खात्याचे विवरण** –Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388

* Shri Bahubali Vidyapeeth - A/C No- 638801700001 (80G **करपात्र सवलतीकरिता**)

* Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

✻ संपादकीय..दैवत्व साधण्याची सुवर्णसंधी –डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली ०४
✻ Anekāntavad And World Peace - Sanatkumar Arwade, Sangali ०६
✻ क्षमावाणी पर्व – गुलाबचंद हिरामण बोराळकर, वेरुळ ०९
✻ योगसार चिंतन (०८) – प्रियदर्शन जैन, नागपूर १२
✻ पट्टमहादेवी-शब्दांपलिकडील अन्वयार्थ (२४) –विपुल खेडकर, नागपूर १४
✻ 'सोलहकारण भावना भाय....!'(१२) – हर्षा वेखंडे, नागपूर २१
✻ रामायण आणि महाभारत : तौलनिक विवेचन-५ –डॉ. सौ. लीना चवरे, कारंजा-लाड २५
✻ गुरुदेवश्री समंतभद्रजी : एक सुगंधी चंदन (कविता) –सौ. उज्ज्वला इंगळे, कारंजा-लाड २७
✻ दिगंबर जैन समाज आणि कर्मवीर भाऊराव पाटील –श्री. महावीर मुळे २८
✻ गुरुकुल पंचसूत्री : शैक्षणिक जीवन संजीवनी –वृषभ राजाराम खोत, तारदाळ ३१
✻ प. पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराज –आदिती सुधाकर एवाळे, सिदनाळ ३२
✻ गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित गुरुकुलांमुळे समाजास लाभलेली दिशा –तानाजी आत्माराम घोसरवाडे, स्तवनिधी ३४
✻ गुरुदेवश्री समंतभद्र महाराजांच्या गुरुकुल संस्था व समाज –निदा रमजान शेख, तारदाळ ३६
✻ गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित गुरुकुलांमुळे समाजास लाभलेली दिशा –सौ. सविता बा. सिदनाळे, जयसिंगपूर ३७
✻ दुःखी जीवाचे सांत्वन व समुपदेशन –डॉ. सुरुची धवल शहा, पनवेल ४०
✻ विशेष वार्ता ४३

# संपादकीय....

दशलक्षण महापर्व..

## दैवत्व साधण्याची सुवर्णसंधी

डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली

ज्याप्रमाणे राजांमध्ये चक्रवर्ती श्रेष्ठ असतो, देवांमध्ये इंद्र श्रेष्ठ असतो, मोत्यामध्ये कोहिनूर श्रेष्ठ आहे, फळांचा राजा आंबा म्हटला जातो. त्याप्रमाणे सर्व महिन्यांमध्ये भाद्रपद महिना श्रेष्ठ मानला जातो. त्याच्या नावातच त्याचे अर्थ लपले आहे. भद्र म्हणजे कल्याणकारी, आनंददायक पाऊल ज्या महिन्यात पडते, तो भाद्रपद महिना होय. या महिन्यात अनादी काळापासून सर्वत्र दहा दिवस साजरा केला जाणारा दशलक्षण महापर्व येत असतो. हा दशलक्षण महापर्व भाद्रपद महिन्याच्या शुक्लपंचमीपासून चतुर्दशीपर्यंत संपन्न होत असतो. अत्यंत आनंदाने, उत्साहाने व सद्विचाराने हा पर्व साजरा करीत असतात. तसेच षोडशकारणव्रत, रत्नत्रय व्रत, सुगंध दशमी इत्यादी व्रतांचेही पालन केले जाते. सर्वत्र धार्मिक, आध्यात्मिक पूजा-विधानांचे आयोजन केले जाते.

धर्माचे महत्त्व सांगताना एक सुभाषितकार असे म्हणतो की,

**धर्मः सर्वसुखाकरो हितकरो धर्मं बुधाश्चिन्वते**
**धर्मेणैव समाप्यते शिवसुखं धर्माय तस्मै नमः।**
**धर्मान्नास्ति परं सुहृद् भवभृतां धर्मस्य मूलं दया**
**धर्मे चित्तमहं दधे प्रतिदिनं हे धर्म मां पालय ।।**

धर्म सर्व सुखांची खाण आहे. धर्म हितकारक आहे; म्हणून बुद्धिमान लोक धर्माचा संग्रह करतात. धर्मानेच मोक्ष सुखाची प्राप्ती होते. म्हणून अशा त्या धर्मास माझा नमस्कार असो. संसारी जीवांना धर्मापेक्षा दुसरा कोणी श्रेष्ठ मित्र नाही. धर्माचे मूळ दया आहे. या सर्व कारणामुळे मी दररोज माझे मन धर्मामध्ये लावत आहे. हे धर्म, तू माझे रक्षण कर.

दुसरा एक सुभाषितकार असे म्हणतो की,

**सुकुलजन्मविभूतिरनेकधा,**
**प्रियसमागमसौख्यपरंपरा।**
**नृपकुले गुरुता विमलं यशो,**
**भवति धर्मतरोः फलमीदृशम्।।**

उत्तम कुळामध्ये जन्म आणि सर्व प्रकारचे वैभव, प्रिय लोकांचे समागम, निरंतर सुखाची प्राप्ती, राजघराण्यामध्ये मान सन्मान आणि निर्मळ यश ही सर्व धर्मरूपी वृक्षाची फळे आहेत.

अशाप्रकारे धर्माचे महात्म्य सांगणाऱ्या शेकडो गाथा जिनगमामध्ये मिळतात. ज्या धर्मामुळे तीन लोकातील सर्वश्रेष्ठ अशी उत्तम लक्ष्मी प्राप्त होते. शत्रूसमूहांचा नाश करणारे राज्य मिळते. इंद्रिय सुखाची प्राप्ती होते. मनोवांचित ऐश्वर्याचा लाभ होतो. अशा धर्माविषयी कार्तिकेयानुप्रेक्षा या ग्रंथात आचार्य कार्तिकेय स्वामी असे म्हणतात की,

**धम्मो वत्थु सहावो खमादिभावो य दसविहो धम्मो।**
**रयणत्तयं च धम्मो जीवाणं रक्खणं धम्मो ।।**

वस्तूच्या, पदार्थांच्या स्वरूपास धर्म म्हणतात. जसे की जीव शुद्ध बुद्ध चैतन्यस्वरूपी आहे, हे चैतन्य हाच जीवाचा धर्म आहे. उष्णता हा अग्नीचा धर्म आहे. त्याप्रमाणे उत्तम क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, आकिंचन्य व ब्रह्मचर्य रूप आत्मपरिणामासच धर्म म्हटले जाते. यामुळे धर्माची शास्त्रामध्ये दहा लक्षणे सांगितली आहेत. सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र रूप रत्नत्रयांना सुद्धा धर्म म्हणतात. तसेच सर्व प्रकारच्या प्राण्यांचे रक्षण करण्यास सुद्धा धर्म म्हणतात. **अहिंसा परमो धर्मः** असे म्हटलेच आहे.

आचार्य समंतभद्रदेव रत्नकरंड श्रावकाचार या ग्रंथात म्हणतात की,

**संसारदुःखतः सत्त्वान् यो धरतीत्युत्तमे सुखे ।**

जो संसार दुःखातून काढून जीवास मोक्ष सुख देतो त्यास धर्म म्हणतात. खरोखर धर्म हा सर्व प्रकारच्या पापापासून दूर ठेवून पवित्र कार्य करण्याची प्रेरणा देत असतो. पवित्र विचार निर्माण करण्याचे सामर्थ्य धर्मामध्येच आहे आणि मनुष्य जसं विचार करतो, तसेच बोलत असतो आणि तसेच वागत असतो. त्यामुळे वागण्या-बोलण्या आणि विचार करण्यामध्ये धर्म, न्याय, नीती व सदाचार निर्माण करीत रहावे. या धर्मामुळेच माणसाला देवत्व प्राप्त होते आणि हा धर्म सोडला तर मनुष्य राक्षस बनतो. मानवता ही उपासनीय आहे आणि धर्म हे त्याचे मुख्य साधन आहे. मानवातील मानवता केवळ धर्मसाधनेनेच येऊ शकते, अन्य कोणत्या माध्यमाने नाही; म्हणून पाश्विक आणि राक्षसी वृत्ती दूर करण्यासाठी धर्माची साधना, आराधना व उपासना करणे सर्वथा योग्य आहे. दैवत्व प्राप्त करणे हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. अशा दैवी गुणांची उपासना करण्याची अपूर्व संधी या दशलक्षण महापर्वात येत असते; म्हणून सर्व भव्य जीवांनी अत्यंत तन्मयतेने, पवित्र अंतःकरणाने या संधीचा लाभ घ्यावा. अन्यथा केवळ या जन्मातच नव्हे तर पुढील अनेक जन्मात दुःख, कष्ट भोगावे लागते.

उत्तम क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, आकिंचन्य व ब्रह्मचर्य ही धर्माची दहा लक्षणे आहेत. यामध्येच अनेक सद्गुणांचा समावेश झाला आहे. खरं तर धर्माची ही दहा लक्षणे म्हणजे अनंत गुण स्वभावी आत्म्याचे प्रातिनिधिक गुण आहेत. या दशधर्माची आराधना करणे म्हणजे अमूल्य रत्नांचा खजिना शोधणे होय. दुःखरूपी अग्नीला शांत करण्यासाठी पाण्याप्रमाणे आहेत. मोक्षमहलात प्रवेश करण्यासाठी जिन्याप्रमाणे उपयोगी आहेत.

**एवं दहप्पयारा पावं कम्मस्स णासया भणिया ।**
**पुण्णस्स य संजणया पर पुण्णत्थं ण कायव्वा।।**

हे धर्माचे दहा प्रकार पापांचा नाश करणारे आणि पुण्याचा संचय करणारे आहेत, असे सांगितले आहे; परंतु यांची आराधना पुण्यप्राप्तीसाठी करू नये म्हणजेच आचार्यांना असे सांगावयाचे आहे की, याच्या आराधनेतून मुख्यतया आपल्या आत्मिक सुखाची उपलब्धी व्हावी, निजाशुद्धात्मानुभव व्हावा व बाह्यदृष्टीने मोक्षप्राप्ती व्हावी. उच्च व उदात्त ध्येय ठेवून पवित्र कार्य केले असता सहजतेने संसारिक सुख ही मिळते. त्याकडे लक्ष द्यावे लागत नाही. आपणास दुर्लभ मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे. तो मनुष्यजन्म धर्म प्राप्त न करता वाया घालवू नये, म्हणून पंडित दौलतरामजी छहढालेत सांगतात की,

**यह मानुष पर्याय सुकुल सुनीओ जिनवाणी**
**इह विधी गये न मिले सुमनी जो उदधीसमानी ।**

हा मनुष्य पर्याय, उत्तम कुळ, जिनवाणीचे श्रवण या गोष्टी पुन्हा पुन्हा मिळणार नाहीत. ज्याप्रमाणे समुद्रात पडलेले रत्न पुन्हा सापडणे अत्यंत कठीण आहे, त्याप्रमाणे मिळालेला दुर्लभ मनुष्य जन्म धर्म जाणून न घेता व्यर्थ घालविल्यास पुन्हा मिळणे खूपच कठीण आहे. हे जाणून शहाण्या माणसांनी आपला वेळ धर्मकार्यात व्यतीत करावा. धर्माचे स्वरूप जाणून घ्यावे. त्यासाठी दशलक्षण महापर्व हा एक सुवर्णकाळ आहे. ही संधी साधावी आणि आपल्या मनातील कलुषता दूर करावी. मन निर्मळ, स्वच्छ, पवित्र बनवावे. जितकी अधिक पवित्रता येईल तीच खरी आपली प्रगती होय. कुविचारांची जळमटे दूर करण्याचा हा काळ आहे. ज्याप्रमाणे आपण घर स्वच्छ करतो त्याप्रमाणे या पर्वातील शेवटचा दिवस म्हणजे क्षमावाणी हा महापर्व आपल्या मनातील कुविचारांची जळमटे दूर करणारा आहे; म्हणून तन्मयतेने व तत्परतेने ही संधी साधावी व पुढीलप्रमाणे आपली भावना असावी....

**क्षमितो सर्व जीवांना, क्षमोत मज सर्व ते**
**सर्व भूती असो मैत्री, नसो वैर कुणासवे।**
**अशिष्टाचार मी केला, प्रमादाने तुम्हासवे**
**कषाय शल्य त्यागोनी, क्षमावे मजला तुम्ही।।**

प्रमादामुळे ज्ञात-अज्ञात सर्व अपराधाबद्दल आम्ही आपणा सर्वांची अंतःकरणपूर्वक क्षमा मागतो आहोत व आपणा सर्वांना ही क्षमा करीत आहोत.

*****

# Anekāntavad And World Peace

**Sanatkumar Arwade,**
President,
Shri Bahubali Brahmacharyashram, Bahubali.

We are living in an age of space technology. Though technology has brought all parts of the world within instant physical communication, but they remain separated by barriers of ignorance and indifference. There is growing unrest and tension in all parts of the world. Messages from great saints and seers have not helped the easing of this tension or promoting world peace. It is ridden with prejudices, indifferent and intolerant attitude and religious fanaticism.

In today's terror - ridden violent world, "Religious Pluralism" has acquired vital significance. We observe that innocent people are becoming victims of falsely ignited religious sentiments though the basic tenet of all religions is good brotherly behavior towards every being.

Lord Mahavir said, "All that we are is the result of our own thoughts". And, what we think relates to our beliefs and experiences which may pertain to ourselves or to other beings or to both. In order to understand any one of them, it is necessary to understand the other two. Only a dispassionate study based on a sympathetic examination and rational analysis of them will help mutual understanding and a happy reconciliation even in the face of severe antagonism.

The majesty of the human form of life lies in the flowering of the natural qualities of the human soul, compassion, forgiveness, love, altruism are some of the qualities which bestow peace and happiness for which the whole world is striving. And such qualities are developed and nurtured by undertaking the invisible inward journey.

The Jain Theory "Anekāntavad, is truly extensive and is at the root of Universal Co-operation and brotherhood. It embraces a non-critical attitude toward many angles, the Truth consists of, tolerance toward other views and abhors fanaticism and fundamentalism that lead as we are witnessing now in the present, violence

and destruction through heinous acts of terrorism in the name of religion.

However the Jain doctrines have, over centuries, not only inculcated right outlook and deeds in life ethos of the faithful, but also influenced India's culture of tolerance and harmony in the midst of diversity and plurality. Accordingly, they appear to ensure collective benefits in social matters, deliver compassion on moral ground, and advance peace and harmony in the society.

However, what a paradox it is that today world is torn apart because of religious fanaticism. Instead of being tolerant of other faiths and view-points, and living in co-operation and harmony with all communities and nations, matters have deteriorated to such an extent that peace has disappeared from the human horizon and fear and terror have gripped the human race.

A big question, therefore, arises whether in such a gloomy scenario, is there any ray of light that would lead the world to bright sunshine of human existence with peace and harmony. The only hope of survival lies in generating attitudinal change towards various religious philosophies and ideologies. That is embracing religious pluralism by accepting the jaina theory of Anekāntvada. At a time when religious fundamentalism and ideological fanaticism are darkening wise counsel and extinguishing human sympathies, the relations between various religions are severely strained, the existence of Jain philosophy of Anekāntvad is like a ray of light in the encircling gloom and a symbol of hope for the future.

In a winder perspective, "Anekānt" accords respect for all ideologies and reverence for all understandings. The principle of "Live & Let Live" is put on a high pedestal. I shall quote the following Shloka in Prakrit language which is always recited by the Jains, which signifies importance of forgiveness and friendship as kith and kin.

"Khamemi Savva - Jive,
Savve Jiva. Khamantu Me
Mitti Me Sevva - Bhuesu
Veram Majjha Na Kenai"

Translated it conveys
I forgive all beings
Let all beings pardon me
I have friendship with all beings.
And I have no enmity with anybody.

This is the zenith of "Religious Pluralism" since it talks of Universal brotherhood and togetherness. What else is necessary for us to make our life noble and gracious and to live as one

entity on this planet earth.

We are happy that our Indian Constitution enshrines this and other ideologies of Jainism. It grants generous and equal rights to all, including minorities, to follow their own religion. Hence along with Hinduism, Islam, Christianity, Jainism and Buddhism and others, one and all are extensively practiced in this Holy Land. In the religious idiom, it is expressed as

"Sarva Dharma Samabhav"

Thus is signifies

Equanimity for All Religious.

This is "Religious Pluralism" widely observed. This is "Anekānt" abundantly operative.

P. P. 108 Shri Gurudev Samantbhadra Maharaj through Gurukul System of Education propagated the teachings of the Tirthankaras which became the source of the spiritual and moral uplift of the students learning in the Gurukul. Various doctrines enunciated by the Jinas have given rise to Vratas (vows) which are Ahimsa, Satya, Asteya, Aparigraha and Brahmacharya which are inevitable to live the present life and to seek eternal truth. This Gurukul also produced hundreds of selfless and dedicated workers who remained unmarried to further promote this mission. The present younger generation owes to P. P. Shri Gurudev for this glorious legacy left behind which will show the real path towards happy life.

## सभासदांना विनम्र निवेदन....

सन्मति - मासिकाची अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीकडे यशस्वी वाटचाल झालेली आहे. परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांची प्रेरणा, बाहुबली संस्थेकडून मिळालेले सततचे पाठबळ आणि सर्व वाचक सभासदांकडून मिळालेले आत्मीय सहयोग यामुळे गेल्या ७५ वर्षांपासून धर्म प्रभावनेचा हा सन्मति-प्रवाह वाहता आहे. अनेक अडचणींवर मात करीत आणि प्रसंगी तोटा सहन करून सन्मति मासिक जैन साहित्यात योगदान देत आहे. जानेवारी २०१५ पासून मासिकाची वार्षिक वर्गणी रु. १५०/- आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) १,५००/- रुपये अशाप्रकारे होती. परंतु वाढती महागाई प्रिंटिंग, कागद, डीटीपी व डिझाईन या सर्वच गोष्टींना प्रभावित करीत आहे. त्यामुळे चालू महिन्यापासून **वार्षिक वर्गणी रुपये २५० आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) रुपये २,५००/-** अशा प्रकारे वाढ करण्यात येत आहे.

आपण सर्वांनी अनेक वर्षापासून या मासिकास जो सहयोग दिला, त्याबद्दल अनेक धन्यवाद ! या मासिकाला दीर्घजीवी बनवण्यासाठी आणि भविष्यातही ते सुचारू पद्धतीने सुरू राहण्यासाठी मासिकावर प्रेम करणारे सर्व वाचक ही अपरिहार्यता समजून घेतील आणि भविष्यातही असाच सहयोग देतील हा विश्वास वाटतो. तेव्हा सर्व सभासदांना विनंती आहे की आपण सर्वांनी लवकरात लवकर वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे.

**-संपादक मंडळ**

# क्षमावाणी पर्व

**गुलाबचंद हिरामण बोराळकर,** मुख्याध्यापक – गुरुदेव समंतभद्र विद्यामंदिर, वेरुळ, जि. छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६०४९९५३३

'मनुष्य' हा एक सामाजिक प्राणी म्हणून त्यामध्ये काम क्रोध, मान, माय, लोभ, मत्सर तसेच प्रेम, आपुलकी, स्नेह, बंधुता इत्यादी भावभावना आल्याच. परंतु ह्या सर्वच भावभावना मानवोपयोगी नाहीत. त्यातील काम, क्रोध, मान, माया, लोभ, मत्सर इत्यादी विकारभाव हे तर मानवाहिताच्या विरोधी आहेत आणि प्रेम, आपुलकी, स्नेह, बंधुता इत्यादी भावना मानव हित जोपासणाऱ्या आहेत. त्यामुळे मानवहितासाठी अहितकारी भावभावनांना न होऊ देणे – नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी 'क्षमावाणी' अत्यंत महत्वाची आहे.

क्रोधाच्या अभावाला क्षमा म्हणतात. क्रोधाप्रमाणेच मान, माया, लोभ, मत्सर–द्वेष इत्यादी विकारी भाव आहेत. हे सर्वच विकारभाव कसे उत्पन्न होतात ? तर जेव्हा आम्ही एक दुसऱ्याच्या कथनाला समजून न घेता, त्याचा आपल्या मर्जीनुसार / स्वार्थानुसार अर्थ काढतो, तेव्हा विवादाला प्रारंभ होतो. अशावेळी एक दुस–याचे मन दुखावले जाते. मन दुखावलेली व्यक्ती आपली ताकत विकासासाठी न लावता विध्वंसासाठी लावते. त्यामुळे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक इत्यादी सर्वच प्रकारची हानी होते. त्यामुळे मानवीय विकासासाठी काम, क्रोध, मान, माया, लोभ इत्यादी वाईट विचारांवर विजय मिळविणे आवश्यक आहे. ह्याच महत्त्वपूर्ण बाबींचा विचार 'क्षमावाणी' अन्तर्गत केला जातो.

सामाजिक प्राणी म्हणून व्यवहारात जगत असतांना कळत न कळत अनेकांचे मन दुखावत असतो. त्यामुळे ते दुखावलेले आपल्यावर नाराज असतात. अशावेळी ती नाराज व्यक्ती आपली शक्ती विकासात्मक कार्यासाठी तर लावतच नाही, उलटपक्षी स्वतःच्या आणि इतरांच्या कार्यात बाधक ठरते. अशा प्रसंगी व्यक्ती – समाज – गाव – देश विकास कसा साधणार? यावर एक महत्त्वपूर्ण उपाय म्हणजे क्षमावाणी होय.

काय आहे ही क्षमावाणी ? तर मानवाने आपल्या जीवनात सदैव हित–मित–प्रिय वाणीचाच उपयोग करावा. आपल्या हित मित प्रिय वचनामुळे कोणीही दुखावले जाणार नाही. एका संस्कृत श्लोकानुसार –

**प्रियवाक्यप्रदानेन, सर्वे तुष्यन्ति मानवाः ।**
**तस्मात् तदेव वक्तव्यं, वचने का दरिद्रता ।।**

अर्थात प्रिय मधुर वाणीमुळे सर्व मानव सन्तुष्ट होतात. तसेच प्रियवचनासाठी कोणताही खर्च नसल्याने त्यात कंजुसी का करावी ? अर्थात करु नये.

आपल्या जीवनात आपण जेव्हा इतरांना मन–वचन–कायेने दुखावतो, तेंव्हा आपण त्याची बिनशर्त माफी मागणे आणि ती चुक पुन्हा न करण्याचा संकल्प करणे हीच खऱ्या अर्थाने व्यावहारिक क्षमावाणी होय. इतरांची माफी मागणे स्वतःमध्ये दुरुस्ती करणे ही जशी क्षमावाणी आहे, त्याचप्रमाणे इतरांकडून आपले मन दुखावले असेल, तर आपण त्यांचा माफीचा हठाग्रह न ठेवता त्याच्या चुकीला उदार अन्तःकरणाने माफ करणे, विसरणे ही आपल्यातर्फे इतरांना दिलेली क्षमावाणी आहे.

प्रश्न आहे की क्षमा कोणी कोणाला करावी? १) माठ्याने लहानाला? २) लहानाने मोठ्याला? ३) स्त्रीने पुरुषाला? ४) पुरुषाने स्त्रीला इत्यादी ........ या सर्वच प्रश्नांचे एकच समाधान आहे. या जगातील प्रत्येक जीव सुखा–समाधानाने जगू इच्छितो. अशावेळी आपल्याला कोणालाही

दुखावण्याचा अधिकारच नाही. मग कळत न कळत जो कोणी, ज्या कोणाला दुखावतो. त्यानेच माफी मागीतली पाहिजे. ती माफी सशर्त नको. फक्त शब्दापुरतीच नको, तर बिनशर्त आणि मनातून असावी. पुरुष चुकला तर पुरुरुषाने, स्त्री चुकली तर स्त्रीने. लहान चुकला तर लहान्याने, मोठा चुकला तर मोठ्याने, अधिकारी चुकला तर अधिकाऱ्याने आणि कर्मचारी चुकला तर कर्मच्याऱ्याने माफी मागावी, एवढा सहज सरळभाव म्हणजेच क्षमावाणी होय.

ह्या क्षमावाणीचे स्वरूप फक्त मानव-जातीपुरतेच मर्यादित नसून ती प्राणीमात्रासाठी आहे. जेव्हा आपण मूक पशुपक्षांना दुखावतो, तेव्हा त्यांना ही आपण मनातून/कृतीतून माफी मागीतली पाहिजे. मूक हिंसक पशुपक्षांनाही आपण जेव्हा प्रेम, स्नेह देतो, तेव्हा ते हिंसक प्राणी सुध्दा आपल्याला प्रेम देतात. हिंसकभाव विसरतात. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे बाबा आमटे, प्रकाश आमटे. अर्थात क्षमावाणीचे स्वरूप मर्यादित न ठेवता जीवमात्रांच्या, प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी आहे. याही पुढे जाऊन विचार केला तर जेव्हा आपण नैसर्गिक साधन संपत्तीचा दुरुपयोग करतो. तो ही आपला अपराधच आहे. त्यासाठी सुध्दा आपण क्षमाप्रार्थीच असले पाहिजे.

आता प्रश्न निर्माण होतो की क्षमा करण्याची ताकद कुणामध्ये आहे? जी व्यक्ती संकुचित विचारांची आहे, ती कधीच आपली चूक स्वीकारत नाही. कमजोर प्रवृत्तीचा जीव ही स्वतःला सोडून इतरांमध्येच दोष शोधतो. त्याला आपले दोष दिसतच नाहीत. अशी छिद्रान्वेषी सवयीची व्यक्ती कधीच इतरांना क्षमा करु शकत नाही. उदार अन्तःकरण ठेवणारा, इतरांना समजून घेण्याची इच्छा असणारा समर्थ मनुष्यच क्षमाभावी असतो. म्हणूनच **क्षमा वीरस्य भूषणम्!** असे म्हटले आहे. अर्थात क्षमा हे वीर पुरुषाचे लक्षण आहे, हे कमजोर व्यक्तीचे कार्य नाही.

अजूनही एक प्रश्न उरतोच तो म्हणजे क्षमावाणी कोणत्या जाती धर्मात जन्मलेल्या लोकांनी मानावी ? त्याचे सहज उत्तर असे की क्रोध, मान, माया, लोभ या सारखे वाईट विचार कोणत्या जाती धर्मात चांगले सांगीतले आहेत? क्रोधादी विकार सर्वासाठी दुःखदायी आहेत. तर मग ह्या क्षमावाणीला कोणत्याही एखाद्या जातीधर्माचे कसे म्हणता यईल? म्हणून **क्षमावाणी सार्वजनिक** आहे.

हे क्रोधादी विकार कोणत्या देशात चांगले म्हटले जातात? जर भौगोलिक दृष्टीने सुध्दा हे क्रोधादी सर्वत्रच त्याज्य (सोडण्यालायक) मानले आहेत, तर क्षमावाणी भारतापुरती मर्यादित कशी ? म्हणून ह्या **क्षमावाणीला सार्वभौमिक** म्हटले तर वावगे ठरु नये.

त्याच प्रमाणे काम क्रोध रागद्वेषादी विकारी विचारांना कोणत्या काळात (भूतकाळ-वर्तमानकाळ-भविष्यकाळ) वाईट म्हटले जात नाही? भूतकाळात ही ते वाईटच होते, वर्तमान काळात ही त्यांना वाईटच म्हटले जाते, तसेच भविष्यकाळातही ह्या विचारांना वाईटच म्हटले जाईल, यांत शंका नाही. अशा प्रसंगी हया **क्षमावाणीला सार्वकालिक** म्हटल्यास वावगे ठरु नये. ह्या क्षमावाणीला अन्तःकरणातून स्वीकारल्यास असत्य-चोरी-विषयवासना इत्यादी वाईट विचार सहज दूर व्हायला लागतात. यातून सामाजिक कीड पूर्णतः निघून जाईल, व्यक्ती स्वस्थ होईल त्यामुळे समाज, देश, विश्व हा स्वस्थ्य आणि सशक्त बनेल.

मला माझ्या देशाचा भावी नागरीक अशा प्रकारचा वीर बनवायाचा असेल, तर स्वतः क्षमावाणीचे खरे स्वरुप समजून त्याबाबत इतरांनाही जागरुक करावे लागेल. यामुळे पुरुषांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, मोठ्याचा लहानाकडे, सबलांचा निर्बलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल. या जगात जीव म्हणून कोणी ही लहान मोठा नाही - सर्व समान आहेत- असा मानवीय दृष्टिकोन निर्माण होईल आपल्या अपराधाबददल आपण क्षमा मागीतल्याने मनावरील दडपण कमी होते, मनात नवीन विचाराला जागा निर्माण होते, डिप्रेशन राहत

नाही. याउलट आपण क्षमाभाव न ठेवल्यास त्याचा आपल्या स्वास्थ्यावर परिणाम होतो. आर्थिक नुकसान अनेक प्रकाराने संभवते. सामाजिक राष्ट्रीय स्वास्थ्य खराब होते. क्षमावाणीने मानवीय जीवन सदाचारी बनावे आणि असे जीवनच तर आम्हा सार्वांना अपेक्षित आहे.

चला तर मग, आपण सर्वजण एक दुसऱ्याला हात जोडून अंतःकरणातून आज पर्यंत आपल्याकडून ज्याचे कुणाचे कळत न कळत मन दुःखावले असेल कुणाला त्रास झाला असेल. त्याला बिनशर्त उत्तम क्षमा म्हणूया, अर्थात् माझ्याकडून आपणास झालेल्या सर्व प्रकारच्या त्रासाबददल मी क्षमाप्रार्थी आहे. या पुढे मी माझ्या जीवनात उत्तम क्षमावाणीचा अंगीकार करुन सुधार करेन.

सर्वजण मिळून उंच आवाजात आणि उत्साहाने म्हणूया.

उत्तम क्षमाधर्म की जय ........

## समाजामध्ये संस्कारक्षम व सकारात्मक विचार रुजवण्याचं काम प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी केले – माजी मंत्री प्रकाश आवाडे यांचे गौरवोद्गार



जयसिंगपूर (दि.२४/०८/२०२५) :– जनतारा शिक्षण संकुलामध्ये महाराष्ट्र जैन साहित्य परिषद व तीर्थंकर फाउंडेशन आयोजित प्राचार्य श्रीधर हेरवाडे स्मृतिविशेषांक प्रकाशन समारंभ सानंद संपन्न झाला. तेव्हा श्री. प्रकाश अण्णा म्हणाले की, प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी गुरुकुलामध्ये मिळालेल्या संस्कारांचा उपयोग समाजास शिक्षित करण्यासाठी, समाजहित जपण्यासाठी केले. त्यांनी समाजामध्ये एक वेगळी शैक्षणिक चळवळ निर्माण केली. समाजाला जागरूक करण्यासाठी विविध ठिकाणी दिलेली हजारो व्याख्याने उल्लेखनीय आहेत. सन्मती, रत्नत्रय, प्रगती व जिन-विजय या मासिकांमधून सकारात्मक विचार समाजापर्यंत पोहोचवले. यामध्ये वाटचाल करताना त्यांना कोल्हापूरचे स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक महास्वामीजी यांचे मार्गदर्शन मिळाले. बाहुबली परिसरामध्ये विकासाच्या अनेक योजना राबवण्याचे काम त्यांनी केलं. त्यांच्या विचारांची ज्योत तेवत ठेवूया, हीच त्यांना खरी विनयांजली ठरेल. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाहुबली विद्यापीठाचे महामंत्री डी. सी. पाटील म्हणाले की, प्राचार्य श्रीधर हेरवाडे सर यांनी बाहुबली विद्यापीठामध्ये अतुलनीय असे योगदान दिले. समाजासाठी सकारात्मक विचाराची ज्योत प्रज्वलित करण्याचे काम हेरवाडे सरांनी केलं. हेरवाडे सरांनी संकुचित विचार न ठेवता प्रगल्भ विचारशक्ती जोपासली. यावेळी कोल्हापूरचे स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामीजी यांनी आपल्या आशीर्वचनातून प्राचार्य श्रीधर हेरवाडे सर यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी समाजासाठी केलेले काम, त्यांच्या अंगी असणारी विनयशीलता, नम्रता, ज्ञानसंपन्नता अशा अनेक गोष्टींमधून हेरवाडे सरांचं व्यक्तिमत्त्व दिसून येतं. शेवटच्या श्वासापर्यंत समाजासाठी काम करणारे विद्वान होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून ज्ञानेश्वरीचे सार जगासमोर ठेवले. त्यांचे साहित्य, विचार आपण आचरणात आणलं पाहिजे.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य श्रीधर हेरवाडे स्मृतिविशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र जैन साहित्य परिषदेचे अध्यक्ष डी. ए .पाटील, उपाध्यक्ष डॉ. महावीर अक्कोळे, डॉ. गोमटेश्वर पाटील, अण्णासाहेब क्काणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी बाहुबलीचे संचालक गोमटेश बेडगे, जनताराचे चेअरमन महावीर पाटील, नांद्रेकर ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन राजेंद्र नांद्रेकर, डॉ. बी. ए. शिखरे, आदिनाथ होसकल्ले, नीलम माणगावे समाजातील अनेक मान्यवर मंडळी, साहित्यिक, कवी, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. सुरेश पाटील यांनी केले तर प्रकाश देसाई यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अनिता चौगुले यांनी केले.

# योगसार चिंतन

(लेखांक ८)

**प्रियदर्शन जैन, नागपूर**

**मग्गणगुणठाणइ कहिया ववहारेण वि दिट्ठि ।**
**णिच्छइणइ अप्पा मुणहु जिय पावहु परमेट्ठि।।१७।।**

**गिहिवावार परट्ठिआ हेयाहेउ मुणंति।**
**अणुदिणु झायहि देउ जिणु लहु णिव्वाणु लहंति ।१८।**

**अर्थ–** या गाथेत आचार्य देव सांगतात की,केवळ व्यवहार नयाने जीवाला गुणस्थान व मार्गणा रूप सांगितले आहेत. निश्चयनयाने (परमार्थाने) आपल्या आत्म्याला जाणून, त्यामध्ये रमूनच या जीवाला परमेष्ठी पद (सिध्द) प्राप्त होते.।।१७।।

**अर्थ–** गृहस्थ असूनसुद्धा जे हेय-उपादेयास (त्याग करण्यायोग्य व ग्रहण करण्यायोग्य) जाणतात व सतत जिनेंद्र देवाचे ध्यान करतात, ते शीघ्र निर्वाण पदाला प्राप्त करतात.।।१७।।

गुणस्थान-मार्गणास्थान वर्तमान पर्यायात अस्तित्वात आहेत, परन्तु ते व्यवहार नयाचा विषय आहेत. निश्चय नयाने(अभेद दृष्टीच्या अपेक्षेने) हे सर्व भेद अभूतार्थ (असत्यार्थ) आहेत. वस्तुतः आत्मा (जीव) जेव्हा स्वतःला जाणून स्वतःमध्येच स्थिर होतो, तेव्हाच सिद्धपदाला प्राप्त होतो.

आचार्यदेव येथे सांगतात.- 'आपल्या भगवत्स्वरूप आत्म्यास जाण, जो केवल ज्ञानस्वभावी, अभेद, अनंत गुणमय आहे. ज्यामध्ये, हे आत्मद्रव्य आणि हे त्याचे गुण, असा सुद्धा भेद नाही... अशा आपल्या आत्म्यास जाण... त्याचीच श्रद्धा कर..त्याचाच आश्रय कर! ज्यामुळे तुला निश्चितच अरहंत, सिद्ध पदाची प्राप्ती होईल.'

आचार्यदेव येथे सांगत आहेत.-'आपल्या वर्तमान पर्यायात गुणस्थान, मार्गणास्थान हे अस्तिरूपाने असतात, पण ते व्यवहारनयाचे विषय आहेत..त्यांना फक्त ज्ञाता राहून जाणण्याची कला अवगत कर.....निश्चयनयाने अर्थातच परमार्थदृष्टीने हे सर्व भेद-प्रभेद असत्यार्थ असतात. वस्तुतः स्वभावाने प्रत्येक आत्मा हा परमात्मा असतो..त्याचीच श्रद्धा कर. यामुळेच सम्यग्दर्शनाची प्राप्ती होते.'

ते सांगू इच्छितात. -'हे जीवा! तू खऱ्या अर्थाने स्वार्थी बन.....सगळं-सगळं विसरलास तरी चालेल, परंतु आपल्या आत्मदेवाला कदापि विसरू नको....सर्व परभावांपासून अत्यंत भिन्न अशा आपल्या स्वभावाचा आश्रय घेऊनच वाटचाल कर.. तू तुझा पुरुषार्थ तुझ्यातच सुरू ठेव..वाटेत तुला गुणस्थान- मार्गणास्थान भेटतील...परंतु त्यांचासुद्धा यथायोग्य समयी वियोग होईल.. हे सत्य जाणून घे!'

गुणस्थान म्हणजे आत्मविकासाचे टप्पे, जे चौदा असतात..जे जीवाची आध्यात्मिक प्रगती दर्शवितात....प्रत्येक गुणस्थान हे कर्म, मोह आणि योग परिणामांवर आधारित असते.

येथे आचार्य देव गुणस्थानांना जाणून घे असे सांगतात..ते म्हणतात. - 'हे भव्य जीवा! तुझा मोक्षपुरीचा प्रवास तर तुलाच करावा लागेल ना.. वस्तुस्वरूपाचा यथार्थ निर्णय करण्यासाठी आगम अभ्यास करून आत्मश्रद्धानी हो आणि आत्मसाक्षात्काराच्या सोबतीने वाटचाल करून सर्व कर्मांचा क्रमाने क्षय करीत पुढील टप्प्यांवर वाटचाल कर... परंतु वर-वर चढताना एकेका गुणस्थानरूपी पायरीचा त्याग करून तुला पुढील पायरीवर चढावे लागेल... आणि शेवटी सर्व गुणस्थानांना सोडूनच तुझी भेट मुक्तीरूपी लक्ष्मीशी होईल..तू तुझे परिणाम निर्मल ठेवण्याचा यत्न कर...आपल्या ज्ञाता-द्रष्टारुपी स्वाश्रित स्वभावाच्या समीप जा.. त्याचे

चिंतवन कर... मोक्ष महल गाठण्यासाठी गुणस्थानरूपी पायऱ्यांवर तुझा प्रवास आपसूकच सुरू होईल.'

मार्गणास्थान म्हणजे आत्म्याच्या (जीवाच्या) विविध अवस्था.. या सुद्धा चौदाच सांगितल्या आहेत, ज्या जीवाच्या प्रवासाचा आणि कर्माच्या परिणामांचा अभ्यास करण्यास सहायक असतात, ज्यामध्ये जीव कोणत्या अवस्थेतून जात आहे हे कळते. आचार्यदेव सांगतात, 'यांना सुद्धा तू जाण आणि आपली आत्माश्रित वाटचाल पुढे, सतत पुढे सुरू ठेव...तुझी आध्यात्मिक प्रगती तुला कळली हेच कार्यकारी आहे..दुसऱ्यांना कळून काय उपयोग? आचार्य कुंदकुंददेव सांगतात, आपली निधी गुप्त राहून भोगण्यातच खरा शहाणपणा आहे!

त्यामुळे गुणस्थान आणि मार्गणास्थानात अडकू नको.. त्यांना ज्ञाता राहून जाण आणि आपल्या निजात्म्यासोबतच मार्गक्रमण कर..

श्रावकदशेत सुद्धा जे आपल्या आत्मतत्त्वास उपादेय मानतात व रागादि परपदार्थांना हेय जाणतात, ते अल्प काळात मोक्षाची प्राप्ती करतात. सम्यग्दृष्टी जीव जेव्हा जिनेन्द्र देवाचे ध्यान करतो, त्या समयी सुद्धा त्याला आपल्या शुद्ध स्वरूपी आत्म्याचे ज्ञान व श्रद्धान निरंतर सुरुच असते.

जिनेंद्र भगवंतांच्या समान आपला आत्मासुद्धा स्वयं मोक्ष स्वरूप आहे आणि मोक्षाचे साधनसुद्धा तोच आहे..'आता आहे त्या दशेत सुद्धा आत्म्याचे अस्तित्व आहे की नाही?' जणू हा प्रश्न विचारून आचार्यदेव सांगतात– 'जर आहे तर त्यास उपादेय कर, मुख्य कर..त्याचा स्वभाव आताही शुद्धच आहे...अंतर्दृष्टी करून त्याचा स्वीकार कर...!'

' मी आत्मा आहे' हा स्वीकार आताही होऊ शकतो... आहे त्या अवस्थेत सुद्धा आपल्या शुद्ध स्वरूपाचे श्रद्धान कर.. गृहस्थाश्रमातूनच सच्चा श्रावक बन आणि मोक्षमार्गचा प्रारंभ कर. उदा. कितीही मलिन अवस्थेत असले तरी सोने हे सोनेच असते..जरी सोळा तावांनी ते शुद्ध करावे लागत असले तरी सोनाराची दृष्टी त्याच्या पूर्ण शुद्ध अवस्थेवरच असते.. त्याचप्रमाणे तू आपली दृष्टी आपल्या परम शुद्धस्वरूपी आत्मतत्त्वावर केंद्रित कर.. एकमेव त्यालाच आपल्या दृष्टीचा विषय बनव!'

प्रवचनसार ग्रंथाच्या गाथा क्र. ८०मध्ये आचार्य कुंदकुंददेव सांगतात, 'परमार्थाने अरिहंत आणि तुझ्या आत्मतत्त्वात काहीही अंतर नाही. आगमाच्या आधारे चिंतन-मनन करून अरिहंताना द्रव्य - गुण - पर्यायरूपाने जाणून आपल्या आत्मस्वरूपास जाण.. त्याचा निर्णय कर.. अनुभव कर! मोहाच्या क्षयाचा तोच एकमेव उपाय आहे, दुसरा नाही!'

आचार्यदेव गुणस्थान-मार्गणास्थानाचे उदाहरण देत आहेत, परंतु यामध्ये अगदी स्वला सोडून संपूर्ण विश्व (आपले शरीर सुद्धा) आले असे समजावे..... परमार्थाने आपण यांना फक्त जाणू शकतो..त्यांचे काहीही करू शकत नाही.

आत्मज्ञानाने रहित अज्ञानी जीव कदाचित तपाचे द्वारा स्वर्गात सुद्धा जातो, परंतु तेथून येऊन पुन्हा एकेंद्रियादि पर्यायामध्ये जन्म घेऊन परत संसार भ्रमण करतो आणि जो जीव सम्यग्दर्शनाने युक्त आहे, परंतु चारित्र्याने कमजोर असला तरी,तो नारकी, पशू, स्त्री, नपुंसक इ. पर्यायांमध्ये उत्पन्न होत नाही. म्हणूनच सम्यग्दर्शनाला मोक्षरूपी महलाची आधारशिला म्हटले आहे..

सम्यग्दृष्टी जीवाला आपल्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान असते.. त्याला आगमात 'जल से भिन्न कमलवत्!'ची उपमा दिली आहे. तो आपल्या अंतरंगातील सम्यग्ज्ञानाचा दिवा विझू देत नाही.. प्रत्येक परिस्थितीत आपल्या आत्मस्मृतीस जागृत ठेवतो.. विवेकपूर्ण धर्माचरण (बाह्यत: चरणानुयोगाचे पालन आणि अंतरंगात अध्यात्माचे जतन) करून मोक्षपथावर अग्रेसर होतो.

( क्रमशः )

# पट्टमहादेवी-शब्दांपलिकडील अन्वयार्थ
## लेखांक (२४)

**-विपुल खेडकर,** नागपूर मोबा.८८८८८५४४३४

काय बरे सांगायचे असेल स्थपतीला ? मंदिर निर्माणाच्या कार्यात काही विशेष की आणखी काही ? नवीन राणींचे आगमन पट्टमहादेवींच्या जीवनात कोणते नवीन प्रश्न निर्माण करते..... ? बघू या लेखांकात !

**स्वच्छ झाले सगळे आभाळ**

मुख्य स्थपतीने महादेवींसोबत एकान्तात भेट घेण्याची विनंती केली. पट्टमहादेवी म्हणाल्या, 'आपण यादवपुरीला जाण्यापूर्वीही एकदा याबद्दल बोलले होते. परंतु होयसळ घराण्यातील राजस्त्रिया कोणा परपुरुषासोबत एकान्तात बोलत नाहीत. सन्निधानांनी स्वीकृती दिली तर शक्य होईल.'

'सन्निधान परत येईपर्यंत वाट बघणे शक्य नाही. आपण जर माझ्या विनंतीचा स्वीकार केला तर कदाचित माझे जीवनच बदलू शकते.' स्थपतीने पुन्हा एकदा आर्जव केले.

'पट्टमहादेवींसोबत कोणीही असो.... आपले गुपित हे गुपितच राहील. त्यांना आपणास जे सांगायचे ते बिनधास्त सांगा स्थपती!' राजे उदयादित्य आश्वासित करीत म्हणाले.

' ठीक आहे ! मला इथल्या रीतीभातींचा विशेष परिचय नाही. पण माझ्या मनात कोणतीही दुर्भावना नाही.'

विविध शिल्पकारांनी बनविलेल्या शिल्पाकृती न्याहाळतांना एका शिल्पावर पट्टमहादेवींची नजर पडली. अर्धवट तयार झालेल्या त्या मूर्तीत भाव भरणे अद्याप बाकी होते, तर पट्टमहादेवी म्हणाल्या, 'शिल्पात भाव उतरले तर ते क्रियात्मक शिल्प ठरते, अन्यथा उत्कीर्णित पाषाण वाटतो.'

'पट्टमहादेवींची ही अपेक्षा दासोज नक्कीच पूर्ण करतील!' मुख्य स्थपतीने सहजच सांगितले.

'जी आज्ञा ! आम्ही पूर्ण प्रयत्न करू!' दासोज म्हणाले .

पट्टमहादेवींनी केलेल्या बारीक सारीक सूचना अचूक असत. त्यामुळे शिल्पाला एक वेगळीच उंची लाभत असे. त्यामुळेच यावेळी उपस्थित असणाऱ्या अन्य शिल्पकारांनी देखील याची नोंद घेतली आणि आपल्या शिल्पकृतीत भाव भंगिमा प्रगट करण्याची जणू चढाओढ लागली.

मुख्य स्थपतीने पट्टमहादेवींची भेट घेण्याची विनंती केली होती. त्यावर विचार विनिमय केला गेला. स्थपतीच्या आजवरच्या वागणुकीचा आढावा घेऊन विनंती मान्य केली गेली व त्यानुसार मंत्रालयात भेट ठरवली गेली. मात्र महादेवींची विश्वासू चट्टला मंत्रालयात दरवाजाजवळ आतून तर, रेविमय्या बंद दरवाजाबाहेर राहणार होते. बरेच अंतर राखून दोन आसन व्यवस्था करण्यात आली होती. हातांमधे चित्रांचा गठ्ठा घेऊन स्थपती अवतीर्ण झाले. पट्टमहादेवी देखील त्याचवेळी दाखल झाल्या.

'बोला स्थपतीजी ! दरवाजा बंद आहे.. आपल्याला जे सांगायचे ते मनमोकळेपणाने बोला !' पट्टमहादेवी म्हणाल्या.

'आपल्या या कृपादृष्टीबद्दल कृतज्ञ आहे. माझ्या मनावर गेल्या कित्येक वर्षांपासून मणामणाचे ओझे ठेवून मी वाटचाल करतो आहे. आपण बिट्टीगा, मायण-चट्टला सारख्या अनेकांची जीवने ज्या सुंदर पद्धतीने घडविली, त्यामुळे मला देखील माझ्या मनावरील ओझे जाणवायला लागले....' स्थपती बोलू लागले .

'आपल्या दाम्पत्य जीवनात काही कटुता

आहे का?'

'केवळ कटुताच नाही तर विष पसरले आहे....' असे बोलून तो आपले मन मोकळे करू लागला. वडिलांचा मृत्यू आणि एका अपत्य प्राप्तीनंतर निर्माण झालेल्या गैरसमजाने स्थपतीने आपले महिन्याभराचे बाळ आणि पत्नीला सोडून दूरदेशी निघून जाण्याचा निर्णय घेतला, तो आजपावेतो त्याने आपल्या पत्नीचे, मुलाचे मुख बघितले नव्हते. स्वतःच्या नावाची ओळखही अवलिया म्हणून करून देत असे. नाव- गाव -कुळ कशाकशाचा पत्ता लागू देत नसे. हातात अप्रतिम स्थापत्य कला होती, पण दोन दिवसांच्या वर एका जागी न थांबण्याच्या सवयीने कधी कोणाशी जवळीकच केली नाही. होयसळांच्या राज्यात मात्र नाव-गाव-वंशावरून कोणी फारशी छेडखानी केली नाही. त्यामुळे स्थपतीची कला बहरु लागली. जसजशी कला बहरू लागली, तसे तसे मनावरील ओझे हलके होऊ लागले, स्वतःच्या वागण्याचा पश्चाताप डोकावू लागला. त्याचसाठी पट्टमहादेवींशी हा वार्तालाप सुरु होता .

ज्योतिषशास्त्राचे जाणकार असणारे स्थपती, आपल्या मुलाच्या जन्मानंतर त्याची पत्रिका त्यांनी स्वतः तयार केली. ज्योतिषशास्त्रानुसार पत्रिका तयार करतांना पित्याचा स्पष्ट शोध लागत नव्हता. मनात पत्नीच्या अनैतिक संबंधांचे भूत बसले होतेच... त्याला ज्योतिषाची पुष्टी मिळाली आणि कोणाला काही न सांगता घर सोडले. आता मात्र मनात घाईने घेतलेल्या आपल्या निर्णयाचा पश्चाताप डोकावू लागला होता.

पट्टमहादेवींनी स्थपतीच्या ज्योतिष ज्ञानाची परीक्षा घेण्यासाठी एक कुंडली त्यांच्या हाती दिली आणि फळ विचारले, तर ते तंतोतंत निझाले. दुसऱ्या कुंडलीचे देखील परीक्षण करायला लावले... ते देखील शंभर टक्के खरे होते! ते ऐकून पट्टमहादेवी म्हणाल्या,'आपल्या ज्ञानाला दाद द्यावी लागेल...!'

'सन्निधानांनी देखील मानायला हवे तरच माझे सौभाग्य..........'

' मानतील देखील! परंतु आपणही हजारात एकदा चुकू शकताच ना ! आपल्या जीवनाला कलाटणी देणारी एक जन्मकुंडलीच ठरली ना ! बरे, मला तुमच्या त्या कुंडलीचे विवरण सांगा !'

त्यांचे विवरण लक्षपूर्वक ऐकून त्या म्हणाल्या, 'येथे गुरु लग्न वीक्षण करतो ना ! आपले याकडे कसे लक्ष गेले नाही...?'

पट्टमहादेवींचे ज्योतिष विषयातील ज्ञान बघून चकित होऊन स्थपती विचार करीत म्हणाला, 'तो गुरू नीच स्थानी आहे...'

'नीच भंगाला नीच राजयोग आहे ना स्थपतीजी? असो ! आता तुमच्या मनातले किल्मिष निघाले ना !' मनातील इतक्या वर्षांपासूनचे किल्मिष इतक्या सहज दूर होईल, ही कल्पनाच नसलेला स्थपती म्हणाला, 'काट्यासारखे सतत रुतणारे एक टोक तर बाहेर पडले, परंतु आता दुसरे टोक त्याहून तीव्रतेने टोचते आहे.'

'काही दिवस टोचेल आणि बोथट होऊन सहज होईल... आता विचार करणे बंद करा. आपण मोकळ्या मनाने आपल्या भावना व्यक्त केल्यात ना?.... आता सगळे माझ्यावर सोडा आणि निश्चिंतपणे काम करा.'

'आणखी एक विनंती होती, मंदिराचे बाह्य सौंदर्य खुलविण्यासाठी, शिल्पांमधे सजीवता आणण्यासाठी आपण काही नृत्यमुद्रा करून दाखवाल का?.....त्या मी चित्रित करून घेईन !'

'बघू ! यावर सन्निधानांशी चर्चा करूनच ठरवावे लागेल. बराच वेळ होतो आहे...आपणास निघायला हवे!' एवढे बोलून पट्टमहादेवी उठल्या आणि चालू लागल्या.

**फिटे अंधाराचे जाळे उमगती नव्या दिशा**

यादवपुरीत महासन्निधान नूतन राणी लक्ष्मीदेवीसोबत आनंदात होते. लक्ष्मीदेवीने आजपर्यंत आपल्या जीवनात वैभवाला कधी बघितलेच नव्हते. मंदिरातील प्रसाद आणि चढावा हीच तिची संपत्ती ! किती भोग घेऊ आणि किती

नाही अशी तिची स्थिती झालेली, तर तिचे पालकत्व मिरविणारे धर्मदर्शी तिरूवरंगदास तिच्या पदाचा लाभ उठविण्यात मग्न ! त्यांच्या वागण्याचा लोकांना त्रास होऊ लागला, राजमहालाच्या महत्त्वाच्या घटना सामान्य लोकांना सांगून आपले मोठेपण मिरविण्याचा त्यांचा उद्योग सन्निधानांच्या डोक्याला ताप ठरू लागला. महाराज कामकाजाकरिता आपल्या महालातून बाहेर पडले की राणीचे कान भरायला धर्मदर्शी हजर ! महाराजांची पाठ फिरली की जणू पूर्ण महाल आपलाच असण्याच्या तोऱ्यात ! सर्व नोकर चाकर कंटाळायला लागले. आता धर्मदर्शी आपल्या लेकीला गळ घालू लागले की, महाराजांकरवी त्याची नियुक्ती राजधानीत तयार होत असलेल्या नूतन चेन्नकेशव मंदिराचा धर्मदर्शी म्हणून करविण्याची ! परंतु महाराजांनी राणीमार्फत आलेली विनंती धुडकावून लावली आणि राणीला तिच्या पित्यापासून दूर करणे इष्ट समजून अचानक राजधानी वेलापुरीकडे प्रस्थान करण्याचे ठरविले .

महाराजांचे नव्या राणीसोबत आकस्मिक आगमन सर्वांसाठीच घाईगडबडीचे ठरले. ज्या तयारीने स्वागत करण्याची योजना होती, ते शक्य झाले नाही.... तरीदेखील विजयी होऊन आलेले महाराज आणि नुकतीच होयसळ बनलेली लक्ष्मीदेवी यांचे राजपरिवार आणि प्रजेने उत्साहाने स्वागत केले. जवळपास एक वर्षानंतर महाराज आज नगरीत प्रवेशले होते. त्यामुळे महाराजांना कामकाजातून क्षणभराची उसंत मिळत नव्हती, तर लक्ष्मीदेवीला काहीच काम नव्हते! कधी फारसे कोणात मिसळण्याचा संबंध आला नसल्याने कोणाशी काय बोलावे, हे देखील कळत नव्हते. आजपर्यंत केलेले एकमेव काम म्हणजे स्वयंपाक आणि मंदिराची साफसफाई! त्याला इथे वाव नव्हता...बाकी शिक्षण झालेच नव्हते...त्यामुळे रिकामे डोके.......!

मंदिराचे काम आता पूर्णत्वाकडे आले होते. परत एकदा स्थपतीने नृत्यातील भावभंगिमांचा विषय काढला होता. आता जास्त वेळ नाही तेव्हा सन्निधानांशी या विषयावर बोलावे, म्हणून पट्टमहादेवींनी एकान्तात महाराजांना पूर्ण कल्पना समजावून सांगत विचारले, ‘आपणास योग्य वाटत असेल तर मंदिराकरिता मी आपल्या अंतःपुरात स्थपतीला ‘प्रतिमा भंगी’ देऊ कां ?’

‘अरे वा ! छान कल्पना आहे ! मंदिराबाबत सर्व सूत्रे तुमच्यावर सोपविली असतांना माझ्या परवानगीची काय आवश्यकता ?’

‘आपल्या मनात काही नाही....परंतु लोकांचे काय ? त्यांच्या तोंडांना आवर कोण घालेल? सती सीतेची यातून सुटका झाली नाही. प्रभू रामचंद्र देखील हतबल ठरले! उद्या जर असेच उद्भवले तर, सन्निधानांना मान खाली घालायला नको....आज सन्निधान संमती देतील तर ती माझ्यासाठी रक्षा कवच असेल.......’

‘आमच्या पट्टमहादेवींबाबत शंका निर्माण करणारा वाचणार नाही..... देवी, आमची हार्दिक स्वीकृती आहे ! पण तुमच्या मनात अशी शंका आलीच कशी?’

‘राजमहालात राहणारे सर्वच इथले व्यवहार समजू शकतील असे नाही. नव्या राणींचे पालनपोषण खूपच भिन्न वातावरणात झाल्याने त्यांचा बौद्धिक विकास होण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांच्या वैदिक पार्श्वभूमीवर त्यांच्या तोंडून काही निघू शकते म्हणून.....’

‘आपण चिंता करू नका! त्यांना कसे सांभाळायचे हे आम्ही बघतो.... आपल्यासोबत कसे रहावे, याचे काही पाठ आचार्यांनी त्यांना आमच्यासमोरच दिले आहेत.’

‘आता माझ्या मनावरचे ओझे कमी झाले...!’

‘तुमच्यासोबत आणखी कोणी असेल की स्थपती आणि तुम्हीच.....’

‘तसे तर स्थपतीवर शंका घेण्यासारखे काही नाही, तरी देखील चट्टला सोबत असेल आणि बाहेर रेविमय्या थांबतील..’

‘ठीक आहे.’

नंतरचा आठवडा महादेवी आपल्या

महालातून बाहेरच पडल्या नाहीत. त्यांचे जेवणही तेथेच पाठविले जात होते. स्थपतीसाठी हे स्थान प्रतिमा निरूपण स्थान बनले. पट्टमहादेवींनी सुरुवातीलाच स्पष्ट केले होते की, भाव माझे असले तरी, रूप मात्र माझे नको!

स्थपतीने देखील त्यानुसारच चित्रे तयार केली. महादेवींचा हा एकान्तवास नोकर मंडळींच्या लक्षात आला, परंतु कोणी चकार शब्दाने बोलले नाही. कारण कोणाच्या मनात त्यांच्याबद्दल कुशंका नव्हत्या. धाकट्या राणी सगळ्या चाकरमान्यांना विचारत होत्या....मात्र या विषयावर काही बोलण्याचे प्रत्येकाने टाळले! मग तर त्यांनी सरळ सन्निधानांना विचारले.

'दुसऱ्यांच्या विषयात इतकी जिज्ञासा....?' महाराजांनी प्रतिप्रश्न केला .

'पर पुरुषासोबत दिवसचे दिवस महालात घालवीत असतांना आम्ही विचारू नये ?'

'देवी !' महाराजांचा स्वर कठोर तर नजरेत क्रोध झळकत होता.

'काय झाले? काही अनुचित विचारले कां आम्ही?'

'इतक्या हीन दर्जाचा विचार होयसळ राणींना शोभत नाही. आम्हाला पूर्ण कल्पना आहे तेथे काय होते त्याची !'

'महाराजांना माहिती आहे तर, आम्ही राणी असतांना आम्हाला माहिती असायला नको कां?... की या दृष्टीने देखील मी निम्नस्तराची आहे ?'

'हा निम्नस्तरीय व्यवहारच नाही, तर ही परम क्षुद्रता आहे.....!'

'मी क्षुद्र आहे तर माझ्याशी विवाह कां केला?'

'आचार्यांची कृपा तुमच्यावर होती, त्यामुळे वाटले की तुम्ही आपले विचार राजमहालाच्या गरिमेप्रमाणे उदात्त कराल, शिवाय पट्टमहादेवी आणि इतर राण्यांनी स्वीकार केला म्हणून.....'

' जर त्यांची स्वीकृती नसती तर माझ्याशी लग्न केले नसते......?'

'अर्थात् नाही!!'

'सन्निधानांच्या इच्छा-आकांक्षांपेक्षा पट्टमहादेवींच्या इच्छा वरचढ म्हणायच्या ?.... मग आमचे स्थान काय ?'

' येथे सगळ्यांना वैयक्तिक रूपाने समान स्थान आहे. आपल्या महालात प्रत्येकजण स्वतंत्र आहे. मात्र कोणी कोणाकडे शंकित नजरेने बघू नये... एक परिवार म्हणून सगळ्यांनी एकत्र एकोप्याने रहावे... तुम्ही येथे नवीन आहात, तुम्हाला देखील या अनुसारच वागावे लागेल ! तेव्हा आता अनावश्यक शंका काढू नका. योग्य वेळी सगळ्या गोष्टी स्पष्ट होतील....'

' पुढे जर साऱ्या जगासमोर स्पष्ट होणार असेल तर, आत्ता हा एकांत कां?' राणी लक्ष्मीदेवी आपला शंकेखोर हेका सोडायलाच तयार नव्हत्या.

' कार्याची एकाग्रता भंग होऊ नये म्हणून....!'

' असे कोणते कार्य असावे....' त्यांचे वाक्य मधेच तोडत महाराज म्हणाले,

' त्यासाठी कलेचा परिचय असायला हवा, ती प्रतिभा आणि कल्पना असायला हवी ! हे सर्व आपल्यात नाही तर, उगाच डोक्यात राख घालण्यात काही अर्थ नाही. 'यानंतरही सन्निधानांनी वेगवेगळ्या पद्धतीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु प्रश्नाचे समाधान न होता विषय आणखी भरकटत गेला. इतक्यात महाराजांना मंत्रालयात बोलावणे आले आणि ते निघून गेले. राणी लक्ष्मीदेवी देखील आपल्या महालात गेल्या.

घडलेला संवाद स्वतः सन्निधानांनी पट्टमहादेवींना सांगितला. दुसऱ्या दिवशी लक्ष्मीदेवींशी सहज संवाद साधत त्यांना सोबत घेऊनच पट्टमहादेवी मंदिर निर्माण स्थळी आल्या. आज अवकाशाचा दिवस असल्याने सर्वत्र शांतता होती. आधीच निरोप गेल्याने मुख्य स्थपती वाट बघत होते. त्यांच्या निवासस्थानाला देखील त्यांनी कार्यशाळेचे रूप दिले होते. अनेक शिल्पे काही पूर्ण तर काही अपूर्ण रूपात सर्वत्र दिसत होती.

‘ स्थपती, या मंदिरच्या कल्पनेपासून, पायव्यापासून तर आजपर्यंतच्या कार्याबद्दल व शिल्पकृतींबद्दल धाकट्या राणींना जाणण्याची इच्छा आहे. आचार्यांच्या कृपादृष्टीने राणीजी अनुग्रहीत आहेत, तेव्हा त्यांना आपण समजावून सांगा.... हा राजवंश कोणकोणत्या कार्यात रूची ठेवतो, याचा परिचय त्यांना द्या !’

‘ ठीक आहे!’

योग्य आसन व्यवस्था करून दोघीही स्थानापन्न झाल्या. चट्टला दरवाजाशी होतीच. बाहेर पहारेदार होते.

‘ ही मूर्ती... ?’

‘ मूळ मूर्ती ! चेन्नकेशव मूर्ती !’

‘ किती सुंदर आहे! असे वाटते की जणू उठून चालण्यास तत्पर आहे...!!’ छोट्या राणींच्या तोंडून सहज उद्‌गार निघाले.

‘ हा तर पाषाण आहे ना ?’ पट्टमहादेवींनी विचारणा केली .

‘ हो.’

‘ यात जीव असतो ?’

‘असे म्हटले तर लोक हसतील ना !’

‘ तर मग तुम्हाला असे कां वाटले की, ही मूर्ती जणू उठून चालण्यास तयार आहे ?’

‘ मला जे वाटले ते मी सांगितले.....कारण मला माहित नाही.’

‘ या पाषाणात प्राण नाहीत... तरीदेखील प्राण असण्याची भावना निर्माण करणे ही कला आहे! कलाकार जेव्हा शुद्ध मनाने शिल्प निर्माण करतो तेव्हा त्यात जिवंत सौंदर्याची अनुभूती येते.’

इतक्यात स्थपती चित्रांचा गठ्ठा घेऊन आला. एक-एक चित्र लक्ष्मीदेवींसमोर पसरून प्रत्येक चित्र विस्तारपूर्वक समजवायला लागला. त्यातले बारकावे जाणून घेतांना त्या इतक्या तल्लीन झाल्या की, पट्टमहादेवी तेथून कधी निघून गेल्या त्यांना कळलेच नाही. जवळपास सायंकाळ व्हायला आली, तेव्हा चट्टलाने तंद्री भंग केली आणि लक्ष्मीदेवी भानावर आल्या. आपण आणि शिल्पकार दोघेच तेथे आहोत, हे बघून त्या चपापल्या.

त्यांनी चट्टलाला विचारले, ‘मोठ्या राणीसाहेब कुठे आहेत ?’

‘ त्यांना राजमहालातून बोलावणे आले...त्यामुळे त्या तर कधीच्याच निघून गेल्या. आपण एकाग्रतेने बघत आणि ऐकत होत्या... म्हणून आपली एकाग्रता भंग न करता त्या गेल्या....’

धाकट्या राणींचा चेहरा गोरामोरा झाला.सायंकाळ होतच आली होती.त्या महालात परतल्या. रात्री त्यांनी सन्निधानांना विचारले, ‘पट्टमहादेवींना अचानक बोलविण्याचा उद्देश काही राजनैतिक कार्य होते कां ?’

‘ असे काही विशेष नव्हते...स्थपतीसोबत एकट्याने एकांतात राहून राणींना स्थपतीच्या स्वभावाचा परिचय झालाच असेल...!’ महाराज म्हणाले.

‘ तर त्या दिवशीच्या माझ्या शंकेचे हे उत्तर होते म्हणायचे...!’

‘अर्थात् ! शंकेचे योग्य निरसन झाले असेलच असे आम्हास वाटते.’

‘ कलेची अशी अनुभूती या आधी आम्ही अनुभवली नव्हती!’

‘ कलेला व्यक्त करतांना आणि तिचे आस्वादन घेतांना तन्मयतेची आवश्यकता असते, हे तर आपणास अनुभवाने पटले असेल. यासाठी पट्टमहादेवींचा एकांत यज्ञ सुरु होता. एकेका भावभंगिमेचे चित्रण स्थपती करीत होते. त्यामुळे एकांतवासाची गरज होती.....आता काही शंका ?’

आपल्याच विचारांच्या गूढतेत राणी लक्ष्मीदेवी गुंतलेल्या बघून महाराज निघून गेले.

**परीक्षेच्या जंजाळातून कोण सुटे बरे..?**

दुसऱ्या दिवशी लवकरच आपले आटपून धाकट्या राणी पट्टमहादेवींसोबत मंदिर निरीक्षणाला आल्या असतांना, एक नवीनच युवक मुख्य चेन्नकेशव मूर्तीचे निरीक्षण करतांना दिसला. मूर्तीच्या वेगवेगळ्या भागांवर हाताने ठोकून, छिन्नीने प्रहार

करून एकचित्ताने त्याचे परीक्षण चालू होते. इतक्यातच स्थपती तेथे पोहोचले. ते देखील बघू लागले... कोणीही त्या युवकाची तंद्री भंग केली नाही. तो युवक स्वतःशीच बोलला, 'ही शिला दोषपूर्ण आहे. अशा शिलेतून निर्माण झालेली ही मुख्य मूर्ती जर प्रतिष्ठित झाली तर, राजवंश, राज्य सगळ्यांसाठी हानिकारक ठरेल...काय बरे करावे?' स्थपती, पट्टमहादेवी आदि सगळ्यांच्याच कानावर त्याचे हे स्वगत बोल आले. त्यांनी समोर प्रगट होत युवकाला त्याचा परिचय विचारला तर, त्याने आपले नाव-गाव सांगण्यास असमर्थता व्यक्त केली. पट्टमहादेवींनी स्मितहास्य करीत म्हटले, 'काही शिल्पकारांना बहुतेक स्वतःला जगापासून दूर ठेवण्यातच आनंद वाटतो म्हणायचे...!'

सविस्तर चर्चेअंती नव्या युवकाची प्रथम परीक्षा घेतली गेली की खरेच तो शिल्पी आहे की एखादा ऐरागैरा...? शिल्पकार म्हणून त्याच्याकडून एका दिवसात एक छोटी मूर्ती तयार करण्यास सांगितले गेले. त्याची यशस्विता बघून मुख्य मूर्तीच्या परीक्षणास तो योग्य आहे हे ठरविले गेले.

महाराज बिट्टीदेवांच्या तसेच संपूर्ण मंत्र्यांच्या उपस्थितीत दुसऱ्या दिवशी सकाळी मुख्य मूर्ती परीक्षण होणार होते. दरम्यानच्या काळात पट्टमहादेवींनी त्याच्याशी वार्तालाप करीत, त्याच्या गावाचे नाव मोठ्या खुबीने जाणून घेतले. नक्की तो निर्मळ मनाने परीक्षण करणार की कोण्या परकीय सत्तांनी मंदिर कामात विघ्न आणण्यासाठी पाठविलेला हेर आहे, हे शोधण्याचा प्रयत्न केला. या सर्व कार्यात राणी लक्ष्मीदेवींचे पिता म्हणविणारे विघ्नसंतोषी तिरूवरंगदास या दोन शिल्पकारांना एकमेकांविरुद्ध भडकवत होते.... त्या भरात दोघेही प्रतिज्ञा करून बसले की,

' परीक्षणात मी हरलो तर जीभ छाटून टाकेन, हात कलम करेन.....'

त्यामुळे परीक्षणाची वेळ आणीबाणीची आणि उत्सुकतेची होती. अनेक लोक सकाळपासूनच गर्दी करून होते. मुख्य मूर्ती मध्यभागी ठेवली होती. समोर सन्निधान, पट्टमहादेवी, राजपरिवार, मंत्रीगण तर दुसऱ्या बाजूला प्रजाजन !

परीक्षणाच्या दरम्यान पूर्ण मूर्तीला जाड थरातील चंदनाचा लेप लावण्यात आला. फाल्गुन महिन्याचे दिवस असल्याने लेप जाड असला तरी सुकू लागला...... मात्र घटिकाभरानंतरही नाभिप्रदेशाजवळचा लेप सुकला नव्हता. मुख्य स्थपतीने सन्निधानांना नम्रपणे हात जोडत सांगितले की, 'शिला दोषपूर्ण आहे....मी पराजित आहे. परंतु मला प्रसन्नता आहे की, या युवकाला ज्ञानाची-शिल्पकलेची प्रगल्भता आहे....मला माझ्या वचनाची पूर्तता करण्याची अनुमती द्यावी.....!'

'आपली भावना योग्य आहे, परंतु याबाबत पट्टमहादेवी निर्णय देतील!' -युवकाकडे बघून ते म्हणाले, 'परीक्षण पूर्ण झाले ना ?'

' शिला दोषयुक्त आहे हे तर मान्य झाले, परंतु काय दोष आहे हे जाणून घ्यावे लागेल ना !'

' अर्थातच ! आपण ते स्पष्ट करा!' पट्टमहादेवी म्हणाल्या.

' पाषाणात ओलसरपणा आहे. ज्याठिकाणी ओलसरपणा नाही, तेथील चंदन सुकले; परंतु जेथे आर्द्रता आहे, तेथील चंदन ओलेच राहिले आहे.... असा पाषाण मूर्तीसाठी योग्य नसतो.' युवक म्हणाला.

' केवळ ओलच नाही तर, आत पाणी देखील असू शकते....कदाचित जीवजंतू देखील.....!' मुख्य स्थपतीने सांगितले.

' दगडाच्या आत जीवजंतू ? कसे शक्य आहे?'

समोर एक टोपले ठेवले गेले. मूर्तीच्या नाभिप्रदेशावर युवकाने छिन्नी-हाथोड्याने प्रहार केला. शिळेचा एक मोठासा टवका उडाला आणि पाणी बाहेर आले.... आश्चर्य म्हणजे पाण्याच्या प्रवाहासोबत जंगली माशीच्या आकाराएवढा एक बेडूक बाहेर पडला!

' दगडात बेडूक ! अहो आश्चर्यम्....!'

' भगवंताची करणी ! देव तारील त्याला.....!'

लोक आश्चर्याने बोलू लागले. प्रत्येकजण उत्सुकतेने त्या बेडकाला बघत होते. इतक्यात एक मेणा तेथे येऊन थांबला. मेण्यातून एक शालीन स्त्री उतरली. पट्टमहादेवी बोलू लागल्या,

'आज आश्चर्य घडले.... मुख्य स्थपतींकडून शिला परीक्षणाची चूक घडली तर, युवक शिलेच्या आत सजीव प्राणी नसणार याबाबत ठाम होता. त्यामुळे दोघेही हरले आणि दोघेही जिंकले! मात्र यांना दंड काय द्यायचा हा निर्णय आता अवतीर्ण झालेल्या भगिनी करतील.' आणि त्यांना समोर आणण्यात आले. त्यांना बघताच युवकाच्या तोंडून शब्द बाहेर पडले 'आई, तू...?'

तर मुख्य स्थपतीच्या मुखातून उद्‌गार निघाले,

' लक्ष्मी, तू इथे.... ?'

ती स्त्री मुख्य स्थपतीजवळ आली. त्यांना चरण स्पर्श करीत म्हणाली, 'स्वामी, माझ्याकडून काही चूक घडली असेल तर क्षमा करा. पूर्वजन्माच्या पापाने इतके वर्ष आपण मला सोडून गेलात. आपल्या शोधात आपला हा पुत्र डंकण गेल्या तीन वर्षांपासून आपल्याला शोधत फिरतोय्....मी एकटी आपल्या वाटेकडे डोळे लावून बसते... पट्टमहादेवींची कृपा ! काल येथून निरोप आला आणि आम्ही रात्रंदिवस प्रवास करून आत्ता थोड्या वेळापूर्वी येथे पोहोचलो.....!! सन्निधान ! माझी आपणास विनंती आहे, हे दोन्ही पिता-पुत्र हट्टी आणि जिद्दी आहेत... भावनेच्या भरात, मानाच्या आवेशात हात कलम करण्याची भाषा बोलले.... परंतु सृजनाचे हात कधी कोणी तोडतात कां? कृपया आपण उभयतांना माफी द्यावी.'

' डंकण शिल्पी, आपले परीक्षण पूर्ण झाले कां?' महाराजांनी विचारले.

' हो प्रभू.....'

' तर आता सांगा, हे कोण आहेत ? आपल्या मातेनी आपले नाव तर सांगितले.....' महाराजांनी हसत हसत विचारले .

' क्रीडापूरचे जंकणाचार्य....!'

' स्थपती जंकणाचार्य ! आता आपण यायावर म्हणजे अनामिक नाहीत, समजलात?' महाराज म्हणाले.

'हो, समजले!' कान पकडत स्थपती बोलले.

' आपण आणि आपला पुत्र, दोघेही आज आम्हाला वचन द्या....!'

' आज्ञा असावी, सन्निधान!'

' यापूर्वी तुमच्यात काही बोलाचाली झाली, विसंवाद झाला, त्याकडे लक्ष द्यायचे नाही... भगवंताला साक्षी ठेवून सगळे विसरायचे, असे वचन या साध्वीला द्या! तेव्हाच तुम्ही आमच्या आणि आमच्या प्रजेच्या बंधनातून मुक्त व्हाल.'

महाराजांच्या या निर्णयाला प्रजेने एकमुखाने महाराजांचा जयजयकार करीत प्रतिसाद दिला.

महाराजांचा आदेश नि जनतेचा कौल शिरोधार्य ठेवत जंकणाचार्यांनी आपला हात पत्नीच्या हातावर ठेवला, तर पुत्र डंकणने देखील त्यावर हात ठेवला. तिघांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. गेल्या तीन दिवसांपासून गंभीर असणारे वातावरण आनंदविभोर अवस्थेत परिवर्तित झाले.

मुख्य मूर्तीच नव्याने घडवावी की पूर्ण तयार असलेली आणि आता दोषरहित झालेलीच मूर्ती स्थापित करावी काय.....कारण प्राणप्रतिष्ठा उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे.... अशा पेचात काय निर्णय होतो..... प्राणप्रतिष्ठा महोत्सवात वैष्णव मंदिर, जैन राणी यावरून काय काय वादळ उठते.... बघू या पुढील भागात..!

( क्रमशः )

---

**✻ आत्मसाधनेची अपूर्व सुसंधी ✻**

**भाद्रपद शुद्ध पंचमी गुरुवार दि. २८ ऑगस्ट २०२५ पासून दशलक्षण महापर्व सुरु झाला आहे. तरी सर्वांनी आपली शक्ती न लपवता अंतर्बाह्य शुचितेसाठी अहोरात्र प्रयन्तशील रहावे. हा पर्वाधिराज दशलक्षण महापर्व सर्वांच्या मनातील कलुषता दूर करो, ही सद्‌भावना..!!!**

**क्षमावाणी पर्वानिमित्त ''आम्ही सर्वांना क्षमा करतो, सर्वजण आम्हास क्षमा करोत.''**

# ‘सोलहकारण भावना भाय....!’

(लेखांक १२)

हर्षा वेखंडे, नागपूर,९८२२६९०८६०

**अर्हत् भक्ती भावना**

मुक्तागिरीचे नयनमनोहर तीर्थक्षेत्र ! पायथ्याच्या मंदिरासमोरच्या खोलीत मुलांचा किलबिलाट आणि त्यावर शारदाआजींचा मऊसुत हात फिरवणारा धीर गंभीर आवाज... हवेच्या झोतासोबत बाहेर ऐकू येत होता.

आजी म्हणाल्या, ‘आता झोपा रे! उद्या सकाळी माहिति आहे ना काय करायचे ते..’

संवेग म्हणाला,‘लवकर उठायचं आणि एकमेकांचे खांदे पकडून रेल गाडी करायची....’

सक्षम म्हणाला, ‘हो, आणि डोळे उघडायचे नाहीत, इंजिनमागच्या पाच डब्यांची ही झुकझुक गाडी सरळ भगवंतासमोर जाऊन थांबणार!’

‘अगदी बरोबर! दादा, तू रस्ता बरोबर पाहून ठेवला आहेस ना?’

‘हो तर! डोळे मिटून बरोबर पोहचवेन तुम्हाला डायरेक्ट देवासमोर!!’

शारदाआजी म्हणाल्या, ‘अरे, मी असेन ना तुमच्यासमोर .....चला, चला... झोपा आता... सुरू करा णमोकार मंत्र ! उद्या डोळे उघडल्यानंतर प्रथम बघायचं ते अरहंत भगवंतांना. अरहंतांना नमस्कार करायचा आणि मगच इकडे तिकडे बघायचं!’

‘हो आजी...ओके...’ मुलं म्हणाली आणि थोड्याच वेळात मुलांचा श्वास मंद गतीने सुरू झालेला धर्मशाळेच्या त्या खोलीने अनुभवला. सकाळी पाचचे ठोके पडले.आजीने सर्वांना आवाज दिला. संवेगने बाजूच्या सक्षमला हलवलं, ‘सक्षम, उठ ! पण डोळे नको उघडू....!’

सगळे पटापट उठले आणि मंदिराच्या परिसरातील एक-एक इंच जागा पाठ असलेल्या शारदाआजींच्या मागे चेतना, तिचा पदर पकडून संवेग, संवेगच्या खांद्यावर सक्षमचा हात आणि सक्षमच्या खांद्यावर आगम ही रेलगाडी धर्मशाळेच्या ब्रिजवरून पाऊल-पाऊल जोखत देवासमोर जाऊन उभी राहिली.

‘हं... उघडा आता डोळे..!’ शारदाआजी म्हणाल्या. सर्वांनी डोळे उघडले... नजरेसमोर अरहंत भगवंतांची वीतरागी प्रतिमा!

णमो अरहंताणं....एक सुरात आवाज निनादला.

सर्वांच्या नजरा अरहंत भगवंतांच्या प्रतिमेवर खिळलेल्या आणि ओठांवर जिन भगवंतांच्या स्तुतीचे शब्द नाचू लागले..

**जिन प्रतिमा निज दर्शन देकर,**
**है आत्मभाव को सुना रहीं**
**अंतरदृष्टी को खोल जरा,**
**आतम अनुभव की राह यही ।।**

‘आजी, खूप छान वाटलं हो आज. पहाटे उठून डोळे मिटून दर्शनासाठी जायचं... खूपच गंमत आली!’ संवेग म्हणाला.

‘आज गुढीपाडवा....मराठी नवीन वर्षाचा पहिला दिवस. आमच्या लहानपणी आम्ही गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे असंच देवदर्शन करायचो. सूर्यकिरण पृथ्वीवर पोहोचण्याआधी आम्ही मंदिरात असायचो. शांत मंदिर आणि समोर अरहंत भगवंतांची मूर्ती....ते अपूर्व क्षण मी कधीच विसरले नाहीये.’

‘पण आजी, ही प्रथा का पडली हे नाही कळलं... देवदर्शन तर नंतर पण करता आलं असतं ना..’ इति संवेग.

‘बाळांनो, अरहंत भगवंतांची भक्ती सर्वात महत्त्वाचं कार्य आहे....ते आदर्श आहेत आपले ! अभ्यास-शाळा, त्यानंतर नोकरी-बिझनेस कशासाठी करतो आपण? चांगले पैसे मिळावेत आणि छान सुखात राहता यावं या जन्मात...पण

माहितीये ना तुम्हाला, या जन्मातलं कुठलंही वैभव आपण पुढल्या जन्मात नेऊ शकत नाही.....परत पुढल्या जन्मात तीच धडपड ... अरे, किती फिरायचं या चक्रात! त्रासदायक आहे हे सारं...

अरहंत भगवान सुटले आहेत या चक्रातून.. आता परत त्यांचा जन्म नाही... म्हणजे मरणही नाही.. जन्म-मरणाच्या चक्राचा नाश केला आहे त्यांनी.. अनंत सुखी झालेत ते.. आपल्याला पण तर सुख हवंय्.. कधीच न संपणारं... जसं त्यांनी मिळवलं आहे तसंच....म्हणून ते आदर्श आहेत आपले.... अर्थातच पहिलं नमन त्यांनाच असायला हवं...'

अत्यंत लक्षपूर्वक भगवंताच्या प्रतिमेकडे बघत असणाऱ्या नातवांना आजी सांगत होत्या.... 'काय संवेग, गती माहिती आहेत ना तुला किती आहेत त्या?'
'होय आजी, मनुष्यगती, तिर्यंचगती, देवगती आणि नरकगती.'

'आता हे तीर्थंकर भगवान या चारही गतींमधल्या कुठल्याही गतीत जाणार नाहीत. पंचमगती म्हणजे सिद्धगतीला प्राप्त होणार....परत कुठला जन्म नाही त्यांचा.... भ्रमणातून सुटले ते.... आमचेही ध्येय तेच आहे, म्हणून अरहंतांचं दर्शन सर्वप्रथम ! दिवसाची सुरुवातच त्यांच्या गुणगौरवाने व्हावी... त्यांची स्तुती-भक्ती करण्याचे भाव यावेतच मनात....सकाळी उठून त्यांच्या पुढे उभं राहावं आणि म्हणावं, हे देवा, मला नाही जन्मायचं-मरायचं. तुमच्यासारखंच मलाही सुटायचंय. हा निर्णय अरहंत भगवंतांकडे बघून आमचा व्हावा. जे आपल्याला आवडतात, हळूहळू आपण त्यांच्यासारखे होत जातो... म्हणूनच आवड आणि निवड उत्कृष्ट असावी आपली!'

'अगदी बरोबर आहे, आजी तुमचं, पण सिद्ध भगवानही मोक्षाला गेलेत. असं असूनही अरहंत भगवंतांच्या भक्तीचं एवढं महत्त्व का बरं?' सक्षमच्या मनातील प्रश्न संवेगने उचलून धरला.

'कारण आहे बरं का! अरहंत भगवानच पुढे सिद्ध होतात,पण सिद्ध झाल्यानंतर मात्र त्यांची वाणी खिरत नाही. त्यामुळे आम्हा संसारी जीवांना मोक्षमार्ग सिद्ध भगवंतांकडून कळत नाही. आम्ही आमच्या हिताच्या दृष्टीने प्रथम वंदन अरहंतांना करतो. त्यांच्या वाणीतूनच आम्हाला मोक्षमार्ग कळतो, म्हणून अरहंत भगवंतांच्या दर्शनाचं आणि स्तुतीचं महत्त्व आहे.

आपल्याला शाळा-कॉलेजमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांचा, आरोग्याची काळजी घेणाऱ्या डॉक्टरांचा, या जन्मात ज्यांचे ज्यांचे उपकार आहेत, त्या सर्वांचा किती आदर करतो आपण.... तीर्थंकर भगवंतांची वाणी तर जन्म-जन्माच्या हिताचं कारण आहे....ती अरहंत अवस्थेतच खिरते. मग अरहंत भगवंतांच्या दर्शनाचा भाव असायला हवा की नको? आणि हो, अरहंतांच्या भक्तीचं फळ माहिती आहे का काय आहे? संसारातल्या सर्वश्रेष्ठ पदाची प्राप्ती अर्थात तीर्थंकर पदाची प्राप्ती..'

'आजी, देवदर्शनाने म्हणजे अरहंत भगवंतांच्या दर्शनाने डायरेक्ट तीर्थंकर होतो का ग जीव?' मुलांमधून आवाज आला.

हसून आजी म्हणाल्या, 'इथे कुठला शॉर्टकट नाही बरं का! जीव क्रमाक्रमाने तीर्थंकर पदापर्यंत पोहोचतो. सुरुवात अरहंतांच्या दर्शनाने घडते हे मात्र खरं!!
श्री प्रवचनसार या ग्रंथातील ८० क्रमांकाची गाथा फार महत्त्वाची गाथा आहे. या गाथेत कुंदकुंदाचार्य म्हणतात...

**जो जाणदि अरहंतं दव्वत्तगुणत्तपज्जयत्तेहिं।**
**सो जाणदि अप्पाणं मोहो तस्स खलु जादि लयं।।**

जो अरहंतांना द्रव्यपणे, गुणपणे आणि पर्यायपणे जाणतो, तो आपल्या आत्म्याला जाणतो. त्याचा मोह अवश्य नष्ट होतो.

मोक्षाला जाण्याआधी जीवाच्या मिथ्या मान्यता म्हणजे मोह नष्ट होणे आवश्यक, ही पहिली पायरी आहे, ज्याला सम्यग्दर्शन म्हटलं जातं. ते काम होणार अरहंतांना जाणण्याने!

अरहंतांना जाणण्यासाठी त्यांचं दर्शन महत्त्वाचं नाही का? म्हणूनच देवदर्शन अर्थात जिनदर्शन महत्त्वाचं. जिनदर्शनाने आत्मदर्शन होतं,आत्मा समजतो... मात्र त्यासाठी कशा पद्धतीने अरहंतांचं दर्शन करायचं ही विधी महत्त्वाची आहे.

जिनबिंब दर्शन हे सम्यग्दर्शनाचं निमित्त कारण आहे. त्यासाठी अरहंत भगवंतांचं दर्शन करताना कुठलं चिंतन असावं हे जिनवाणी सांगते.

अरहंत भगवान जीवद्रव्य, तसाच मी देखील जीवद्रव्य. अरहंत भगवंतांचे अनंत गुण तसाच मीसुद्धा अनंत गुणांचा पिंड आहे आणि अरहंत भगवान सतत जाणण्याचं काम करत आहेत तसाच जाणणारा मी आहे.

अशाप्रकारे अरहंत भगवंतांच्या द्रव्य-गुण-पर्यायासारखे माझेही द्रव्य-गुण-पर्याय आहेत. माझाही स्वभाव तोच बरं का! केवळ जाणणे माझं काम!!

ही गाथा म्हणते आहे की, 'जो अरहंत भगवंतांसारखा मी आहे' अशा चिंतनात उतरतो तो स्वतःच्या आत्मस्वरूपाला ओळखतो. त्याला सम्यग्दर्शन होतं. अरहंत भगवंतांची भक्ती उसळून येते आणि असा सम्यग्दृष्टी जीव तीर्थंकर नाम कर्माचा बंध करून निज ज्ञानानंद स्वभावात रमत हळूहळू तीर्थंकर पदापर्यंत पोहोचतो...'

'आजी, अरहंत भगवान नाहीत ना आता या पंचम काळात? मंदिरात स्थापन केलेली तर त्यांची मूर्ती आहे. त्यांच्याकडे बघून मला काय कळणार?' सक्षम बोलला.

'बघा हो मुलांनो, आपण स्तुतीत काय म्हणतो..

**जिनदर्शन है मंगलाचरण प्रातः प्रतिदिन नित्य करू..**
**बाह्यहेतु सम्यग्दर्शन का परमातम का ध्यान धरू..**
**प्रथम दृष्टी में देख दृष्टी को आत्मभाव के दर्पण वे..**

जिनवाणी सांगते ना आम्हाला त्यांचं स्वरूप समजावून आणि प्रतिमाही काही सांगते बघा.. बघा अरहंत भगवंतांच्या डोळ्यांकडे... कसे आहेत ते? डोळ्यांमधून भाव कळतो म्हणतो ना आपण ! डोळ्यांमध्ये उग्रता नाही..ते जणू सांगताहेत माझ्या स्वभावातही क्रोध नाही. डोळे उंचावलेले नाहीत... स्वभावात मान कषायही नाही. डोळ्यांत वक्रता नाही... स्वभावात माया कषाय नाही. डोळे अंतर्मुख आहेत... लोभ कषाय नाही स्वभावात. लोभी माणूस सतत बाहेर नजर खिळवून असतो. त्याला जे हवं असतं त्याच्यावर... पण अरहंतांचे डोळे मात्र अंतर्मुख दिसतात.तसाच आहे बरं का मी स्वभावाने! आपल्या स्वभावात क्रोध-मान-माया-लोभाचा प्रवेशही नाही, असा माझा स्वभाव आहे, अरहंत भगवंतांसारखा शुद्ध. अरहंत भगवंतांकडे बघून कळतो तो!

अरहंतांच्या स्तुतीतून त्यांचं वैभव कळतं, त्यांचे अतिशय कळतात..... समवशरणाची महिमा येते. बाह्य वैभवापासून अलिप्त आणि आत्मस्वरूपात रममाण झालेले...!

पूज्य अरहंत भगवंतांच्या वैभवाचं वर्णन त्यांच्या ४६ मूलगुणांमधून कळतं. त्यांचे मूलगुण ४६ असतात आणि उत्तर गुण तर अनंत असतात. अरहंत भगवान १८ दोषांनी रहित असतात बरं का ! त्यांच्या ४६ मूलगुणांपैकी.. अनंत चतुष्टय-४, अष्ट प्रातिहार्य- ८, अतिशय-३४ असे एकूण ४६ गुणांचे अधिपती आहेत, अरहंत भगवान. थोडक्यात सांगते या गुणांना....

१) अनंत चतुष्टय म्हणजे अरहंतांचं अनंत काळ टिकणारं वैभव.

अ) अनंत ज्ञान : ज्ञानावरण कर्मांचा नाश झाल्यानंतर अनंत ज्ञान किंवा केवलज्ञान प्रगट होतं. विश्वातील सर्व द्रव्यांच्या भूतकाळातील, वर्तमान काळातील आणि भविष्य काळातील अवस्थांचं एकाच वेळेस संपूर्ण ज्ञान होतं,सर्वज्ञता प्राप्त होते.

ब) अनंत दर्शन : दर्शनावरण कर्माचा संपूर्ण क्षय झाल्यानंतर अनंत दर्शन प्राप्त होतं अरहंतांना. अनंत दर्शन म्हणजे तीनही लोकातील तीनही काळातील सर्व द्रव्यांचं एकाच वेळेस सामान्य अवलोकन करता येतं, अर्थात् निराकार प्रतिभास होतो. हे अनंत दर्शन आहे.

क) अनंत सुख : मोहनीय कर्माच्या क्षयपूर्वक आत्म्यात प्रगट होणाऱ्या अतींद्रिय सुखाला अनंत सुख म्हणतात. अनुपम आहे हे सुख! सुखाच्या पाठीमागे धावतो ना आपण..अरहंत अवस्थेतील हे सुख कधीच नष्ट होत नाही. या सुखासाठी इंद्रियांची आवश्यकता असत नाही...आहे ना अद्भुत?

ड) अनंत वीर्य : अंतराय कर्माचा क्षय झाला की आत्म्यात अनंत शक्ती प्रगट होते, त्या शक्तीला अनंत वीर्य म्हणतात

२) अष्ट प्रातिहार्य- अरहंतांची महिमा प्रगट करणाऱ्या आठ विशिष्ट सातिशय दिव्य वस्तूंना अष्ट प्रातिहार्य म्हटलं जातं. जिथे जिथे तीर्थंकर भगवान विराजमान होतात, तिथे तिथे हे वैभव सतत त्यांच्यासोबत असतं.

अशोक वृक्ष, सतत होणारी पुष्पवृष्टी, दिव्य ध्वनी, इंद्रांद्वारे ६४ चामर तीर्थंकरांवर ढाळले जाणं, त्यांचं रत्नजडित सुवर्ण सिंहासन, भगवंतांचं आभामंडळ ज्यात जीवाला आपल्या सात भवांचं दर्शन होतं ते भामंडल, देवतांद्वारे केला जाणारा वाद्यांचा मधुर ध्वनी अर्थात दुंदुभीनाद, तसेच तीर्थंकरांच्या मस्तकावर झुलणारी तीन छत्रे....असं वैभव संसारातील इतर जीवांना प्राप्त होणं केवळ अशक्य आहे.

३) ३४ अतिशय- तीर्थंकरांच्या जन्माच्या वेळी तसेच केवलज्ञान होतं त्यावेळी अलौकिक चमत्कारिक घटना घडतात. त्यांना अतिशय म्हणतात. जन्माच्या वेळेस १०, केवलज्ञानकालीन १० आणि केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर देवांद्वारे केलेले १४, असे एकूण ३४ अतिशय असतात.

मुलांनो, अशा ४६ गुणांचे अधिष्ठाता तीर्थंकर भगवान असतात.'

शारदा आजीकडे मोठे मोठे डोळे करून सक्षम बघत होता. जणू भगवंतांचं वैभव त्याच्या डोळ्यात मावत नव्हतं... हे बघून शारदा काकू सक्षमला म्हणाल्या,'तुला माहिती आहे ना अरहंत भगवान १८ दोषांनी रहित असतात ते..'

सक्षम उत्साहाने म्हणाला, 'हो तर, पाठ आहे मला! जन्म, जरा म्हणजे वृद्धत्व, तृष्णा (तहान), क्षुधा (भूक), विस्मय, अरती, खेद (दुःख), रोग, रती, गर्व, मोह, भय, निद्रा, चिंता, स्वेद, राग, रोष, मृत्यू हे दोष अरहंत भगवंतांना नसतात.'

शारदा आजी कौतुकाने म्हणाल्या, 'अरे वा, खूप छान! आणि मुलांनो, जरी मंदिरातील प्रतिमा मुख्यतः तीर्थंकरांच्या असतात तरी, तीर्थंकर अरहंत केवली व सामान्य अरहंत केवली या दोघांचीही अंतरंग शुद्धता, म्हणजे अनंत चतुष्ट्य, वीतरागता समानच असते. फरक असतो तो बाह्य विभूती आणि अतिशय आदिंमध्ये, बरं का!

बाळांनो, अरहंतांची अशी महिमा आहे....ती जाणून त्यांच्याप्रति भक्तीचे भाव उसळून येतात. म्हणूनच मुलांनो, जिथे कुठे जाल तिथे अरहंत भगवंतांच्या दर्शनाला अवश्य जा. त्यांचं आंतरिक वैभव त्यांच्या प्रतिमेत बघा.....असाच माझाही स्वभाव आहे हे जाणून अत्यंत भक्तीपूर्वक त्यांना वंदन करा.

मी लवकरच त्यांच्यासारखा होऊ दे.. हे कोरून घ्या मनावर मंदिर सोडण्याआधी! त्यांचा उपदेश समजून घेण्याचा प्रण करा आणि मगच पाऊल मंदिराच्या बाहेर टाका. चला, आता अरहंत स्तुती म्हणू या.-

**जयाची महाघोर कर्मे निमाली,**
**खरी ज्ञानदृष्टी जया प्राप्त झाली।**
**सुखाचाच जो मार्ग दावी जगला,**
**सदा भक्ती भावे नमो त्या जिनाला॥**

**( क्रमशः )**



**अध्ययन से उपाधी मिलती है और स्वाध्याय से समाधी मिलती है ।**

आ. बा.ब्र. रविन्द्र जी आत्मन्,
जिनशासन प्रभावना, जबलपूर

# रामायण आणि महाभारतातील व्यक्तिरेखांचे तौलनिक विवेचन

(लेखांक-५)

**डॉ. सौ. लीना चवरे,** कारंजा-लाड
(९४२२५८८३३५)

**रामायणातील राक्षस : जैनेतर विद्वानांच्या नजरेतून**

जैन रामायणाने राक्षस म्हणजे एक मनुष्य समाजच असे नि:संशय आणि ठामपणाने सांगितले आहे. मागील भागात या विषयी चर्चा केली आहे. जैन रामायणात राक्षसांच्या लंकेचे आणि इतरही नगरींचे वर्णन येते. ते अतिशय वैभवशाली आणि समृध्द म्हणून आणि राक्षसांचे वर्णन येते ते नाना विद्यांनी युक्त, बुद्धिमान, सुस्वरूप, पराक्रमी म्हणूनच. राक्षस हा एक मानववंशच होता आणि अनेक क्षेत्रात त्यांनी प्रगती केलेली होती हे जैन रामायण वाचताना पदोपदी जाणवत राहते. जैन रामायणातील राक्षसांचे वर्णन अधिक ग्राह्य असावे हे भालबा केळकर, डॉ. प्र. न. जोशी, पं. सातवळेकर इत्यादी वाल्मिकी रामायणाचे संपादन करणाऱ्या विद्वानांनी मांडलेल्या विचारांवरून वाटते.

प्रा. भालबा केळकर आपल्या प्रस्तावनेत लिहितात, 'हनुमंताची सीताशुद्धी व लंकादहन - या घटनातील लंकेचा तपशील राक्षसांच्या ऐहिक वैभवाचे वर्णन देतो. यावरून राक्षस जमात ऐहिक ज्ञानात सुधारलेली, कर्तबगार पण राक्षसवृत्ती जमात होती हे जाणवते. राम-रावण संघर्ष हा मानसिक सुशिक्षणाने सुधारलेल्या सद्वृत्त मानव समाजाचा भौतिक सुधारणेने दुर्वृत्त राक्षसवृत्ती समाजाशी संघर्ष होता, असे वाटते. हनुमंत लंकेत गेला, तेव्हा रावणाने त्याच्याशी तो दूत असताना केलेले वर्तन राक्षसवृत्तीशी साजेसे होते. विभीषण हा सुसंस्कृत राक्षस होता हेही जाणवते.' ( संदर्भ : प्रा. भालबा केळकर - श्री वाल्मिकी रामायण -भाग २, पृ. ८) शिवाय राक्षस दिसण्यात कुरूप नसून ते सुस्वरूप होते असेही भालबा केळकर म्हणतात. - 'रावणाचे वर्णन एक सुंदर पुरूष म्हणूनच आहे. मंदोदरीसारख्या सौंदर्यवतीशी त्याचा विवाह झालेला. तेव्हा शूर्पणखेचे कुरूपत्व हे तिच्या मनाचे कुरूपत्व असणे जास्त शक्य. तिच्या वस्तुनिष्ठ, भोगलोलुप संस्कृतीशी जुळणारी तिची तप्त भोगेच्छा, तिच्या मादक सौंदर्याला साजेशीच असणार. शूर्पणखा मुळातच रूपाने कुरूप असती तर लक्ष्मणाने नाक कापल्यावर आणखी कुरुप ती काय होणार? तिने आपल्या मादक सौंदर्याचा प्रभाव रामावर पडत नाही असे पाहून, ती सीतेवर धावून गेली.' (संदर्भ : प्रा. भालबा केळकर - श्री वाल्मिकीरामायण - भाग २, पृ. ६ )

प्रा. भालबा केळकरांना ज्याप्रमाणे राक्षसांची कुरूपता ही शरीराची नसून मनाची असावी असे वाटते, त्याचप्रमाणे डॉ. प्र. न. जोशी यांना राक्षसीपणा हा शरीराचा विशेष नसून ती अंतरंगातील राक्षसी वृत्ती असावी आणि म्हणून त्यांना 'राक्षस' म्हणून संबोधिले गेले असावे, असे वाटते. पौराणिक कथा व लोकांमध्ये प्रचलित समजूतीमधील राक्षसांशी त्यांचा संबंध नाही हे सांगून ते म्हणतात, 'त्यांच्या नीतिकल्पना, समाजव्यवस्था, आचार याविषयीची माहिती पाहिली असता राक्षस ही एक रानटी जात होती, असे मानणे धाडसाचे होणार आहे. तरी मानवी समाजाशी या सर्व बाबतीत त्यांची एकरूपता होती, असे मात्र नव्हे. इतर मनुष्यजातींशी ते व्देष करीत असले तरी ते त्यांच्याशी मिसळत व संबंध ठेवीत असत. स्पष्टपणे बोलावयाचे म्हणजे त्यांचा रानटीपणा सुधारलेला होता व हाच या दोन समाजांमध्ये भेद होता. मनुष्याहून त्यांची जाती भिन्न

नव्हती, तथापि वरील भेद त्यांमध्ये उज्ज्वल होता.' (संदर्भ : डॉ. प्र. न. जोशी – सार्थ श्री वाल्मिकी रामायण – खंड ५, पृ. १९८ )

रामायणातील राक्षस हा परीकथेतील राक्षस नव्हे. म्हणूनच ते पुढे म्हणतात, 'राक्षसांविषयीच्या परंपरागत कल्पनेवरून त्या जातीचा प्राणी आता नष्ट झाला असावा अशी आपली समजूत होते. परंतु वरील विवेचनावरून मनुष्यप्राण्यांचा तो एक वर्ग होता, असे लक्षात आले असता त्याचा शोध पृथ्वीच्या पाठीवर कोठेतरी अज्ञात प्रदेशात करावयाचा नसून आपल्यातच करावयाचा आहे, हे कळून चुकते.'

पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर हे सुध्दा ठामपणे सांगतात की राक्षस हे मनुष्यच होते. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ ते उत्तरकाण्डातील श्लोकांचा दाखला देतात. –'प्रजापतीने जलाच्या रक्षणासाठी जे प्राणी उत्पन्न केले, ते 'मानव' म्हणजे 'मनुष्य' होते व त्यांस 'रक्षण करा' म्हणून आज्ञा केली. त्यांपैकी, ज्या मानवांनी रक्षण करण्याची कामगिरी पत्करली ते 'मानव' 'राक्षस' या नावाने प्रसिध्द झाले. आणि ज्या मानवांनी केवळ यजन करण्याचेच पत्करले, ते 'मानव' 'यक्ष' या नावाने प्रसिध्द झाले. अर्थात् 'राक्षस' हे मनुष्येतर विजातीय प्राणी नसून मनुष्यच आहेत, हेच सिध्द होत आहे. म्हणजे 'रक्षण करणारा' असा राक्षस शब्दाचा अर्थ आहे.' (संदर्भ : पं. सातवळेकर –रामायण –खंड १, पृ.४१५ )

राक्षस हे मनुष्यच होते हे सिध्द करण्यासाठी आणखी एक उदाहरण देता येईल. राक्षसांची युध्दशास्त्रातील प्रगती वाखाणण्यासारखी होती. ज्यावेळी प्रभू रामचंद्रांच्या फौजा किष्किन्धेहून निघून समुद्रकिनाऱ्यावर जाऊन पोहोचल्या तेव्हा आता युध्दाचा प्रसंग येणार हे जाणून रावणाने आपले मंत्रीमंडळ बोलाविले व काय उपाय करावा या प्रश्नावर मसलत केली. तेव्हा वज्रद्रंष्ट नावाचा सेनापती त्यावर उपाय सुचवू लागला. – 'इच्छेस येईल तो वेश धारण करुन तदनुरूप बतावणी करण्यात कुशल, शूर, दिसण्यात रूबाबदार व मोठे पराक्रमी असे काही हजार राक्षस सैन्यातून निवडून काढावेत व त्यांचे एक पृथक सैन्य तयार करावे. त्या सैन्याने रामाच्या सैन्यासारखा गणवेश धारण करून अगदी निर्भयपणे– न घाबरता रामापाशी जाऊन त्यास सांगावे की, 'आपले धाकटे बंधू भरत यांनी आम्हास आपले सहाय्यार्थ आपलेकडे पाठविले आहे व तेही आणखी सैन्य बरोबर घेऊन, आपल्या मदतीस्तव पाठोपाठ लवकरच येत आहेत.' असे सांगून रामाच्या सैन्यात मिसळावे. त्यानंतर आपण येथून सर्व शस्त्रास्त्रांनी सज्ज असे आपले सैन्य नेऊन, गणश: म्हणजे निरनिराळ्या तुकड्यांना आकाशामध्ये उभे करून, तिथून खाली उभे असलेल्या वानरसैन्यावर शस्त्रास्त्रांचा वर्षाव करू व ते सर्व वानरसैन्य यमसदनी पाठवू.....सूचना दिल्याबरोबर त्यापूर्वीच्या वेशान्तर करून रामाच्या फौजेत गुप्तपणे मिसळलेल्या सैन्याने आतल्या आत वानरसेनेची कत्तल करावी व वरून आकाशातून आपण शस्त्रास्त्रांचा मारा करून, तिचा नाश करावा, असा वजद्रंष्टाचा आशय.' (संदर्भ : पं. सातवळेकर – रामायण खंड १, पृ. ३९२–३९३ )

यावरून दोन गोष्टी अगदी स्पष्ट होतात. एक म्हणजे राक्षसांना आकाशयुध्दासारखे प्रगत युध्दशास्त्र अवगत होते. म्हणजेच ते भौतिकदृष्ट्या प्रगतीपथावर होते आणि दुसरी गोष्ट म्हणजे राक्षस हे मनुष्यच होते. कारण रामाच्या सैन्यात मिसळल्यानंतर ते ओळखायला सुध्दा येणार नाहीत ही गोष्ट त्यांचे मनुष्यत्व सिध्द करते. ते विक्राळ स्वरूपाचे असते तर सहजच लक्षात आले असते. म्हणूनच पं. सातवळेकर म्हणतात, 'ज्या अर्थी या राक्षसांचे आचार, विचार, धार्मिक संस्कार, व्यवहार, सामाजिक नीति, राजनीति, मनोवृत्ती व शरीराची आकृती इत्यादिकांचे मनुष्याच्या सर्व गुणांशी पूर्णपणे साम्य आहे, त्या अर्थी राक्षस हे मनुष्याहून भिन्न, असू शकत नाहीत. म्हणजे राक्षस हे मनुष्यच आहेत, हे निर्विवाद सिध्द होत आहे.' (संदर्भ वरीलप्रमाणे –पृ. ४२९ )

अशाप्रकारे 'राक्षस' आणि 'वानर' या संज्ञांबद्दल निरनिराळ्या विद्वानांच्या मतांचे अवलोकन केले असता आणि दोन्ही रामायणांवर नजर टाकली असता वाल्मिकी रामायणातील राक्षस आणि वानर यांचे चित्रण अस्पष्ट, धूसर जाणवते. तसेच परस्परांना छेद देणारी विधानेही आढळून येतात. उपर्युक्त विद्वानांनी मौलिक चिंतन करून हा अस्पष्टतेचा, धूसरतेचा पडदा बऱ्याच अंशी दूर केलेला आहे. याऊलट जैन रामायणात मात्र 'राक्षस' आणि 'वानर' यांचे चित्रण अगदी स्पष्टपणे केले असून त्यांना नि:संशय मानव म्हणूनच संबोधिले आहे. एकंदरीत, राक्षस आणि वानरांच्या आचारविचारांवर नजर टाकल्यास व त्यांनी युध्दशास्त्र, स्थापत्य तसेच इतरही क्षेत्रात केलेली प्रगती बघता राक्षस आणि वानर हे प्रगत मानवसमाज होते , या जैन रामायणातील मताला पुष्टी मिळते.

पुढील भागात महाभारताबद्दल....

( क्रमशः )

---

## गुरुदेवश्री समंतभद्रजी : एक सुगंधी चंदन



प. पू. गुरुदेवांची कीर्ती,जणू सुगंधी चंदन
गुरुदेवांना, माझे कोटी कोटी वंदन...।।धृ.।।

मातापित्यांनी दिली, देवचंदांना स्फूर्ती
सद्गुणी गुरुदेवांनी मिळिवली जगी कीर्ती
महाराजांच्या पावलांनी पावन झाली धरती
हित-मित-प्रिय वचन, वाणीने जिंकले मन...।।१।।

गुरुकुल प्रणालीचा घातला त्यांनी पाया
गुरुकुलातील बालकांनाही लावली माया
समाजहितासाठी चंदनासम झिजवली काया
करूया विश्वाच्या अंतापर्यंत त्यांच्या विचारांचे मंथन...।।२।।

पत्र पीयूष, गुरुदेवांच्या भावनांचे किंमती दर्पण
तन, मन केले त्यांनी समाजाप्रती अर्पण
उच्च,उन्नत ध्येय बाळगून केले देशासाठी समर्पण
पडतील शब्द कमी करण्यास गुरुदेवांचे वर्णन..।।३।।

गुरुदेवांची पंचसूत्री जगी ठरली थोर
धार्मिक नैतिक, आध्यात्मिक शिक्षणाचा केला प्रसार
शील, ज्ञान, प्रेम, सेवा नि व्यवस्थेने
नाहिसा केला अंधःकार
गुरुदेवांच्या उपदेशाचे करूया मनी सिंचन...।।४।।



**सौ. उज्ज्वला इंगळे,** स. शिक्षिका, कंकुबाई माध्यमिक कन्या शाळा,
कारंजा (लाड), जि. वाशिम,
दि.१८ ऑगस्ट २०२५

# दिगंबर जैन समाज आणि कर्मवीर भाऊराव पाटील

श्री. महावीर मुळे,
९२२६१३२७००

भारतातील आद्यधर्म आणि भारताची आद्य संस्कृती म्हणून दिगंबर जैन धर्माकडे पाहिले जाते. असा हा धर्म फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. आधुनिक काळातील अनेक देश विदेशातील इतिहासकारांनी दिगंबर जैन समाजाची प्राचीनता मान्य केली आहे.

जैन धर्माला पुढे नेणारे तसेच जैन संस्कृती रुजवणारे व या धर्माचे प्रणेते भगवान ऋषभदेव ते भगवान महावीरापर्यंत दिगंबर जैन धर्म प्रवर्तन करणारे २४ तीर्थंकर होऊन गेले. म्हणूनच त्या काळापासून ते आजपर्यंत जैन धर्मीयांचे स्वतंत्र अस्तित्व टिकून आहे. अशा या महान वैभवशाली दिगंबर जैन समाजात ऐतवडे गावची शेतकरी पायगोंडा व गंगाबाई यांच्या पोटी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी २२ सप्टेंबर १८८७ रोजी जन्म झाला.

हे गौरवशाली खानदानी पाटील घराणे धार्मिक व सुसंस्कृत होते. त्यांच्या कुटुंबाला त्यागाची फार मोठी परंपरा आहे. या घराण्यातील एक पूर्वज नेमगोंडा जिनगोंडा पाटील यांना जिनसेन भट्टारक मठाचा गादीचा मान होता. त्यांनी दिगंबर दीक्षा घेतली आणि १८२० साली सल्लेखना व्रत घेऊन भिलवडी येथे देहत्याग केला. नेमगोंडा पाटलांना शांतगोंडा हा एकच मुलगा होता. तेही शांत व चारित्र्यसंपन्न होते. ते जिनसेन मठात भट्टारक होते. त्यांनी मठाला जमीनी मिळवून दिल्या. १८२५ साली त्यांनी श्रवणबेळगोळची यात्रा केली होती. १८५४ साली नांदणी येथे त्यांनी समाधी घेतली. यानंतर त्या पिढीतील देवगोंडा हेच भाऊरावांचे आजोबा होते. यांना समाजात मानसन्मान होता.

असा जैनधर्मीय वारसा लाभलेल्या कुटुंबाचे कर्मवीर भाऊराव पाटील हे वारसदार होते.

१९३३ साली नांदणी मठाचे भट्टारक पट्टाचार्य यांनी भाऊरावांना पत्र लिहून त्यांच्या वंशजाचा सन्मानपूर्वक उल्लेख करून मठाच्या कार्यात सक्रीय राहण्याविषयी लिहिले होते. कर्मवीरांना धर्माचे मर्म माहित होते. त्यांनी मानव धर्म आचरणात आणून तो इतरांनाही शिकविला. कर्मवीरांच्या काळी जैन समाजात नवयुगाचा आणि प्रबोधनाचा प्रारंभ झालेला होता. सामाजिक सुधारणेसाठी त्या काळातील अनेक सुधारक पुढे आले. त्यामध्ये अण्णासाहेब लठ्ठे, दिवाण बहादुर चौगुले, माणिकचंद हिराचंद, हिराचंद नेमचंद, धर्मवीर भूपाल जिरगे, बळवंतराव धावते, निटवे शास्त्री, कीर्तनसम्राट तात्यासाहेब चोपडे, गोदुबाई उपाध्ये, कविवर्य रणदिवे, भाऊ रामगोंडा पाटील जैन समाजातील या मान्यवर सुधारकाबरोबर जैन समाजातील सर्वश्रेष्ठ आचार्य श्री शांतिसागर महाराज, समंतभद्र महाराज असे समकालीन अनेक मुनिवर साधुपुरुष आपल्या योगदानाने जैन समाजाचे प्रबोधन करीत होते. तत्पूर्वी या जैन समाजात खूपच मरगळ आली होती. अंधश्रद्धा, कर्मकांड, कर्मट आचारधर्म वाढते होते. जैन समाजासाठी कष्टमय असा हा काळ होता.

जैन संस्कृती, जैनतत्त्वज्ञान इ.बाबत समाजाला ग्लानी आली होती. अन्य समाजाचा प्रभाव त्यांच्यावर वाढत होता. अशी सामाजिक परिस्थिती आजूबाजूला असताना कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणासाठी १९०२ ते १९०९ मध्ये कोल्हापुरात होते. त्यावेळी ते जैनबोर्डिंग मध्ये राहत होते. त्यावेळी बोर्डिंगचे रेक्टर राव अण्णासाहेब लठ्ठे

हे होते. तत्कालीन काळानुसार काही रुढीपरंपरा आणि सोवळे-ओवळे पाळावे लागत होते. विद्यार्थ्यांना काही बंधने होती.

कर्मवीर हे मुळातच बंडखोर स्वभावाचे होते. कोल्हापुरातील पुरोगामी विचारधारेचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांनी बोर्डिंगमधल्या काही गोष्टीस विरोध केला. त्यामुळे त्यांना बोर्डिंगमधून १९०७ मध्ये काढण्यात आले. मात्र जोपर्यंत ते बोर्डिंगमध्ये होते तेव्हा ते सर्व विद्यार्थ्यांचे नेतृत्व करीत होते. सामाजिक कार्यातही ते अग्रेसर होते. त्यावेळी दक्षिण भारत जैन सभेने एक प्रकल्प हाती घेतला होता. त्याचे नाव होते 'शिक्षण व धान्य फंड योजना' ही एक अभिनव योजना होती. त्यात विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन याविषयी आवाहन केले होते.

१९०८मधील प्रगती आणि जिनविजयाच्या संपादकीय लेखात याविषयी गौरवाने असे लिहिले आहे की, त्यावेळेचे बोर्डिंगचे विद्यार्थी श्री. जंबू मारुती कराडे वाटेगावकर आणि श्री. भाऊ पायगोंडा पाटील ऐतवडेकर यांनी दीपावली सुट्टीत मौजे वाटेगाव, वाळवे, बुर्ली, आष्टा, डिग्रज, ऐतवडे वगैरे गावात जाऊन सहभाग घेऊन धान्य व रोख रकमा आणि बचतफंड जमा केला होता. भाऊरावांचे शालेय शिक्षण थांबल्यानंतर एकदा सहज ते जैनबोर्डिंगमध्ये १९१० साली आले असता मित्रांनी सांगितले की, श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या मस्तकाभिषेकाला आम्ही जाणार आहोत 'तू ही चल. कारण अधिवेशनाच्या व्यवस्थेची जबाबदारी आपल्या तरुण स्वयंसेवकावर सोपवली जाणार आहे.' कर्मवीर भाऊराव जाण्यास तयार झाले. कर्मवीर भाऊराव यांच्याकडे जन्म जात संघटन कौशल्य आणि नेतृत्व गुण असल्याने त्यांनी स्वयंसेवकांचे योग्य संघटन केले. त्यांच्या योग्य व्यवस्थापनाच्या कार्यामुळे तेथील सर्व मुनीश्रींचे लक्ष वेधून घेतले. तसेच शेठ माणिकचंद यांनी कर्मवीरांचे कौतुक केले. त्यांच्या सामाजिक कार्याला प्रारंभ झाला. कर्मवीर भाऊरावांना खऱ्या जैन तत्त्वज्ञानाची व श्रेष्ठ आचारधर्माची कल्पना होती. त्यांना भगवान महावीरांच्या श्रमण संस्कृतीचा वारसा लाभल्यानेच त्यांच्याकडून मानव कल्याणासाठी सर्वसामान्य बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य झाले. दक्षिण भारत जैन सभेच्या विविध उपक्रमांना उपस्थित राहत होते. सभेने दिलेल्या जबाबदाऱ्याही त्यांनी पार पाडले आहेत.

१९४४साली सांगली येथे दक्षिण भारत जैन सभेचे ४१वे अधिवेशन होते. त्याचे अध्यक्षस्थान कर्मवीर भाऊराव यांनी भूषवले होते. त्यांनी जैन समाजाला सामाजिक प्रगती बरोबरच बहुजन समाजाच्या शैक्षणिक व सार्वजनिक कार्यामध्ये उत्साहाने व सातत्यपूर्ण भाग घेण्याचे आवाहन केले होते.

१९५३मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील हे कोल्हापूर येथील प्रमिलाराजे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. तेव्हा त्यांना समजले की गोमटेश्वराच्या महामूर्तीच्या महामस्तकाभिषेकाच्या उत्सवाची तयारी चालू आहे. हॉस्पिटलमध्ये त्यांचे मित्र सहकारी नेजकर पाटील यांच्याकडून कळताच त्यांच्यातील श्रद्धा आणि भक्ती प्रज्वलित झाली. त्यांनी नेजकर पाटलांना सांगितले, आपणास श्रवणबेळगोळला जायचे आहे. हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी विश्रांती घेण्यास सांगितले असतानाही कर्मवीर भाऊराव हे नेजकर पाटील यांच्याबरोबर गाडीने दर्शनास गेले. कोणाचाही आधार न घेता ते डोंगरावर चढले सर्वांना भेटून विश्रांती घेऊन ते परत आले.

दि.१७-२-१९५७मध्ये बाहुबली येथे महावीर समवशरण मंदिर आणि कुंदकुंद आगममंदिर यांची प्रतिष्ठा महोत्सव आणि दक्षिणभारत जैन सभेचे (बाहुबलीतील) दुसरे अधिवेशन झाले होते. या सर्व कार्यक्रमास कर्मवीर भाऊराव पाटील हे उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी १८-२-१९५७ रोजी बाहुबली विद्यापीठ या विभागाचे उद्घाटन झाले. त्यावेळी कर्मवीरांचे भाषण झाले.

थोर विचारवंत मा. प . मंगुडकर हे

म्हणतात, जैन धर्मामधले मुनी व साधू जे आहेत, ते जन्मभर पद-विहार करीत असतात. ते अनवाणी चालत असतात. कर्मवीर अण्णांनी हे व्रत हयातभर पाळलं.

डॉ. रा. अ. कडियाळ हे आपल्या कर्मवीर भाऊराव पाटील 'धाक आणि कर्तृत्व' या ग्रंथात म्हणतात, जैन धर्मात मानवाच्या मुक्तीसाठी चतुर्विध दान सांगितले आहेत. वसतीगृहाच्या स्थापनेमुळे त्यांचे आपोआप आचरण त्याप्रकारे होत असे. विद्यादानामुळे वसतीगृहात मुलांना अन्नदान मिळे. आजारी मुलांना औषधदान मिळे. गरीब अनाथांना अभयदान मिळे. लोकशिक्षणाकडे वळण्यात या दान संकल्पनेचाही भाऊरावांकडून अंमल होत असे. समाजातील कमकुवत घटकातील मुले, निराधार मातृपितृविहीन मुले, शूद्र व दलित, अस्पृश्य मुले व मुली यांच्यासंबंधी अपार करुणा भाऊरावांच्या ठिकाणी होती. सन १९२९ सालातील स्टार्ट समिती पुढील त्यांची साक्ष याचे द्योतक आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने (१९८७) दक्षिण भारत जैन सभा आणि जैन समाजाच्या अनेक शिक्षण संस्थांनी तसेच जैन नियतकालिके व इतर प्रसारमाध्यमांनी विविध कार्यक्रम घेतले. याचबरोबर विश्वधर्म प्रेरक राष्ट्रसंत परमपूज्य एलाचार्य मुनी विद्यानंद महाराजांनी खूप मोठे अलौकिक कार्य केले, त्यांनी सर्वप्रथम कर्मवीरांच्या जन्मशताब्दीची चाहूल लागली आणि त्यांच्या मनामध्ये ही संकल्पना रुजली, स्फुरली आणि कर्मवीरांची जन्मशताब्दी ही राष्ट्रीय स्तरावर साजरी करण्याविषयी त्यांनी अनेकांशी चर्चा सुरू केली. केंद्रीय नेते, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचा त्यात समावेश होता.

कर्मवीरांचे आणि प. पू. विद्यानंद महाराजांचे खूपच सख्य होते. त्यांना कर्मवीरांच्या कार्याची थोरवी माहित होती. म्हणून कर्मवीरांचे शैक्षणिक, सामाजिक कार्य हे राष्ट्रीय स्तरावरचे आहे. त्यामुळेच लोकशाहीच्या पायाभरणीचे कार्य झाले आहे.

प. पू. विद्यानंदजी महाराज दिल्लीला असताना त्यांनी कर्मवीरांचे जन्मशताब्दी स्मारक म्हणून प्राकृत विद्यापीठ भवन स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले आणि माझी पंतप्रधान मा. राजीव गांधी यांच्या शुभहस्ते कर्मवीरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे स्मारक म्हणून श्री कुंदकुंद भारती संस्थेच्या भव्य प्राकृतिक भवनाचे उद्घाटन ९ जुलै १९८७ रोजी झाले. त्यांनी वर्षभर कार्यक्रम आयोजित केले होते. दक्षिण भारत जैन सभेने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जन्मशताब्दी समारोह समिती स्थापन करून विविध उपक्रमांचे नियोजन केले आणि वर्षभर ते उत्साहाने साजरे केले.

समाजातील अनेक मान्यवर की ज्यांना सहकाराविषयी आस्था आणि अभिरुची होती. त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नावे बँका, सहकारी पतसंस्था स्थापन केल्या. आजही त्या कर्मवीरांचे स्मारक रूपाने कार्यरत आहेत.

महाराष्ट्रातील सर्व शिक्षण संस्थांनी आणि शासनाने ही कर्मवीरांच्या जन्मशताब्दी निमित्ताने कार्यक्रम घेतले. प्रसार माध्यमांनी विशेषांक काढले यानिमित्ताने ग्रंथ निर्मिती झाली. त्यामुळेच साऱ्या देशाला आणि महाराष्ट्राला आधुनिक शिक्षणमहर्षींचे कार्य समजले.


पश्चिम महाराष्ट्रातील जैन सत्साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण......

**भरतेश ग्रंथ भांडार**

मु. पो. बाहुबली, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर ४१६ ११०

**संपर्क :** श्री बाबगोंडा पाटील
८७६७५४१७१०

# गुरुकुल पंचसूत्री : शैक्षणिक जीवन संजीवनी

**वृषभ राजाराम खोत**, सन्मति विद्यालय, तारदाळ

**नमः समंतभद्राय गुरुदेवाय साधवे ।**
**समन्तानां सुभद्राय ज्ञानिने कर्मयोगिने ।।**

संजीवनी या शब्दाचे अनेक अर्थ आहेत; पण याचा मुख्य अर्थ 'अमरता' हा आहे. जेव्हा एखाद्या जीवाला वाटते. आपल्यातील सर्व क्षमता संपली आहे. आपला अंत निश्चित आहे. त्यावेळी त्या जीवाला पुनरुज्जीवन देणारी शक्ती म्हणजे संजीवनी होय. संजीवनी म्हणजे शेवटच्या क्षणी तोंडात पडणारे अमृतच होय. हनुमानाने द्रोणागिरी पर्वतावरची संजीवनी हिने लक्ष्मणाचे प्राण वाचवले. आज एकविसाव्या शतकात गुगल, युट्युब, फेसबुक यांनी मानवी जीवनात प्रवेश केला आहे. अन् माणसाचा जगण्याचा गुंता सुटण्याऐवजी तो वाढतच गेला आहे. अशावेळी माझी अवस्था खोल समुद्राच्या गर्तेत अडकल्यासारखी झाली आहे, म्हणून मला माझ्यासोबत राहणाऱ्या मित्रांची गरज आहे. म्हणून मी आज माझ्या शील, प्रेम, ज्ञान, सेवा व व्यवस्था यांच्याशी मैत्री केली आहे. चौऱ्याशी लक्ष योनी पार करून मिळालेल्या मनुष्य जन्माचे जर आपल्याला सार्थक करायचे असेल तर आपल्यासोबत हे मित्र असायलाच हवेत. सकाळी-सकाळी तुम्ही - आम्ही वर्तमानपत्र उघडतो. तेव्हा वर्तमानपत्रात खून, मारामाऱ्या, हिंसाचार बलात्कार, फसवणूक यांच्या न संपणाऱ्या शृंखला वाचायला मिळतात. बातम्या, सिनेमा, मालिका व वेब सिरियलमधून कशाचेही दर्शन होते! बिघडलेली भारतीय संस्कृती आणि बिनसलेली कुटुंबव्यवस्था. समंतभद्रजी महाराज म्हणतात,

**'यदि संस्कार सुरक्षित रहे**
**तो समाज सुरक्षित रहेगा।'**

धर्म आणि नैतिक संस्काराच्या संगमातच सुख व संस्कार जन्माला येतात, म्हणून मी माझ्या शील नावाच्या मित्राशी मैत्री केली आहे.

माझा दुसरा मित्र 'ज्ञान' हा आहे. तो माझा मित्र आहे. **ज्ञानेन पुसां सकलार्थसिद्धिः ।** ज्ञान हा मानवी जीवनाचा पाया आहे. ज्ञानामुळे मनुष्याला सर्व कार्यात सफलता मिळते. म्हणून गुरुदेवांनी हे आपल्या विद्यापीठाचे ध्येय वाक्य बनवले आहे. ज्ञान मिळवणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय असते. हा उद्देश सफल व्हावा म्हणून गुरुदेवांनी ज्ञानाचे कारंजे फुलवण्यासाठी मध्यप्रदेश, महाराष्ट्र व कर्नाटकमध्ये १० गुरुकुले व १९ विद्यामंदिरे स्थापिली आहेत. गुरुदेवांचे हे स्वप्न आज हजारो विद्यार्थी मिळून साकारत आहेत. गुरुदेवांच्या या ज्ञानसागरात एक ज्ञानपिपासू राजहंस बनून; नीर-क्षीर बुद्धिमत्तेची जोड घेऊन भद्रगुरुंच्या ज्ञानसागरात मनसोक्त डुंबत आले.

**ज्ञानियांचा आधारू,**
**संयमाचा महामेरू,**
**अवध्या जीवनाचा कल्पतरू ।**

असे ठरलेल्या गुरुदेवश्रींना माझा मानाचा मुजरा.....

**हातात हात घेतला, तर मैत्री होते,**
**दोन्ही हात जोडले, तर भक्ती होते**
**कोणाला हात दिला, तर मदत होते.**
**हाताचे महत्त्व इतके की अनेक हात पुढे आले,**
**तर अशक्य ही शक्य होते.**

सेवा हा एक धर्म आहे. ती एक जीवनशैली आहे. ती आपल्याला समाजासाठी काहीतरी करून दाखवण्याची प्रेरणा देते. इतिहासात डोकावून पाहिले तर संत, महात्मे व नेते यांनी आपल्या वैयक्तिक जीवनाचा त्याग केला अन् सेवाधर्म बजावून ते अजरामर झाले. बाबा आमटे, सुधामूर्ती, संत

गाडगेबाबा, सानेगुरुजी, राष्ट्रपिता म. गांधी प पू १०८ समंतभद्रजी महाराज यांचे कर्तृत्व सेवा धर्माचे उत्तम उदाहरण आहे.

There are four very imortant words in our life Love, Honesty, Truth and Resect. without these in our life, have nothing.

प्रेम ही अशी संजीवनी आहे, जी आबाल वृदांना उभारी देते. आज विभक्त कुटुंबव्यवस्था व पती-पत्नी दोघे ही नोकरी कारणांमुळे लहानग्यांच्या वाट्याला Day care center आणि वृध्दांच्या वाट्याला Old age home येते. आपण पाहतो, ऐकतो, अनुभवतो सुद्धा व नवीन पिढीला दोष देखील देतो, की त्यांमध्ये संयम नाही, धीर नाही. मोठ्यांविषयी आदर नाही याचे खरे कारण, त्यांना त्यांच्या कुटुंबाकडून प्रेम मिळत नाही, म्हणून मला प्रेमाबरोबर मैत्री करायची आहे.

**मैत्री भाव जगत में, मेरा सब जीवोंसे नित्य रहे।**
**दिन-दुखी जीवों पर, मेरे उर से करुणा स्रोत बहे।।**

व्यवस्था याचा मला समजलेला सोपा अर्थ म्हणजे आपण जे काम करतो त्याचे नियोजन कोणत्याही कामाचे यश हे कठोर परिश्रम, समर्पण आणि त्या कामाचे योग्य नियोजन यावर अवलंबून असते. पारदर्शी कारभार, कठोर शिस्त व स्वयंअनुशासन ही गुरुदेवांनी घालून दिलेली यशाची त्रि:सूत्री म्हणजे व्यवस्थेचा प्राण आहे. शेवटी मी एवढेच म्हणेण...

**शील ज्ञानाची घेऊन मशाल,**
**सेवा अन् प्रेम उधळा खुशाल,**
**व्यवस्था ही आमची पंचप्राण बनली रे**
**भद्र बाळांची शाळा फुलली,**
**शाळा शिकताना तहान भूक हरली रे......**

कर्नाटकाच्या शाखांमधून मोठ्या गटातील प्रथम क्रमांकाचे निबंध...

# प. पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराज

**आदिती सुधाकर एवाळे,** सन्मती विद्यामंदिर सिदनाळ

**थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा**
**आपण त्यांच्या समान व्हावे, हाच सापडे बोध खरा**

भारतभूमी ही एक संतांची पावन भूमी आहे. अनेक सत्पुरुषांनी येथे जन्म घेतला आणि आपले व इतरांचेही कल्याण केले. आपल्या ज्ञानामृत आणि सत्धर्माचे सिंचन करून ते सर्वांचे एक अनमोल दीपस्तंभ बनले. त्यापैकी एक म्हणजे परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज, ज्यांनी गुरुकुल शिक्षण प्रणालीचा अविष्कार करून लौकिक शिक्षणासोबतच नैतिक व आध्यात्मिक संस्काराची प्रतिष्ठापना केली. मानवतेच्या परिपूर्णतेसाठी आध्यात्मिक संस्काराचे अधिष्ठान आवश्यक आहे, असे गुरुदेव म्हणत असत.

गुरुदेवांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कस्तुरचंद होते व आईचे नाव कंकुबाई असे होते. आई-वडील दोघेही धार्मिक वृत्तीचे असल्याने गुरुदेवांवर धार्मिक संस्कार झाले. गुरुदेवांचे प्राथमिक शिक्षण करमाळा येथे झाले. नंतर सोलापूर येथील नॉर्थ कोर्ट हायस्कूल येथे त्यांचे माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले.

गुरुदेवांचे मूळचे नाव देवचंद या नावाप्रमाणे ते लवकरच देवमाणूस म्हणून ओळखले जाऊ लागले. जिनधर्म हा जगद्बंधू आहे हा विचार देवचंदांच्या बालमनावर सुसंस्कारित केला गेला होता. त्यामुळे ते जिनधर्मास केंद्रस्थानी ठेवून आपले जीवन जगत होते. श्री क्षेत्र कुंथलगिरी हे त्यांचे श्रद्धास्थान होते

एके दिवशी देवचंद व मोतीचंद हे दोघे कुंथलगिरीला देवदर्शनासाठी गेले असता त्यांच्या

मनामध्ये ब्रह्मचर्य व्रत स्वीकारण्याची प्रेरणा जागृत झाली. तसेच त्यांनी भगवान कुलभूषण व देशभूषण यांच्या साक्षीने ब्रह्मचर्य व्रत स्वीकारले.

नश्वर देहाच्या मदतीने अविनाशी सुखाची प्राप्ती होऊ शकते, त्यामुळे आपल्या आयुष्यातील एकही क्षण वाया घालवू नये. प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करण्याचा गुरुदेवांनी आटोकाट प्रयत्न केला. तसेच क्षुल्लक दीक्षेपूर्वी ब्रह्मचर्य अवस्थेत वयाच्या चाळीसाव्या वर्षी आपल्या आयुष्याविषयी लिहिताना एका पत्रात असे लिहिले होते की, आयुष्य अल्प आहे. मृत्यू केव्हा गाठेल याचा नियम नाही व मनुष्य पर्याय मिळणे तर अत्यंत दुर्लभ, म्हणून दीर्घायुषी बनून धर्मसाधना करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत उचित... असलेले जीवन सत्कारणी लावणे म्हणजेच वाढविणे आहे.

गुरुदेवश्रींना वृद्धत्वाची जाणीव खूप पूर्वीच झाली होती. त्यामुळे त्यांनी आत्मसाधना व ध्यानधारणा वाढविली होती परिणामांची उत्तरोत्तर निर्मळता वाढत होती. त्याच्या सहाय्याने निर्भयता आली होती. निरासक्ती व निःस्पृहता तर पराकोटीची होती. भेदविज्ञानाच्या प्रखर सामर्थ्याने अंतर मग्नता होती. तपश्चर्येने देह जर्जर बनले होते. वर्धक्याने अस्थिपंजर बनले होते. श्वसनक्रिया मंदावत होती. दि. १० ऑगस्ट १९८८पासून ताप येत होता. हा ताप उतरत नव्हता. विशेष औषधोपचार करण्यापेक्षा जिनवचनरूपी औषधींचा रसास्वाद घेण्याकडे कल वाढला होता. शरीरासोबत कषाय देखील कृश झाले होते. कृतार्थ जीवनाची सार्थकता चेहऱ्यावर झळकत होती. आजारपण असतानाही ते प्रसन्न चित्त होते. १६ ऑगस्टपासून त्यांनी अन्नाचाही त्याग केला. त्यानंतर त्यांनी पाणी देखील घेतले नव्हते. गुरुकुलमाता गजाबेन, डॉ. धनंजय गुंडे आदींनी नारळ पाणी घेण्यास सुचवले, पण त्यास त्यांनी स्पष्ट नकार दर्शविला

१७ ऑगस्ट रोजी त्यांनी निराहार उपवास केला. मौन तर आदल्या दिवसापासूनच घेतले होते. त्यांचे परमशिष्य मुनिश्री महाबल महाराज, क्षु. वीरभद्र महाराज समाधी साधण्याकरिता तत्परतेने पूर्वीपासून सेवेला होतेच. त्याचप्रमाणे ब्र. माणिकचंदजी भीसीकर, आनंदभाई शहा पणदरे आदी महानुभाव देखील होते

दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजेपर्यंत नियम सल्लेखना घेण्याचे सुचवले. अहो आश्चर्य जणू त्यांना याची पूर्वकल्पनाच होती की काय? कारण सकाळी ५.३५ वा. शवासनातच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. जीवन कसे जगावे व मृत्यूचेही निर्भयपणे कसे स्वागत करावे याचा वस्तुपाठच त्यांनी सादर केला.

**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।**
**साधको न हि सर्वत्र चंदनं न वने वने ।।**

ज्याचप्रमाणे प्रत्येक पर्वतावर माणिक मिळेलच असे नाही. प्रत्येक हत्तीमध्ये हस्तिदंत मिळेलच असे नाही. प्रत्येक वनांमध्ये चंदन मिळेलच असे नाही आणि प्रत्येक साधूमध्ये परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज मिळतीलच असे नाही....!!

## भद्र - भारती

*** शरीराची माती होणारीच असते. त्या शरीराचा धर्मासाठी, स्वपरकल्याणासाठी अधिकात अधिक उपयोग करून माती होऊ देण्यातच जीवनाची सार्थकता आहे.**

*** निःस्वार्थ नि ज्ञान-संपन्न त्यागी जनांची निर्मिती व वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. धर्म टिकणार असेल तर तो याच मार्गाने टिकणार आहे.**

*** त्यागास ज्ञानाची जोड मिळून जीवन खऱ्या अर्थाने धार्मिक व सत्प्रवृत्त बनले पाहिजे. भगवत्प्रसादाने आपणा सर्वांस त्यासाठी लागणारे सामर्थ्य व चैतन्य प्राप्त होवो, हीच कामना प्रभुचरणीं करीत आहे.**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

# प. पू. १०८ गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित गुरुकुलांमुळे समाजास लाभलेली दिशा

**तानाजी आत्माराम घोसरवाडे,** ए. एस. पाटील हायस्कूल, स्तवनिधी

परमपूज्य श्री १०८ समंतभद्र मुनी महाराज यांचा जन्म महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यामध्ये करमाळा या गावी इ. सन १८९१मध्ये डिसेंबर १९ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कस्तुरचंदजी शहा आणि आईचे नाव कंकुबाई असे होते. व्यापारासाठी त्यांनी करमाळाहून जवळच असलेल्या दुधनी गावी आल्यामुळे त्यांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण करमाळा व दुधनी या ठिकाणी झाले. त्यांचे कुटुंब सुसंस्कृत आणि धार्मिक होते. त्यामुळे बालपणीच त्यांच्या मनावर संस्कार, आध्यात्मिक, नैतिक मूल्ये यांच्यामध्ये रुजली गेली. त्यांचे उच्च शिक्षण पुणे येथे झाले. ते बी. ए. पदवीधर होते. त्यावेळी भारतामध्ये ब्रिटिश शासन होते. त्यांना उच्च पदाची नोकरी सहज मिळाली असती पण त्यांनी त्याच्याकडे पाठ फिरवली. ब्रह्मचर्य व्रत स्वीकारून इसवी सन १९३३मध्ये क्षुल्लक दीक्षा घेतली व इसवी सन १९५२मध्ये मुनिदीक्षा घेतली. त्यांचे गुरु परमपूज्य श्री १०८ वर्धमानसागरजी महाराज हे प. पू. शांतिसागर महाराज यांच्या संघातील होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पुढील वाटचाल सुरू ठेवली.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात जैन धर्मामध्ये दोन जेष्ठ मुनिमहाराज, शिक्षण महर्षी आणि सामाजिक परिवर्तन यांच्यामुळे घडले ते म्हणजे परमपूज्य १०८ श्री शांतिसागर महाराज आणि परमपूज्य श्री १०८ समंतभद्र महाराज होय. प. पू. श्री १०८ समंतभद्र महाराज यांनी देशामध्ये, अनेक राज्यांमध्ये गुरुकुलांची स्थापना केली आहे.

गुरुकुल हे असे एकमेव स्थान आहे की, तेथे लौकिक शिक्षणासोबत आध्यात्मिक व नैतिक मूल्य शिकवले जातात. महाराज हे फार विचारी होते. त्यांची दूरदृष्टी फार उत्तम होती. त्यांना माहित होते की प्रत्येक व्यक्तीपासून देशाचा सर्वांगीण विकास हे लौकिक शिक्षणाने होत नसून त्याला अध्यात्म, धार्मिक शिक्षण आणि नैतिक मूल्यांची साथ पाहिजे. लौकिक शिक्षण हे एक फक्त एकांगी शिक्षण असून उदरनिर्वाहाचे एक साधन आहे. परंतु त्यासोबत धार्मिकता आणि नैतिक मूल्ये यांच्या अभावामुळे ते शिक्षण अपूर्णच. म्हणून त्यांनी मुनी दीक्षा स्वीकारून समाजामध्ये घरोघरी जाऊन धर्म शिक्षणाचा प्रचार करू लागले. गुरुकुलामध्ये राहून मुलांच्या व स्वाध्यायाच्या माध्यमातून संस्काराचे, धार्मिकतेचे व नैतिकतेचे मूल्य शिकवू लागले. गुरुकुले दीर्घकाळापर्यंत टिकून रहावीत यासाठी त्यानी पंचसूत्री अंमलात आणली. ते म्हणजे शील, ज्ञान, सेवा, प्रेम आणि व्यवस्था ही होत. ही पंचसूत्रे सर्व गुरुकुलांची पायाभूत साधने ठरली.

गुरुकुलामधून, पंचसूत्राच्या माध्यमातून उत्तम नागरिक बनण्यात उपयोग होऊ लागला व युवकांमध्ये, कुटुंबांमध्ये, समाजामध्ये अनेक चांगले गुण रुजल्यामुळे प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, सुसंस्कृत होऊ लागली. त्यामुळे ध्येय विकसित होण्यास मदत झाली. आज देश दहशतवाद, हुकुमशाही, भ्रष्टाचार, अत्याचार, गरिबी, बेरोजगार यांनी ग्रासलेला आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे धार्मिक शिक्षण, आध्यात्मिक आणि नैतिक मूल्य यांचा अभाव होय. यावरून स्पष्ट होते की गुरुदेवांची दूरदृष्टी किती चांगली आणि अचूक होती. खरोखरच आता वर्तमान काळात आपल्या देशाला गुरुदेवांनी घालून दिलेली पंचसूत्री, गुरुकुल शिक्षण प्रणाली

अत्यंत गरजेची आहे; कारण आज आपला समाज, देश एका चांगल्या गुरुविना दिशाहीन होत चालला आहे. त्यामुळे देशामध्ये अनैतिक घटना घडू लागलेल्या आहेत. आज सरकार अनेक कोट्यवधी रुपये खर्च करून नवनवीन शिक्षण प्रणाली अंमलात आणली आहेत. अनेक तज्ज्ञ शिक्षकांकडून, अधिकाऱ्यांच्याकडून शिक्षण प्रणालीमध्ये अनेक बदल करत आहेत. परंतु आजही आपला देश विकसनशील देशांच्या यादीमध्येच राहिला आहे. आत्ताच्या शिक्षण पद्धतीमुळे काही व्यक्ती श्रीमंत होऊ लागले. काही मोजकेच व्यक्ती अधिकारी, राजकारणी, लोकांचा विकास होऊ लागला आहे. परंतु असेच होत राहिले तर देश दुसऱ्यांदा परकीयांच्या ताब्यात, गुलामगिरीत जाण्यास वेळ लागणार नाही. म्हणून समाजातील, देशातील प्रत्येक घटकांचा विकास हे फक्त गुरुदेवांची गुरुकुल. पंचसूत्री शिक्षण प्रणालीचे देशांमध्ये, प्रत्येक क्षेत्रामध्ये अंमलबजावणी होणे गरजेचे असून अनिवार्य आहे. गुरुकुल शिक्षण प्रणाली आणि अभ्यासक्रमाची आज प्रत्येक व्यक्ती पासून देशातील प्रत्येक घटकाला त्याची नितांत गरज आहे. त्यामुळे समाजातील आणि देशातील प्रत्येक घटक सुसंस्कृत होईल, उत्तम व्यक्ती, उत्तम कुटुंब, उत्तम समाज आणि देशाला विकसित यादीमध्ये नोंद होण्यास मदत होईल.

आज कोणत्याही सरकारने शिक्षण प्रणाली मध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून कितीही सुधारणा, बदल, नवीन उपक्रम केल्या, कितीही राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या समित्या नेमल्या, कितीही भौतिक विकास करण्यास कितीही रुपये खर्च केले तरी आपला देश कधीच विकसित आणि सुरक्षित राहू शकत नाही. म्हणून शेवटी गुरुदेवांनी सांगितलेल्या गुरुकुल शिक्षणप्रणाली, पंचसूत्रांचा राष्ट्रीय पाठ्यक्रम धोरण (NCP)मध्ये समाविष्ट करणे गरजेचे आहे.

आज आपला समाज आणि देशाच्या सुरक्षिततेसाठी चांगले नागरिक बनविणे गरजेचे आहे आणि ते फक्त गुरुदेवांच्या शिक्षण प्रणालीमुळे साध्य आहे. त्यासाठी गुरुदेवांनी सांगितलेले आध्यात्मिक विचार आणि नैतिक मूल्यांचा प्रत्येक क्षेत्रामध्ये, प्रत्येक व्यक्तीपर्यंत, तसेच शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. समाजामध्ये, प्रत्येक खेड्यामध्ये गुरुदेवांचे आचार, विचार, त्यांचे उपदेश, स्वाध्यायाच्या माध्यमातून घरोघरी, प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचली पाहिजेत. शासनाकडून त्यांच्या विचारांचे, धर्मप्रसाराचे कार्यक्रम होणे गरजेचे आहे. शासनाकडून वीर सेवा दलांना, संघांना, धार्मिक शिक्षण संस्थांना, गुरुकुलांना निधी उपलब्ध केला पाहिजे. आपला देश भ्रष्टाचारमुक्त, गरिबी हटविणे, रोजगार समस्या घालविणे, दहशतवाद निर्मूलन करणे, अत्याचार निर्मूलन करणे, यासारख्या गोष्टींवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यापेक्षा आपल्या कर्मचाऱ्यांना शासनाने गुरुदेवांचे आचार, विचार, नैतिक मूल्ये, आध्यात्मिक विषयांचे प्रशिक्षण दिल्याने वरील सर्व समस्या सोडविण्यास मदत होईल आणि ते शासनाला आज ना उद्या करणे गरजेचे आणि अनिवार्य असेल. यावरून गुरुदेवांनी केलेली शिक्षणप्रणालीच योग्य असेल.

थोडक्यात शेवटी लिहायचे म्हटले की गुरुदेवांचे विचार फार दूरदृष्टीचे होते आणि ते शंभर वर्षापासून समाजासाठी उपयोगी होतील. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, सुसंस्कृत, समृद्ध विकसित होईल आणि गुरुदेवांच्यामुळे समाजाला उपयोग झाले आहेत, होत आहे आणि पुढे भविष्यात सुद्धा होत राहणार, यात तिळ मात्र शंका नाही. गुरुदेवांच्या विषयी लिहिण्यास सुरुवात केली तरी शेवटी शब्द अपूरे पडतात. त्यांच्या वरील समाज उपयोगी निबंधाला शेवट नसेल, म्हणून मी येथेच थांबतो व शेवटी वयानुसार त्यांचा इसवी सन १९८८ मध्ये ऑगस्ट १८ रोजी समाधी होऊन समाजामध्ये पोकळी निर्माण झाली. कधीच भरून निघणार नाही, असे ते होऊन गेले. प. पू. गुरुदेव १०८ समंतभद्र महाराज यांचा आजही प्रत्येकाच्या हृदयी वास आहे.

*****

# प.पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराजांच्या गुरुकुल संस्था व समाज

**निदा रमजान शेख** सन्मति विद्यालय, तारदाळ

समाजाचा खरा विकास केवळ तांत्रिक ज्ञानाने नाही, तर संस्कार, गुणवत्ता व आध्यात्मिक मूल्यांनी होतो. या तिन्हींचा संगम घडवणारे, समाजाला नवा मार्ग दाखवणारे थोर संत म्हणजे प. पू. संमतभद्र महाराज. त्यांच्या विचारांची साक्ष 'भद्रायण' या पुस्तकातून किंवा ग्रंथातून आपल्याला मिळते. त्यांनी स्थापन केलेल्या गुरुकुल संस्था आणि समाजासाठी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी ठरते.

**'संतांची सेवा हीच खरी समाजसेवा,**
**ज्ञान व धर्म यांची नवीच ठेवा ।**
**गुरुकुलांच्या अंगणात संस्कार फुलती,**
**समता, सन्मान, मानवता रुजती !'**

समंतभद्र महाराजांनी गुरुकुल संकल्पनेला नवा अर्थ दिला. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानग्रहण करणे नव्हे, तर आत्मविकास आणि चारित्र्य घडवण्याची प्रक्रिया असते, असे त्यांचे मत होते. त्यांच्या गुरुकुल संस्थांमध्ये धर्म, योग, ध्यान, नैतिकता, संयम आणि सेवा यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, जीवन जगण्याची दिशा दिली जात होती.

त्यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक नवीन प्रयोग केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, संगीत, खेळ आणि आत्मानुशासन या मूल्यांचे प्रशिक्षण दिले. **'विद्या विनयेन शोभते'** या तत्त्वानुसार नम्रता, शिस्त आणि कृतज्ञता ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या स्वभावात खोलवर रूजली होती. अशाप्रकारे, गुरुकुल हे एक आदर्श मूल्यशिक्षण केंद्र बनविले.

प. पू. समंतभद्र महाराजांनी सामाजिक सुधारणांचा मार्ग अतिशय प्रभावीपणे अवलंबला. त्यांनी बालविवाह, पशुबली, अंधश्रध्दा अशा कुप्रथा थांबविण्यासाठी जनजागृती केली. प्रबोधनाचे कार्य करीत असताना त्यांनी स्त्रियांना शिक्षण आणि सन्मानाने जगण्याचा संदेश दिला. त्यांचे हे विचार सामाजिक समतेचे प्रतीक बनले.

त्यांनी आपल्या गुरुकुल संस्थांमध्ये समाजातील अनाथ, गरीब, उपेक्षित स्त्रियांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. जाती-पातीचा भेद न करता सर्वांना समान संधी दिली. ते म्हणत, 'शिकणं हा कोणाचाही हक्क आहे. धर्म वा जन्माने त्यावर मर्यादा लागू नाहीत.' त्यांच्या गुरुकुलांमधून निर्माण झालेले शिष्य पुढे जाऊन संत, विचारवंत आणि समाजसेवक बनले.

त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांनी समाजात समता, सहिष्णुता, करुणा, आत्मनिष्ठा या मूल्यांचा प्रसार केला. महिलांना शिक्षण, समाजात सन्मान आणि संस्कार देण्यासाठी ते नेहमी पुढे असत. त्यांनी सांगितलेल्या 'जीवन मूल्यांची शिकवण' आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरते.

आजही त्यांच्या मूल्यांची शिकवण अनेक ठिकाणी प्रेरणादायी ठरते. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात त्यांनी दिलेले शिक्षण कालसुसंगत ठरते. गुरुकुलचे मूल्याधारित शिक्षण विद्यार्थ्यांना निर्णय घेण्यास सज्ज करते. त्यामुळे ही शिकवण शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ यांना दिशादर्शक ठरते.

आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षण हे केवळ करिअरसाठी घेतलं जातं. समंतभद्र

महाराजांनी दिलेलं शिक्षण म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल विकास. हे महाराजांचे शिक्षण आजच्या पिढीसाठी उपयुक्त ठरतो. जर आपल्याल्या समाजात खरं परिवर्तन घडवायचे असेल, तर अशा गुरुकुलांची स्थापना करणे आवश्यक आहे. अशा गुरुकुलांमुळे समाजात उत्तम प्रतीचे शिक्षण रुजवण्यास मदत मिळते.

प. पू. समंतभद्र महाराजांनी दिलेलं हे शिक्षण समाजासाठी नवा यशाचा मार्ग आहे. त्यांचे गुरुकुल, म्हणजे संस्काराचं मंदिर झाणि मूल्यांचं विद्यापीठ. त्यांचे उत्तम विचार आदर्श समाज घडविण्यास मदत करू शकतात. जर आजच्या पिढीने त्यांचे विचार आणि कार्य आत्मसात केले, तर नक्कीच हा समाज 'आदर्श समाज' म्हणून ओळखला जाईल.

प. पू. समंतभद्र महाराजांचे हे शिक्षण केवळ जैन समाजापुरते मर्यादित नसून सर्व मानवजातीसाठी उपयुक्त ठरते. त्यांचे हे मूल्याधारित शिक्षण सर्व जात, धर्म आणि सर्व वयोगटातील लोकांसाठी गरजेचे आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या आधारावर उभा राहिलेला समाज सहिष्णू आणि एकात्म असू शकेल. त्यांनी दिलेलं हे शिक्षण सध्या काळाची गरज बनली आहे.

---

महाराष्ट्राच्या शाखांमधून अध्यापक गटातील प्रथम क्रमांकाचे निबंध...

# प. पू. १०८ गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित गुरुकुलांमुळे समाजास लाभलेली दिशा

**सौ. सविता बाबासाहेब सिदनाळे,** जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर, जयसिंगपूर

**बाहुबलीच्या पावन स्थळी, वसे गुरुकुल महाप्रणाली**
**शिकले-फुलले दूर जाहले व्यक्तिमत्त्वाची कीर्ती बहरली**
**अध्यात्माचा परिसर इथला शिकवून सोडी मनामनाला**
**डोंगर सांगे कथा-कहानी, धर्मामधल्या नवमर्माला**
**वीतराग-विज्ञान उलघडे, बाहुबलीच्या सानिध्याने**
**अध्यात्माचा गंध उगळुनी, सुगंधमय ती होय संस्कृती**
**क्षेत्रावरती करी साधना, येईल सुदिव्य अनुभूती**

विसाव्या शतकात आपल्या कार्यकर्तृत्वाने आपली संस्कृती संपन्न केलेल्या महानुभावात गुरुदेव समंतभद्र महाराज हे एक होत. आपल्या आगमोचित आचरणामुळे आचार्य श्री शांतिसागर महाराज प्रथमाचार्य आणि चारित्र्य चक्रवर्ती म्हणून विख्यात झाले. महात्मा गांधीजींनी आपल्या धर्माधिष्ठित साधतुल्य आचरणामुळे राजकारणाला पावित्र्य प्राप्त करून दिले. त्याचप्रमाणे आत्महितासमवेत समाजहितालाही सुयोग्य स्थान देऊन परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांनी आधुनिक जैन गुरुकुल शिक्षण प्रणालीला एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त करून दिले.

मनुष्याला ज्ञानी, सुसंस्कृत आणि सहिष्णुतावादी बनविणे हेच विद्यापीठाचे ध्येय बनविले. प्रातः स्मरणीय परमपूज्य ज्ञानयोगी गुरुदेव श्री १०८ समंतभद्र महाराज हे एक विद्यापीठच होते. जीवन, शिक्षण आणि अध्यात्म यांच्यातल्या उपयुक्त, उत्कृष्ट आणि उदात्त विचारांचे ते संस्कारपीठच होते. जैन धर्माचे ते महान तत्त्वज्ञानी, ज्ञानी व समाज सुधारक संत होते. त्यांचे विचार केवळ धार्मिक मर्यादापुरतेच मर्यादित नव्हते, तर त्यांनी समाज सुधारणा, नैतिक शिक्षण व अध्यात्म यांची सांगड घातली.

**आधी गुरुकुल वंदावे, मग ते साधावे ।**
**गुरुकुल नाम घेता, होतील दूर ते पाप ।।**

भारतीय संस्कृतीत गुरुकुल शिक्षण पद्धतीस फार मोठे महत्त्व आहे. संत, महात्मे, गुरुजन यांनी समाज प्रबोधन यासाठी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. यामध्ये गुरुदेव समंतभद्र महाराज यांनी स्थापन केलेले गुरुकुल

समाजासाठी एक 'दीपस्तंभ' ठरले. त्यांनी शिक्षणासोबत चारित्र्य, संयम आणि साधना यांचे बोध देणारे एक आदर्श केंद्र निर्माण केले. त्यामुळेच या समाजात धार्मिक आणि आध्यात्मिक शिक्षणासोबत वैज्ञानिक दृष्टिकोन, नीतिमूल्य आणि सांस्कृतिक जागृती यांचा प्रचार व प्रसार झाला. त्यामुळेच एक सुसंस्कृत समाज घडविण्यात गुरुकुल प्रणालीचा मोठा हातभार लागला आणि त्यामुळेच गुरुकुलाची स्थापना म्हणजे त्या काळातील एक युगप्रवर्तक पाऊल होते. यात समाजसुधारणा, नैतिक शिक्षण आणि अध्यात्म यांचा संगम होता.

गुरुकुलाची चळवळ जेव्हा पूज्य गुरुदेवांनी हाती घेतली, तेव्हा त्या काळात जैन समाज अत्यंत विघटित अशा अवस्थेत होता. नगण्य लोकसंख्या, विखुरलेली वस्ती, जातिभेद, कोणी व्यापारी तर कोणी शेतकरी, तर कोणी नोकरी करणारे, त्यामुळे आर्थिक व्यवहारात सुसंवाद नसलेला आत्मविस्मृत असा समाज होता. एकसंघ समाजाचे दर्शनच होत नव्हते. हे चित्र बदलण्यासाठी, आपापासांतील कोरडी नाती नष्ट करण्यासाठी तसेच जैन समाज एकत्र यावा, यांच्यात अस्मिता जागृत व्हावी, आत्मिक संपत्ती, व्यावहारिक ज्ञानोपासनाची कास धरून जैन समाज उन्नत व्हावा, सेवाभावी दृष्टी प्राप्त झालेला समाज निर्माण व्हावा या हेतूने महाराजांनी गुरुकुलाची स्थापना केली.

गुरुकुल स्थापनेमागचा गुरुदेवांचा उद्देश व्यापक होता. संयम व संस्काराने भरलेली नवी पिढी घडविणे, धर्म, तत्त्वज्ञान व नैतिकतेचा प्रचार व प्रसार करणे, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त व साधनेची जाणीव निर्माण करणे, संन्यासी आणि गृहस्थ यांच्यात समन्वय साधणे असा विस्तृत होता.

गुरुदेवांनी स्थापन केलेली गुरुकुले म्हणजे एक शिक्षण संस्था नाही, तर ती संस्कारांची कार्यशाळा, संयमाची शाळा आणि चारित्र्याची पाठशाळा आहे. जेथे विद्यार्थ्यांना धर्म, नीती, साधना आणि सेवा यांचे शिक्षण दिले जाते. जेथे शिक्षण फक्त पुस्तकी न राहता चारित्र्य, शिस्त व आत्मसंयम यावर आधारित असते. त्यामुळेच गुरुकुलातून तयार झालेली तरुण पिढी आज समाजात नीतिमान, प्रामाणिक आणि सेवाभावी नागरिक म्हणून उभी आहे. त्यामुळेच तात्या गुरुजी, करके गुरुजी, मोहोळकर गुरुजी, दलाल गुरुजी, भीसीकर गुरुजी यासारखी 'नररत्ने' गुरुकुलात तयार झाली. ज्यांच्या हाताखाली शेकडो संस्कारक्षम पिढी तयार झाल्या.

गुरुकुलामध्ये जैन तत्त्वज्ञान, अहिंसा, अपरिग्रह, सत्य अशा मानवतेच्या मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये होत असते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या माध्यमातून या मानवतेच्या मूल्यांचा, तत्त्वज्ञानाचा प्रसार समाजात होतो. सहाजिकच त्यामुळे समाज शांती, सहिष्णुता, समानतेची भावना या दिशेने जातो व त्याची धार्मिक व आध्यात्मिक जडणघडण होते.

गुरुकुलात तयार झालेले विद्यार्थी समाजसेवेचे व्रत घेतात. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता व अनीती या विरोधात जनजागृती करताना दिसतात. त्यामुळे समाजात समाजसेवेचा व्रतधारीवर्ग निर्माण झालेला दिसतो.

Simly living and high thinking is greatness of life. या उक्तीप्रमाणे गुरुकुल जीवनशैलीत शिस्तपणा, संयम, साधेपणा, शुद्ध आहार-विहार यांचा अंगीकार केला जातो. जो आजच्या भौतिकवादी जगात, मानसिक शांततेसाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे गुरुकुलात शिकलेले जीवनमूल्य समाजाला स्वच्छ, सुसंस्कृत व साधे जीवन जगण्याची प्रेरणा देते.

गुरुदेवांनी स्थापन केलेल्या गुरुकुलात धर्माला अंधश्रद्धेपासून दूर ठेवल्यामुळे तरुणांचा धार्मिकतेकडचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक झाला.

आजचे युग हे व्यवस्थेचे युग आहे. व्यवस्थापन शास्त्र हा या युगातील परवलीचा शब्द. यात अनेक कोर्सेस शिकवले जातात. ऑफिस, हॉटेल, होम मॅनेजमेंट असे कोर्सेस आहेत. म्हणजेच

घराची व्यवस्था कशी करायची हे कॉलेजमध्ये जाऊन शिकायचे, पण त्यासाठी एक अट असते, ती म्हणजे घर घरीच ठेवून यायचे म्हणजे घर घराबाहेर ठेवा म्हणजे घर मॅनेज होते. पण महाराजांची व्यवस्था हे मूल्य सांगते की, घर घरातच ठेवा. घराला घराबाहेर काढू नका म्हणजे घर मॅनेज होते. शिक्षण शाळेत असू द्या, शिक्षणाला शाळेच्या बाहेर काढू नका म्हणजे शिक्षण मॅनेज होत राहते. म्हणजेच ज्या काळात व्यवस्थापनशास्त्र हा शब्द सुद्धा प्रचलित नव्हता, तेव्हा गुरुदेवांनी गुरुकुल शिक्षण प्रणालीचा, व्यवस्थापनशास्त्राचा यशस्वी प्रयोग करून समाजाला एक आदर्श जीवनाचे व्यवस्थापन कसे करावे याचा धडा घालून दिला. तो शील, ज्ञान, प्रेम, सेवा मूल्यांद्वारे खऱ्या व्यवस्थेतच सेवा आहे, खऱ्या सेवेतच खरे प्रेम आहे. खऱ्या प्रेमातच खरे शील आहे. शीलातच खरे ज्ञान आहे. विचारांची आणि संस्कारांची-कृतीची हीच खरी व्यवस्था आहे. हा व्यवस्थेचा अनुभव आजही गुरुदेवांच्या गुरुकुल शिक्षण प्रणालीतून समाजाला मिळतो.

आजच्या २१व्या शतकाच्या जगात लौकिक शिक्षणाबरोबर धार्मिक व आध्यात्मिक शिक्षण हे नक्कीच समाजाला सुखी व समृद्ध बनवणारे आहे. आजच्या शीघ्रकोपी, हिंसक व मोबाईलच्या आहारी गेलेल्या विद्यार्थ्यांना सुधारण्यासाठी नक्कीच महाराजांची गुरुकुल शिक्षण प्रणाली योग्य दिशा देण्यास वाटाड्या म्हणून काम करत आहे. महाराजांनी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक येथे जी गुरुकुले निर्माण केली ती आज हजारो लोकांना मार्गदर्शक बनली आहेत. त्यामुळे समाजाला संस्कार, शिस्त व साधनेची नवी दिशा मिळाली आहे. जैन समाजाच्या चारित्र्यसंवर्धन मंदिराच्या पूर्वभागी गुरुकुल हे 'मानस्तंभ' आहे.

झाड समृद्ध होते ते फुला व पानांमुळे. त्या झाडावर अधिक फुलं, पानं उमलली की ते झाड अधिक खुलतं, फुलत, सुंदर व समृद्ध होतं. अहिंसा, सत्य, क्षमा, मैत्री या मूल्यांमुळे श्रमण संस्कृती मुळातच सुंदर व समृद्ध आहे. या समृद्ध संस्कृतील समृद्ध आहे, या समृद्ध संरकृतीला ज्ञान, शील, प्रेम, सेवा व व्यवस्था या मूल्यांचा नुसताचा विचार दिला नाही तर आचारही दिला, त्यासाठी त्यांनी प्राचीन भारतीय जैन गुरुकुल शिक्षण प्रणालीच्या पुनरुज्जीवनाचा प्रयोग केला. हा प्रयोग आजही सुरु आहे. उद्याही सुरु राहणार आहे. हा प्रयोग शाश्वत आहे, चिरकाल टिकणारा आहे. तो कधीही न संपणारा आहे. अशा प्रयोगाला, प्रयोगभूमीला व त्यांची सम्यक् भक्ती करणाऱ्यांना विनम्र अभिवादन.

*****

---

## भद्र - भारती

*** शिक्षा व शिक्षण-**

**सर्व मुलांकडे पूर्ण लक्ष असावे, त्यांच्याशी प्रेमाने वागावे. चुकतील तेथे समजावून सांगावे. रागाने, क्रोधाने, डोळे वटारून किंवा कर्कश भाषेत सांगितल्याने सुधारणा होण्याऐवजी उलट प्रतिक्रिया होते, अनादर होतो. धाकामुळे त्यावेळी पुरते करतील परंतु मनांत मात्र अ-रति (Dislike) भाव उत्पन्न होईल. तेव्हा हे शिक्षणाचे सूत्र लक्षात ठेवावे.**

*** कर्तव्य हेच सुख-**

**आपले पवित्र कर्तव्य व्यवस्थितपणे बजावण्यात वर्तमानकाळाचे आणि भविष्यकाळाचे सुख अवलंबून असते. सुख बाहेर कोठेही आणि कसल्याही पदार्थांत नसून ते केवळ अंतरीचा सद्गुण विकास करण्यातच आहे, हे महाराजांनी आपणास नव्याने सांगावे असे नाही.**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

# दु:खी जीवाचे सांत्वन व समुपदेशन

**डॉ. सुरुची धवल शहा,** पनवेल
८०९७८६४८८९

समुपदेशन – काउन्सेलिंग हा शब्द आजच्या मितीस बऱ्याचदा कानावर येतो. मला आठवते, जेव्हा मी बारावी झाले म्हणजेच आजपासून सुमारे ३० वर्षांपूर्वी सायकोलॉजी या विषयासाठी बारावी-नंतर सहज ॲडमिशन मिळून जायची. परंतु आज हे चित्र एकदम पालटलेले आहे आणि हे माझ्या मुलीला सायकॉलॉजीसाठी ॲडमिशन घेताना माझ्या लक्षात आले. ह्या शाखेसाठी विद्यार्थ्यांच्या रांगा लागतात, त्यामुळे ९०%च्या वर याचा कट ऑफ गेलेला आहे. आणि याचे कारण आज मूल जन्मल्यापासून वार्धक्यापर्यंत सर्व वयोगटातील, विभिन्न स्तरातील, वेगवेगळ्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीतील लोकांना समुपदेशनाची गरज, आवश्यकता भासत आहे.

आताचे हे जीवन धकाधकीचे, ताणतणावाचे बनले आहे. अगदी लहान मुलांचे देखील खेळण्या-बागडण्याच्या वयात नैराश्य, टेन्शन यामुळे बालपण करपून, हरवून गेले आहे. शर्यतीतील घोड्यांप्रमाणे ही मुले आई-वडिलांच्या आशा-आकांक्षांचे ओझे घेऊन विविध बोर्डस्, ॲडमिशनस, एंट्रन्स अशा चक्रात अडकली जातात. त्याचबरोबर क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, बुद्धिबळ, कराटे, डान्स, स्केटिंग, चित्रकला, कॅलिग्राफी, गिटार, पियानो इत्यादी छंद वर्ग व नानाविध एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटीज मध्ये भरडली जातात. कारण दोन्ही मध्ये आपल्या पाल्याने अव्वलच यावं ही पालकांची मुलांकडून अपेक्षा असते. या दडपणाखाली त्यांची संवेदनशील मने कोमेजली जातात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली फ्रस्ट्रेट होतात.

पदवी अभ्यासक्रमासाठी देखील विविध प्रवेश परीक्षा, स्पर्धात्मक गुणांची रस्सीखेच, परीक्षांमध्ये होणारे घोटाळे, पेपर फुटणे इत्यादी बातम्या आपण वर्तमानपत्रात वाचतो; त्यामुळे होणारे विद्यार्थ्यांचे नुकसान, अभ्यासक्रमांच्या फुगलेल्या फीज, त्यावर काढलेले एज्युकेशन लोन, ह्या गोष्टींचे दडपणही उमलत्या वयात मुलांवर येतं आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रियर प्रेशर – वाईट संगत, वाईट लत लागणे हेही आज सर्वत्र दिसून येते. महाविद्यालयच नव्हे तर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देखील गर्लफ्रेंड / बॉयफ्रेंड असणे आजकाल अनिवार्य झाले आहे, त्यामुळे पर्यायाने 'दिल के तुकडे हजार हुए' अर्थात ब्रेकअप्स हे देखील डिप्रेशनचं कारण बनले आहे.

शिक्षण संपता संपता नोकरी, जॉब यासाठी धावाधाव. त्याच काळात सेटल होणे ही अपेक्षा ! त्यासाठी पुणे-मुंबई मध्ये छानसा कमीत कमी टू बीएचके फ्लॅट, एखादी चारचाकी गाडी आवश्यक ! कारण त्याशिवाय आजकालचे पालक मुलाला मुलगीच देत नाहीत. आणि ह्या गोष्टींसाठी विविध लोन्सचा सुळसुळाट! 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' म्हणायला सोपे आहे हो, परंतु ईएमआयचे हप्ते भरता भरता ऋणकर्ता पिळवटून जातो. आणि अती टेन्शनने लहान वयातच बीपी वाढून हृदयविकाराला बळी देखील पडतो.

ह्या झाल्या तरुणांच्या व्यथा ! तर ह्या धावपळीत वयोवृद्धांकडे लक्ष द्यायला वेळच कोणाला आहे? 'जुने जाऊ दे मरणां लागुनी' अशी गत झालेली आहे.

आजकालच्या विभक्त कौटुंबिक पद्धतीमुळे तणाव खूप वाढलेला दिसतो. संवाद साधण्यास, पाठीवर हात ठेवून दिलासा, आधार द्यायला घरात माणसेच नाहीत. नुसते अपेक्षांचे ओझे व त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी उर फुटेस्तोवर घोडदौड ! हे आजचे मोठ्या शहरांतील भीषण वास्तव आहे. हास्यविनोद, थट्टामस्करी अशा गोष्टी विरळ होऊ लागल्या आहेत, परिणामी खोटे खोटे हसण्याचे हास्य क्लब गरजेचे झाले आहेत.

मदिरालयाच्या सोबतच मनःशांतीसाठी मंदिरांपुढेही मोठ्या मोठ्या रांगा लागलेल्या दिसतात ! पण त्यातही निखळभक्तीपेक्षा अंधश्रद्धा जास्त दिसते. देवासमोर कोणीही काही ना काही मागतानाच दिसतो. परंतु धर्म आचरणात आणताना कोणीच आढळत नाही, मग मन:शांती कशी मिळेल?

या दुःख आणि नैराश्य याचा कडेलोट होऊन आत्महत्येचे पाऊल उचलले जाते. म्हणूनच दुःखी माणसाच्या मनावर हळुवार फुंकर घालणे आवश्यक आहे.

सांत्वनाने दुःखी-कष्टी जीवाला दिलासा, आधार मिळतो. मनापासून बोललेले प्रामाणिक शब्द दुःख कमी करून व्यक्तीला शांत करतात, उमेद देतात. तर समुपदेशनामध्ये व्यक्तीकडून त्याच्या भावना व्यक्त करवून घेतल्या जातात, त्याच्या समस्यांवर उपाय शोधण्यास मदत केली जाते, त्या व्यक्तीला स्वतःची शक्तीस्थळे शोधता येतात, भावना व वर्तणूकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी व सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होते. त्यामुळे तो तणावाचा सामना समर्थपणे करू शकतो, चिंता नैराश्यावर उपचार केला जातो, पर्यायाने त्याचे मानसिक आरोग्य सुधारते.

कोणी असेही म्हणेल की, आमचे दुःख तुम्हाला काय समजणार? भरल्या पोटी उपदेश देणे सोपे आहे, परंतु जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे! अशावेळी त्या जीवाने विचार करावा की दुःख उगाळून ते काही कमी होणार नाही, उलट एकसारखा विचार करून शक्ती फुकट जाते आणि निराशाच येते. त्यावर मात करण्यासाठी पुरुषार्थच करावा लागणार आहे. बिकट परिस्थितीमध्ये धैर्य धारण करून मार्ग काढावा. सगळं संपलं असं वाटत असतानाही शांतपणे सर्वदृष्टीने पुन्हा परिस्थितीचा आढावा घेतला असता कोठेतरी आशेचा किरण नक्कीच दिसतो, म्हणून नकारात्मक विचार सोडून सकारात्मकता अंगीकारावी. वामन पंडितांची एक कविता आहे की,

**तोडीला तरु फुटे आणखी भराने**
**तो क्षीण ही विधु महोन्नती घे क्रमाने ।**
**आली जरी कष्टदशा अपार**
**न टाकिती धैर्य तथापि थोर ।**
**केला जरी पोत बळेंचि खाले**
**ज्वाला परी ते वरती उफाळे ।।**

जिद्द व प्रयत्नांनी दुःखावर मात केली पाहिजे. या पंक्ती मनाला उभारी देणाऱ्या, विश्वास वाढवणाऱ्या आहेत. संकटापेक्षा मोठे होऊन त्याच्याशी दोन हात करण्याचे बळ देणाऱ्या आहेत. निसर्गामधील दृष्टांत, संत महात्मे थोर पुरुषांची चरित्रे देखील आपणास मार्गदर्शक बनतात.

पंडित जुगलकिशोर मुख्तार लिखित 'मेरी भावना' अर्थ समजून रोज म्हटली तरी मनातील वाईट विचार दूर होऊन मनाला उभारी मिळते. त्यातील काही ओळी पुढील प्रमाणे आहेत. -

**रहे अडोल-अकंप निरंतर, यह मन दृढतर बन जावे ।**
**इष्ट-वियोग अनिष्टयोगमें, सहनशीलता दिखलावे।।**
**घर-घर चर्चा रहे धर्मकी, दुष्कृत दुष्कर हो जावे।**
**ज्ञानचरित उन्नत कर अपना, मनुजजन्म फल सब पावे।**
**वस्तुस्वरुप विचार खुशीसे, सब दुःख संकट सहा करे।।**

कोणत्याही दुःखातून, संकटातून तारून जाण्यासाठी माणसाला आपले मन दृढ आणि स्थिर, शांत ठेवावे लागेल, सहनशीलता त्याला धारण करावी लागेल, धैर्य धारण करावे लागेल. आणि अजून एक गोष्ट ते सांगतात की वस्तू स्वरूप काय आहे, धर्म काय आहे याचे चिंतन करावे त्यामुळे

तुम्ही स्वतःची उन्नती साधू शकता आणि संकटावर मात करू शकता. इतकेच नाही, तर हा मनुष्य जन्म सुद्धा तुम्ही सफल करू शकता.

जैन धर्मामध्ये वस्तू स्वरूप अर्थात जीवादी सात तत्वे सांगितली आहेत. ती सांगण्यामागे जीवाला सुख प्राप्त व्हावे हेच प्रयोजन आहे. कारण जीव व अजीवाचे स्वरूप जाणल्यामुळे कोणाचा वियोग झाला तरी जीवाचे अमरत्व जाणण्याने दुःखाची तीव्रता कमी होते.

करणानुयोगाच्या कर्मप्रकृती या ग्रंथामध्ये आचार्य नेमिचंद्र सांगतात की,

**दुक्ख-वह-सोग-तावाकंदण-परिदेवणं च ।**
**अप्पट्ठियमुभयट्ठियमिदि वा बंधो असादस्स ।।**

अर्थात दुःख म्हणजे पीडा, वेदना. वध म्हणजे आत्मघात किंवा परघात. शोक म्हणजेच इष्ट वियोगाने येणारी विफलता. चित्ताला होणारा खेद म्हणजे ताप. हृदयाला भेदणारे, पिळवटून टाकणारे असे आक्रंदन व परिदेवन म्हणजे रडणे, अश्रुपात करणे. या क्रिया स्वत: करणे किंवा दुसऱ्याला करविणे याने असातावेदनीय कर्माचा बंध होतो. दुःखस्वरूप इंद्रिय विषयांचा अनुभव करविणारे असाता वेदनीय कर्म म्हटले जाते.

तसेच अशा तीव्र संक्लेश परिणामांनी आपण अशुभकर्मांचा उत्कृष्ट स्थिती आणि अनुभाग बंध करतो. ज्यामुळे त्या कर्मांच्या उदयात आपल्याला तसेच अशुभ फळ प्राप्त होते. आगमामध्ये घातीकर्मांची फलदानशक्ती लता/वेल, काष्ठ/लाकूड, अस्थी आणि शैल/पाषाण या उदाहरणांद्वारे वर्णिली आहे. वेल कोमल असते परंतु उत्तरोत्तर काठिण्य वाढत पाषाण हा अत्यंत कठोर असतो, तद्वत कर्माचे फळही त्या त्या तीव्रतेने आपल्याला भोगावेच लागते. तसेच अप्रशस्त कर्मांची कटुता ही नीम, कांजीर विष आणि हलाहल या उदाहरणांनी आचार्यांनी वर्णिली आहे. ज्यानुसार हे अशुभकर्म आपल्याला दुःखाची कटुता चाखवतं. यावरून एक गोष्ट स्पष्ट जाणावी की जे आपण दुःख आज भोगत आहोत ते आपणच केलेल्या कर्माचे फळ आहे, त्यातून आपली सुटका नाही. कोणी समजेल की आत्महत्या केल्याने हे सर्व दुःख संपून जाईल. परंतु तो सुटकेचा मार्ग नव्हे. आत्महत्या हेच एक मोठे पाप आहे. तसेच आत्महत्या करणारी व्यक्ती हा ही विचार करीत नाही की, आपल्या पश्चात आपल्या जवळच्या व्यक्तींवर किती दुःखाचा डोंगर कोसळेल! तसेच ज्या पापकर्मांच्या उदयात आपण दुःख भोगत आहोत ते कर्म फळ देऊनच जाणार आहे. आपण मात्र आकुलता, आर्त-रौद्र परिणाम करून पाप बंधच करीत आहोत, ज्याचे फळही आपल्याला अशुभच मिळणार आहे. आत्महत्या करण्याने आयुकर्म संपून जाईल, परंतु बांधलेले जे काही चांगले वाईट कर्म आहे, ते मात्र पुढील भवात आपल्या सोबत येणार आहे आणि ते जेव्हा उदयाला येईल तेव्हा त्याचे बरे-वाईट फळ तर देणारच आहे, त्यातून कोणाचीही सुटका नाही. पुराण कथांमध्ये देखील आपण कर्मफळाची अनेक उदाहरणे पाहू शकतो. अगदी प्रथम तीर्थंकर वृषभनाथांना सुद्धा पूर्वभवात बैलाचे तोंड अल्पावधीसाठी बांधून ठेवल्यामुळे त्या कर्माच्या फलस्वरूप वृषभनाथांच्या भवात मुनी अवस्थेमध्ये सहा महिने आहार मिळाला नव्हता.

तसेच सुख व दुःख हे कायमस्वरूपी कधीच कोणाला नसते. ते चाकाप्रमाणे वर खाली फिरत राहतात. म्हणतात ना

**कस्यैकांतं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा ।**
**नीचैर्गच्छति उपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।।**

आणि दुःखानंतर आलेले सुख हे अभूतपूर्व असते, अंधारात जसा दिवा! म्हटलेच आहे

**सुखं ही दुःखान्यनुभूय शोभते ।**
**यथान्धकारादीव दीपदर्शनम् ।।**

धन्यवाद !

*****

**वर्गणीदारांना विनंती...**
**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

## प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या ३७व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

गुरुकुल प्रणालीचे पुनरुद्धारक व श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा आदि अनेक गुरुकुलांचे संस्थापक प. पू. गुरुदेव श्री १०८ समंतभद्र महाराज यांच्या ३७व्या पुण्यस्मृति-दिनानिमित्त दि. १८ ऑगस्ट २०२५, सोमवार रोजी श्री महावीर ब्रह्मचर्याश्रममध्ये मंगलमय वातावरणात खालील विवरणाप्रमाणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ---

**✻ जिनेंद्र अभिषेक, गुरुदेव पूजन व शोभायात्रा–**

या विशेष दिवसाचा प्रारंभ सकाळी ७:१५ वाजता मंगलमय जिनेंद्र अभिषेकपूर्वक झाला. त्यानंतर मूलनायक भ. महावीर पूजन व प्रासंगिक प. पू. गुरुदेव समंतभद्र पूजन भक्तीभावमय वातावरणात संपन्न झाले.

पूजनानंतर जिनमंदिराच्या प्रांगणात स्थित गुरुदेवांच्या चरण पादुकाजवळ अर्घ्य समर्पित करून गुरुदेव स्तुती व समाधी भावनाचे वाचन करून सर्व उपस्थित्यांच्या द्वारे गुरुदेवांना विनयांजली समर्पित करण्यात आली. त्यानंतर भक्तिमय वातावरणात व जयघोषपूर्वक रजत पालखीतून प. पू. गुरुदेवांच्या फोटोची गुरुकुल परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ज्यामध्ये गुरुकुल विद्यार्थ्यांसह साधर्मी जणांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला व शोभायात्रा भूमिशुद्धी स्थळी पोहोचली.

**✻ शोधार्थी छात्र व विद्वत् निवास भूमिशुद्धी समारोह**

ज्ञान आणि ध्यान या गुरुदेवांच्या ध्येयास अनुसरून संस्थापित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम्च्या विस्ताराच्या उद्देश्याने सेंटरच्या इमारती लगत शोधार्थी व समागत विद्वान यांच्या निवासाची सुविधा निर्माण करण्यासाठी जिनवाणी संवर्धन केंद्र, पोन्नूर यांच्या विशेष सहयोगातून निर्माण होणाऱ्या शोधार्थी छात्र व विद्वत् निवास भूमिशुद्धीचा कार्यक्रम संपन्न झाला. या कर्यक्रमासाठी विशेष आमंत्रित अतिथी रूपाने श्री. प्रकाशजी नाके चिखली, डॉ. नेमीनाथजी बाळीकाई(शास्त्री) बाहुबली (कुंभोज), सौ. विजयाताई नांदगावकर कारंजा, श्रीमती शोभाताई काळे परिवार कारंजा व श्री. सुरेशजी तांगडे परिवार कारंजा तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त उपस्थित होते.

अनुक्रमे आमंत्रित विशिष्ट अतिथीगण, समस्त पदाधिकारी व विश्वस्त मंडळी, उपस्थित श्रावक – श्राविका तसेच गुरुकुल विद्यार्थी यांच्या द्वारे भूमिशुद्धी करण्यात आली. भूमिशुद्धी प्रक्रिया पं. चिंतामण शास्त्री व पं. आलोक शास्त्री, कारंजा यांच्या निर्देशनामध्ये संपन्न झाला.

**✻ श्री. म. ब्र. आश्रम हायस्कूलमध्ये पत्र–पीयूष वाचन उपक्रमाचा शुभारंभ–**

गुरुदेवांचे सर्वतोभद्र सद्विचार सर्वांसाठीच सदैव मार्गदर्शक असून शाळेतील विद्यार्थ्यांना सुद्धा याद्वारे आपले आदर्श जीवन निर्माण करता यावे या उद्देश्याने गुरुदेवांच्या पुण्य स्मृतिदिनाचे औचित्य साधून श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलमध्ये दैनंदिन परिपाठांतर्गत पत्र–पीयूष वाचन हा उपक्रम पुनर्प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमामध्ये पत्र–पीयूष मधील एक पत्र दररोज विद्यार्थ्यांसमोर वाचन करून त्यावर आधारित मासिक परीक्षा घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्याची सुद्धा शाळेची योजना आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनविण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, असा विश्वास वाटतो.

**✻ श्री. म. ब्र. आश्रम हायस्कूल येथे विनयांजली सभेचे आयोजन–**

गुरुदेवांच्या स्मृतिदिनानिमित्त शाळेमध्ये विनयांजली सभेचे आयोजन करण्यात आले. विनयांजली सभेचे अध्यक्षीय स्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. सरोदे सर यांनी भूषविले. सभेच्या प्रारंभी गुरुकुलच्या इ. ७वी अ विद्यार्थ्यांनी प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज स्तुती सादर केली. इयत्ता सातवी, आठवी व नववीचे विद्यार्थी अनुक्रमे प्रणव लुंगारे, मंथन मोडक व वेदांत चोपडे यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवून पूज्य गुरुदेवांच्या बालपणी, मातापित्यांचे त्यांच्यावर झालेले संस्कार, प्राथमिक–माध्यमिक–उच्च शिक्षण, त्यांना लाभलेली प्रखर बुद्धिमत्ता, महाविद्यालयीन जीवनात मराठी, इंग्रजी व

संस्कृत साहित्याचे वाचन, शालेय जीवनातील त्यांचे मित्र, हुतात्मा मोतीचंद इत्यादी संबंधी माहिती दिली तर शिक्षक वक्ता म्हणून कु. श्वेता टिकाईत यांनी पूज्य गुरुदेवश्रींच्या गृहस्थाश्रमीच्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनामध्ये घडलेल्या विविध घडामोडी, कारंजा येथे त्यांचा आगमनाचा हेतू, गुरुकुलची स्थापना इत्यादी संबंधी थोडक्यात माहिती देऊन प. पू. गुरुदेवांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विनयांजली सभेचे अध्यक्ष आ. मुख्याध्यापक श्री. सरोदे सर यांनी महापुरुषांच्या जीवनासंबंधीची नियोजनबद्धता व कार्यपद्धतीची सजगता व्यक्त करून प. पू. गुरुदेवांप्रती आदरांजली व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन वर्ग ७वी अ ची विद्यार्थिनी कु. वैष्णवी चव्हाण हिने केले.

## कंकुबाई श्राविकाश्रम, कारंजा

प. पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराजांनी स्थापन केलेल्या एकोणवीस गुरुकुल संस्थांपैकी कंकुबाई श्राविकाश्रम ही एकमेव कन्या गुरुकुल संस्था होय. या संस्थेच्या अंतर्गत रत्नप्रभा मेहता बालविकास मंदिर, प्राथमिक कन्या शाळा, माध्यमिक कन्या शाळा यशस्वीरीत्या कार्यरत आहेत. अनेक शैक्षणिक सुविधांसोबतच येथील १७,००० पुस्तकांनी समृद्ध ग्रंथालय संस्थेच्या वैभवात भर घालणारे आहे. विद्यार्थिनींसोबतच शिक्षिकांचाही वाचनाचा व्यासंग वाढावा, त्या माहितीचा उपयोग त्यांना अध्यापन करताना व्हावा, या दृष्टीने पुस्तक भिसी हा आगळा-वेगळा उपक्रम गत चार महिन्यांपासून शाळेत राबविला जात आहे. तिन्ही विभागातील शिक्षिका या उपक्रमात सहभागी होतात. दर महिन्याला एका पुस्तकाचे समीक्षण एका शिक्षिकेद्वारे केले जाते.

दि.१८ ऑगस्ट हा प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराजांचा स्मृतिदिन ! त्यानिमित्ताने डॉ. नेमिनाथ बाळीकाई शास्त्री लिखित प. पू. समंतभद्र महाराज : व्यक्तित्व व कर्तृत्व या चरित्र ग्रंथाचा परिचय करून देण्यात आला. पुस्तकाचे लेखक बाहुबलीनिवासी डॉ. श्री. नेमिनाथ शास्त्री या प्रसंगी स्वतः उपस्थित होते.

पुस्तकाचे समीक्षण करताना माध्यमिक विभागाच्या शिक्षिका नीलिमा डाखोरे यांनी गुरुदेवांच्या चरित्राचा संक्षिप्त, पण सर्वसमावेशक आढावा घेतला. गुरुदेवांच्या पूर्वजांचे मूळ गाव गुजरात मधील कडीयाद्र हे होते. पण त्यांचे सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे झालेले स्थलांतर हे कारंजाच्या भाग्योदयाचे कारण ठरले आणि श्री महावीर ब्रह्मचर्याश्रमच्या रूपाने सन १९१८मध्ये कारंजा लाड येथे पहिले गुरुकुल प. पू. समंतभद्र महाराजांनी स्थापन केले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र व कर्नाटक येथे १९ गुरुकुले स्थापन केली होती. पण प्रत्येक गुरुकुलाच्या कारभारावर त्यांचे बारीक लक्ष असायचे. प्रत्येक विद्यार्थी आदर्श असावा म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना घालून दिलेल्या नियमांची माहिती डाखोरे यांनी दिली. प. पू. गुरुदेवांचे नियोजन, त्यांचे भाषाप्रभुत्व, निसर्गोपचार व आयुर्वेदाचे ज्ञान, कलांची उत्तम जाण, अद्भुत पाठांतर, स्मरणशक्ती इ. गुणांविषयी विशेष माहिती त्यांनी दिली.

गुरुदेवांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले डॉ. नेमिनाथ शास्त्री यांनी आपल्या सहज आणि ओघवत्या वाणीतून गुरुदेवांविषयी माहिती सांगितली. गुरुदेवांच्या एकाग्रतेची क्षमता स्पष्ट करताना त्यांनी गुरुदेवांनी दिलेल्या विविध जाप्यांविषयी सांगितले. तसेच त्यांना जवळ जवळ दहा हजार श्लोक कंठस्थ असल्याचे सांगितले. डॉ. नेमिनाथ शास्त्रीजींच्या वक्तव्यामुळे गुरुदेवांच्या जीवनातील अनेक नवीन पैलू समजले. गुरुदेवांनी स्थापन केलेल्या विविध गुरुकुलांविषयी सविस्तर माहिती देखील यावेळी दिली. कारंजा व बाहुबली गुरुकुल स्थापन करताना गुरुदेवांना आलेल्या पराकोटीच्या अडचणी त्यांनी सांगितल्या.

प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज : व्यक्तित्व आणि कर्तृत्व या चरित्र ग्रंथाचे वाचन करताना शिक्षकांना आलेल्या अडीअडचणी व शंकांचे निरसन यावेळी त्यांनी केले. या पुस्तकावर आधारित एका प्रश्नावलीचे आयोजनही करण्यात आले होते. शिक्षक असूनही परीक्षार्थींची भूमिका पार पाडताना आलेल्या अडचणी व घडलेल्या गंमतीजमती शाळेतील शिक्षिका अनुराधा केळतकर यांनी सांगितल्या. डॉ. नेमिनाथ शास्त्री यांनी संकलित

केलेले भद्र–भारती हे पुस्तक सर्व शिक्षिकांना भेट स्वरूपात देण्यात आले. या प्रसंगी कंकुबाई श्राविकाश्रम संस्थेचे अध्यक्ष श्री. कीर्तीकुमार भोरे, शाळा समितीचे अध्यक्ष श्री. संजीव रुईवाले, श्री. राजकुमार डोणगांवकर व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मनीषा रायबागकर हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रज्ञाताई डोणगांवकर, प्रांजलीताई रुईवाले, तिन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका, शिक्षिका वृंद तसेच महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलचा शिक्षक वृंद, गावातील श्रोतृवृंद उपस्थित होते. माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका कल्पना घोंगटे यांनी कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन केले.

– उल्का रुईवाले

**वरील कार्यक्रमाविषयी कंकुबाई कन्या शाळेच्या शिक्षिकांनी आपले उत्स्फूर्त अभिप्राय नोंदवले आहेत. त्यापैकी काही निवडक अभिप्राय येथे प्रस्तुत करीत आहोत....**

१)*......कालचा पुस्तक भिशीचा कार्यक्रम अतिशय सुंदर आणि स्मरणात राहण्यासारखा आहे. नेमिनाथ शास्त्री सरांसारखे व्यक्तिमत्त्व आमच्यासमोर बोलत आहे ...खूप मोठी गोष्ट आहे. तल्लीन होऊन आम्ही सर्व ऐकत होतो. कसा वेळ निघून गेला माहितच पडले नाही.

मला माझे वडिल गुरुकुलातील गोष्टी सांगायचे. माझे वडील म्हणजे महावीर गुरुकुलचे विद्यार्थी. आपण ज्यांना पुस्तकात वाचलेलं आहे, त्यांना त्यांनी अनुभवलेलं आहे. तात्याजींनी त्यांच्या आजारावर सुद्धा निसर्गोपचार पद्धतीनेच उपचार केला होता......

**सौ. धनश्री शेंडेकर,** शिक्षिका,कं.मा.क.शा., कारंजा

२)*......कालची बुक भिशी दोन्ही उत्तम वक्त्यांमुळे दीर्घकाल लक्षात राहील. अनेक नवीन गोष्टी सरांनी सांगितल्या, शंका समाधान झाले, सरांची तळमळ जाणवली.

सरांच्या उत्तम वक्तृत्वाला सलाम!......

**सौ. राजश्री गहाणकरी,** स.शिक्षिका,कं.मा.क.शाळा, कारंजा (लाड)

३)*........गुरुदेवांच्या संस्थेमध्ये काम करण्याची मिळालेली संधी आमचे भाग्यच. गुरुदेवांना प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले नाही, परंतु त्यांचे आशीर्वाद मात्र आम्हाला लाभले आहेत .

आदरणीय भाऊंचे मार्गदर्शन आणि पाठिंबा आम्हाला आधारच आहे .

आदरणीय उल्काताईंनी अंमलात आणलेला पुस्तक भिशी उपक्रम आमच्या ज्ञानात भर घालण्यासाठी प्रेरकच आहे.

शास्त्री सरांचं मनोगत अनेक नवीन उत्कंठावर्धक माहितीने परिपूर्णच आहे .

गुरुदेवांठायी असलेली प्रत्येक कार्यातील निष्ठा, समर्पण त्यांनी अंगीकारलेली आहे......

**सौ. कल्याणी कस्तुरीवाले,** स.शिक्षिका, कं.मा.क.शाळा, कारंजा (लाड)

४)*.....खरंच व्याख्यानाचा कार्यक्रम खूप छान झाला. नेमिनाथ शास्त्री सर यांचे व्याख्यान ऐकतच रहावे असे वाटले. परीक्षेच्या भीतीने का होईना पुस्तक वाचले आणि त्यामुळे महाराजांबद्दल त्यांच्या कार्याबद्दल माहिती मिळाली.......

**सौ. प्राची देसाई,** स.शिक्षिका, कं.मा.क.शाळा, कारंजा

५)*....पुस्तक भिशीच्या या अभिनव कल्पक उपक्रमामुळे आज प्रत्यक्ष पुस्तक व लेखक दोघांनाही अनुभवता आले. नेमिनाथ शास्त्रीजींनी प्रत्यक्ष गुरुदेवांना भेटल्याचा अनुभव घडवून आणला. त्यांच्या अभ्यासपूर्ण, विनयशील, वैचारिक वक्तृत्वामुळे गुरुदेवांच्या जीवनातील समर्पण, त्याग, समाजहित, विद्यार्थी प्रेम, कर्तव्यनिष्ठा यांची अनुभूती आली. वैचारिक नेतृत्व करणाऱ्या नेमिनाथ शास्त्रीजींनी आम्हा सर्वांना नवीन ऊर्जा आणि प्रेरणा देऊन उपकृत केले आहे. नेमिनाथ शास्त्रीजींना आदरपूर्वक, विनयपूर्वक प्रणाम !.........

**मनीषा त्रिकांडे,** स.शिक्षिका, कं.मा.क.शाळा, कारंजा

६) *......सरांविषयी तर काय बोलावे ...सर बोलत होते आणि आम्ही अगदी तल्लीन होऊन ऐकत होतो... सरांनी अजून माहिती द्यावी असे वाटत होते... सरांशी प्रत्यक्ष बोलतानाही शिक्षणासाठीची त्यांची धडपड दिसून आली.....

**सौ. मनीषा रायबागकर,** मुख्याध्यापिका,कं.मा.क.शाळा

७) *.....आदरणीय नेमिनाथ शास्त्री सर, यांना सस्नेह जय जिनेंद्र !

'गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या आपल्या पुस्तकामुळे गुरुदेवश्रींच्या जीवनातील अनेक नवीन पैलू आमच्यासमोर आले आहेत. आपण केलेले संशोधनात्मक लेखन आपल्या ओघवत्या वाणीने आम्हांला प्रत्यक्षात ऐकायला मिळाले. पुस्तकाचं वाचन आणि त्याच पुस्तकाचे लेखन केलेल्या लेखकाने आम्हाला त्याच्यातील मुद्दे आपल्या उत्कृष्ट वक्तृत्व शैलीने सांगणं हा एक सुवर्णयोगच ! आमच्या सर्वांच्या प्रेरणास्रोत असलेल्या उल्काताईंच्या भिशी या उपक्रमामुळे घडून आला याचा आम्हांला खूपच आनंद झाला......

**सौ. प्रीता भोंगाडे,** मुख्याध्यापिका, कंकुबाई प्राथमिक कन्या शाळा

८)*......आदरणीय नेमिनाथ शास्त्री सर, यांना सस्नेह जय जिनेंद्र !

'गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज : व्यक्तित्व व कर्तृत्व' या पुस्तकाचे आपण केलेले लेखन आणि त्यांवरील आपले वक्तृत्व दोन्ही भारावून टाकणारे आहे. प. पू. गुरुदेव आपल्या शब्दातून आणि वाणीतून खऱ्या अर्थाने उमगले. आपली प्रभावशाली अमोघ वाणी इतकी सहज आणि सुकर होती की, कठीण शब्दही समजून घेणे सोपे गेले.'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत पुस्तक बी सी च्या निमित्ताने आ. उल्काताईंनी आपणांस बोलावून आम्हांला जणू विचारांची अनमोल मेजवानीच दिली. आपण सांगितल्याप्रमाणे पुस्तकातील 'दुसरा अध्याय : एक देवतुल्य आदर्श व्यक्तिमत्त्व' जीवनोपयोगी आहे, मार्गदर्शक आहे. आपल्या शब्दांचे सामर्थ्य वाचकांना आणि श्रोत्यांना खिळवून ठेवणारे आहे. गुरुदेवांच्या कार्याचा गौरव करणारे आपले लिखाण प्रत्येकाला प्रेरणादायी आणि मानवीमूल्ये जोपासण्यास मदत करणारे आहे. लेखकाने स्वतः लिहिलेल्या गोष्टी आणि त्यासाठी घेतलेले महत् प्रयत्न त्यांच्याकडून ऐकताना वाचकाला एक वेगळीच उर्जा देतात. त्यामुळे आपले वक्तव्य संपूच नये असे त्याक्षणी वाटत राहिले.

आपण याठिकाणी आलात आणि आपला बहुमूल्य वेळ आम्हांला दिला, त्याबद्दल आपले खूप खूप आभार ! आपल्या पुढील लिखाणास भरघोस शुभेच्छा !

**सौ. उज्ज्वला इंगळे,** कं.मा.क.शाळा, कारंजा

# कारंजा येथील गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्या समाधिदिवसाची क्षणचित्रे....


गुरुदेवश्रीवरील पुस्तक समीक्षण समारंभप्रसंगी दीपप्रज्वलन करताना डॉ. नेमिनाथ शास्त्री


समारंभास उपस्थित श्री. संजीव रुईवाले, श्री. राजकुमार डोणगावकर, श्री. कीर्तिकुमार भोरे


गुरुदेवश्रीवरील पुस्तकाविषयी मार्गदर्शन करताना डॉ. नेमिनाथ शास्त्री



गुरुदेवश्री समंतभद्र महाराज : व्यक्तित्व व कर्तृत्व याचे आस्वादक समीक्षण करताना नीलिमा डाखोरे


गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचे व्यक्तिमत्त्व ऐकताना कंकुबाई श्राविकाश्रममधील बालिका


महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलमध्ये डॉ. नेमिनाथ यांचे संस्कृत विषयाचे मार्गदर्शन


गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्या समाधी समोर समाधीपाठ म्हणताना आश्रमचे विद्यार्थी व पदाधिकारी


गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त नूतन विस्तारित वास्तूचे भूमिशुद्धिकरण


महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलमध्ये गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचा समाधी महोत्सव

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४३वर)

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 30-08-2025



जनतारा शैक्षणिक संकुल, जयसिंगपूर येथे प्राचार्य श्रीधर हेरवाडे स्मृतिविशेषांक हे तीर्थंकर मासिकाचे विशेषांक प्रकाशित करीत असताना श्री. डी. ए. पाटील, डॉ. महावीर अक्कोळे, डॉ. सुरेश पाटील, श्री. महावीर पाटील, स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक कोल्हापूर, श्री. प्रकाशराव आवाडे, श्री. डी. सी. पाटील, डॉ. बी. ए. शिखरे इत्यादी (वार्ता पृष्ठ क्र. ११वर)

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH
UPI ID : schoolbahubali@sbi
BHIM UPI

दशलक्षण महापर्वानिमित्त किंवा विविध पारिवारिक समारंभानिमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्भावना...!!



स्वर्गवास : ०८/०८/२०२५

## श्री. अण्णासाहेब खेमलापूरे, घटप्रभा

श्री. अण्णासाहेब सिद्धाप्पा खेमलापूरे, घटप्रभा हे मूळचे बेळ्ळद बागेवाडीचे होते. ते तेथील भरतेश गुरुकुलाचे माजी उपाध्यक्ष तर बाहुबली विद्यापीठाचे २००६पासून सदस्य म्हणून कार्य करीत होते. ब्र. यशपाल अण्णाजी यांच्या भगिनी इंदुमती अक्का यांचे ते पती होते. त्यांचे सुपुत्र भूपाल, तेजपाल हे बाहुबली गुरुकुलाचे विद्यार्थी आहेत. या सर्वांचे बाहुबली, स्तवनिधी व बागेवाडी येथील गुरुकुलास नेहमी सहकार्य व योगदान लाभते. यांच्या परिवारातर्फे स्तवनिधी गुरुकुलात निरंतर भोजन दिले जाते. त्यांच्या पश्चात् त्यांची धर्मपत्नी, त्यांची तीन मुले, सुना–नातवंडे असा परिवार आहे. अशा धार्मिक व्यक्तीस सद्गती लाभो, हीच भावना..

प्रेषक, www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर–४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

____________________

____________________

____________________

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली